# कृषीवल

रायगड, शनिवार, दि. ४ जानेवारी २०२५

किंमत ४ ₹


## प्रमोद ठाकूर यांची रविवारी शोकसभा

**अलिबाग :** शेतकरी कामगार पक्षाचे निष्ठावंत कार्यकर्ते, अलिबाग पंचायत समितीचे माजी सभापती प्रमोद केशव ठाकूर यांचे नुकतेच निधन झाले. त्यानिमित्ताने शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने शोकसभेचे आयोजन करण्यात आले आहे. तालुक्यातील कुसूंबळे येथे ही सभा रविवारी (दि.०५) सकाळी दहा वाजण्याच्या सुमारास होणार असल्याची माहिती शेकाप तालुका चिटणीस अनिल पाटील यांनी दिली. अलिबाग तालुक्यातील कुसुंबळे येथील रहिवासी असणारे प्रमोद ठाकूर यांनी राजकीय, सामाजिक, क्रीडा अशा विविध क्षेत्रात स्वतःची एक वेगळी ओळख निर्माण केली होती. ग्रामपंचायत सरपंच ते पंचायत समिती पान २ वर

## टँकरच्या धडकेने ६ कार खाडीत

**मुंबई :** मुंबईतील धारावी परिसरात एका टँकरने काही गाड्यांना धडक दिल्याने तब्बल सहा कार खाडीत कोसळल्याची घटना घडली आहे. या अपघातात कोणीही जखमी झालेले नाही. सध्या या परिसरात वाहने बाहेर काढण्याचे काम सुरु आहे. मुंबईतील धारावी परिसरातील माहीम उड्डाणपूल परिसरातील रहेजा रुग्णालयात परिसरात एक टँकरचे नियंत्रण सुटल्याने भीषण अपघात झाला. या टँकरने सुरुवातीला काही वाहनांना धडक दिली. त्यानंतर हा टँकरने रहेजा रुग्णालयात परिसरात असलेल्या वाहनांना धडकला. त्यामुळे खाडीकिनारी उभी असलेली वाहने खाडीत कोसळली. यावेळी एक दोन नव्हे तर सहा कार खाडीत कोसळल्या.

## वे|ध|क

### तीन रेल्वेगाड्या ठाणे, दादरपर्यंत धावणार

**मुंबई :** मध्य रेल्वेवरील छत्रपती शिवाजी महाराज टर्मिनस (सीएसएमटी) येथे फलाट विस्तारीकरणाचे काम सुरू असून त्यामुळे फलाट क्रमांक १२ आणि १३ ची पायाभूत कामे केली जात आहेत. त्यामुळे कोकणातून मुंबईच्या दिशेने येणाऱ्या जनशताब्दी, तेजस आणि मंगळुरू एक्स्प्रेसला फटका बसला आहे. या गाड्या ३१ जानेवारीपर्यंत सीएसएमटीऐवजी ठाणे आणि दादरपर्यंतच धावतील.

कोकण रेल्वे मार्गावरून धावणाऱ्या जनशताब्दी, तेजससह मंगळुरू एक्स्प्रेस या कोकणवासीयांसाठी महत्त्वाच्या रेल्वेगाड्या आहेत. परंतु, मागील काही कालावधीपासून सीएसएमटी येथे फलाट विस्तारीकरणाचे काम केले जात आहे. त्यामुळे मंगळुरु पान २ वर

### सानपाड्यात अंधाधुंद गोळीबार; एक जखमी

**नवी मुंबई :** नवी मुंबईतील सानपाडा स्टेशननजीक दुचाकीवरून आलेल्या युवकांनी एका व्यक्तीवर अंधाधुंद गोळीबार केला. एकूण पाच गोळ्या झाडल्याचा प्राथमिक अंदाज आहे. या प्रकरणी पोलीस घटनास्थळी पोहोचले असून तपास सुरु आहे. जखमी व्यक्तीची ओळख अद्याप पटलेली नाही. सानपाडा रेल्वे स्टेशनबाहेरील डी मार्टनजीक सकाळी दहाच्या सुमारास हा प्रकार घडला. दुचाकीवरून दोन व्यक्ती आल्या त्यांनी गाडी थांबवत पाच गोळ्या झाडल्या. यात एक व्यक्ती जखमी झाला असून त्याला रुग्णालयात उपचारार्थ दाखल केले आहे. ही घटना ज्या याठिकाणी घडली तो परिसर कायम गर्दी असणारा आहे. पान २ वर

### बच्चू कडूंचा अध्यक्षपदाचा राजीनामा

**मुंबई :** माजी आमदार बच्चू कडू यांनी दिव्यांग कल्याण मंत्रालय अभियान अध्यक्षपदाचा राजीनामा दिला आहे. त्यांनी सह्याद्री अतिथिगृहात उपमुख्यमंत्री एकाथ शिंदे यांची भेट घेऊन त्यांच्याकडे आपला राजीनामा सुपूर्द केला, दिव्यांगांच्या वारंवार तक्रारी केल्या, मात्र त्यांचं मानधन वेळेत मिळत नाही. बाहेर राज्यात दिव्यांगांना मिळणाऱ्या मानधनाच्या तुलनेत महाराष्ट्रात मिळणारं मानधन फारच कमी आहे, अनेक मागण्या पूर्ण होत नाहीत, असा आरोपही यावेळी बच्चू कडू यांनी केला आहे. बाहेरच्या राज्यात दिव्यांगांना जे मानधन मिळतं त्या तुलनेत महाराष्ट्रात जे मानधन मिळतं ते फारच थोड आहे, आणि ते पण वेळेवर पान २ वर

# महाड हादरलं

## भरधाव टोईंग व्हॅनने सहा जणांना चिरडले; अपघातात चार जणांचा मृत्यू

। उदय सावंत ।

। महाड ।

**मुंबई-गोवा महामार्गावर गुरुवारी मध्यरात्री वीर रेल्वे स्टेशनजवळ उभे असलेल्या सहा जणांना भरधाव टोईंग व्हॅनने जोरदार धडक देत चिरडले. या भीषण अपघातात महाडमधील चौघांचा मृत्यू झाला. या प्रकरणी पोलीस अधिक तपास करत आहेत.**





महाडमधील काही तरुण माणगाव दिशेने जात असताना त्यांच्या वाहनातील डिझेल संपल्याने ते महामार्गालगत उभे होते. त्याच दरम्यान मागून येणाऱ्या एका टोईंग व्हॅन क्रमांक एमएच १४ सीएम ३०९ ने उभ्या असलेल्या या सहा जणांना जोरदार धडक देत जवळपास पाच ते दहा फूट फरफटत नेले.

हे सर्वजण त्यांच्या स्कॉर्पिओ कारने जात होते. ही धडक इतकी जोरदार होती की, स्कॉर्पिओदेखील जवळपास पन्नास फूट लांब फेकली गेली. या अपघातामध्ये दोघांचा जागीच मृत्यू झाला तर अन्य दोघांचा उपचारादरम्यान मृत्यू झाल्याची माहिती पोलिसांकडून देण्यात आली आहे.

अपघाताचे वृत्त समजताच पोलिसांनी घटनास्थळी धाव घेत जखमींना महाड ग्रामीण रुग्णालयामध्ये दाखल केले. हे सर्व तरुण महाड शहरातील असल्याने महाडमधील पान २ वर

## कोट्यवधींच्या कालव्यातून
# पाणी गायब

**भातशेती करायची कि नाही? शेतकऱ्यांचा संतप्त सवाल**

। कोलाड । प्रतिनिधी ।

**कोलाड पाटबंधारे विभागाने कालव्याच्या दुरुस्तीच्या नावाखाली कोट्यवधी रुपयांचा खर्च केला आहे. परंतु काही ठिकाणी ही कामे अपूर्ण स्थितीत असल्याचे दिसून येते. त्यामुळे भातशेतीला जानेवारी महिना उजाडला तरी पाणी सोडण्यात आलेले नाही. त्यामुळे उन्हाळी भातशेती करायची कि नाही, असा संतप्त सवाल शेतकरी वर्गातून केला जात आहे.**



पूर्वी सुजलाम सुफलाम असणारा विभाग आता गेली १५ वर्षांपासून पाण्यापासून वंचित असुन काम करण्यासाठी एक-दोन वर्षे द्या, नंतर पूर्वी सारखेच पाणी सोडू म्हणणाऱ्या कोलाड पाटबंधारे विभागाने शेतकरी वर्गाचा विश्वासघात केला आहे. तर ठराविक ठिकाणी सुरु असणारे पाणी कालव्याच्या साफसफाई दुरुस्तीमुळे अद्याप सुरु झाले नसल्याने शेतकरी वर्ग संभ्रमात पडला आहे.

पाटबंधारे खात्याच्या आडमुठे धोरणमुळे रोहा तालुक्यातील नडवली, तळवली, चिल्हे, धानकान्हे, देवकान्हे ते मालसई निडी अष्टमीपर्यंत तसेच आंबेवाडी, संभेपाले, किल्ला,धाटाव, लांढर ते निवी या भागातील बळीराजा अक्षरशः उध्वस्त झाला आहे. केलेली कामे ही निकृष्ट दर्जाची आहेत. नको तेथे मोऱ्या, काँक्रिटीकरण या कामासाठी करोडो रुपयांची उधळपट्टी केल्याचे बोलले जाते. कालव्याचे पाणी तुम्हीच बंद केले, तुम्ही सुरु करा, अशी मागणी या परिसरातील शेतकरी अनेक वर्षांपासून करीत आहेत.

मागील ४० ते ५० वर्षे सातत्याने कुंडलिकेच्या सिंचनातून उजवा तीर व डावा तीर कालव्या लगत असलेल्या शेतकऱ्यांना पुरेपूर पाणी मिळाले. त्यातून येथील शेतकरी भातपिक घेऊन सुखी समाधानी जीवन जगत होता. मात्र २०११-१२ मध्ये सरकारी धोरण म्हणून हे कालवे शेतकऱ्यांकडून दुरुस्तीसाठी घेण्यात आले ते आज १४ ते १५ वर्षे झाली तरी शेतकरी वर्गाला पाणी मिळत नाही.

> **कुंडलिकेच्या सिंचनातून उजव्या तिरामधून पुई, गोवे गावाच्या भातशेतीला पाणी सोडण्यात येते. हे पाणी गेल्यावर्षी उशिरा सोडण्यात आल्यामुळे भातपीक तयार होण्यासाठी जुन महिना उजाडला. या महिन्यात भातपीके चांगली येऊन तुफान पावसाने कापणी न करताच भातपीक कुजून गेली. यामुळे गोवे तसेच पुई येथील असंख्य शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले. एकतर वेळेवर पाणी द्या, नाहीतर कालवा दुरुस्तीच्या नावाखाली पाणी सोडण्यात येणार नसल्याची शेतकऱ्यांना कल्पना द्या. त्यामुळे शेतकऱ्यांचा खर्च वाया जाणार नाही.**
>
> **-लिलाधर दहिंबेकर, शेतकरी**

कुंडलिकेच्या सिंचनातून उजवा तीर १ ते ८ पुई, गोवे, पुगांव, खांब पान २ वर

## सरकारी काम, हेलपाटे जाम

### एकाच छताखाली कार्यालय नसल्याने नागरिक त्रस्त

। म्हसळा । प्रतिनिधी ।



सुविधांचा अभाव असलेल्या आणि गैरसोयीने व्यापलेल्या म्हसळा तालुक्यात शासकीय जागा आणि इमारतीअभावी नागरिकांची फारच दमछाक होत आहे.

म्हसळा शहरात जुने महाल म्हणुन नामांकीत असलेल्या मध्यवर्ती तहसिल कार्यालयाची इमारत जीर्ण झाली असल्यामुळे नव्याने तहसीलदार कार्यालय एक किलोमीटर अंतरावर असणाऱ्या दिघी रोडवरील पाच गाव आगरी समाजाच्या इमारतीत भाडे तत्वावर आधारित कार्यरत आहे. असे असले तरी या इमारतीत तलाठी आणि सेतु कार्यालय नाही. हि कार्यालये एकाच ठिकाणी गरजेची असताना तत्कालीन तहसीलदार यांनी तालठी कार्यालय बायपासला आणि सेतु कार्यालय हे शहरात ठेवले आहे.

एक ना धड भाराभर चिंध्या अशी अवस्था सध्या म्हसळा तालुका शहर व ग्रामीण भागातील गोरगरीब, कष्टकरी, शेतकरी व नागरिकांची झालेली आहे. जनतेला एकाच ठिकाणी लागलीच सेवा देणे सरकारचे धोरण असताना म्हसळा तालुका मात्र अशाप्रकारे सेवेपासून त्रस्त आणि अपवाद आहे.

म्हसळा तालुका तहसिल कार्यालय खासगी संस्थेला एका महिन्याचे अव्वाच्या सव्वा भाडे मोजत आहे. सेतुत काम असेल तर नवीन तहसिल कार्यालयात १ किमी जावे लागते. तहसिल कार्यालयात काम झाले तर पुन्हा एक किमी सेतुत जावे लागते.

असे एक ना अनेक हेलपाटे मारावे लागतात. त्यातच तलाठी कार्यालयात काम असेल तर बायपासजवळ कन्या शाळेशेजारील चाळीत जावे लागते. येथे तर आलेल्या नागरिकांना गोड शब्दाची अपेक्षा नाहीच पण बसण्या-उठण्याची कसलीच सोय नाही.

झपाट्याने वाढत चाललेला आणि विकासाची गंगा वाहत असतानाही कुठे नेऊन ठेवला आहे म्हसळा माझा, अशीच आता बोलण्याची वेळ आली आहे. म्हसळा तहसिल कार्यालयाचे नव्या इमारतीच्या व्हरांड्यात भला मोठा सभा मंडप उभारण्यात आला आहे. या मंडपात तहसिल कार्यालयाने खासगी व्यवसाय करणारे बाँड वेंडर यांना बसण्या-उठण्याची व्यवस्था केली आहे. मग तहसिल कार्यालयाशी निगडित असलेला पान २ वर

## केळवणे ग्रामपंचायतच्या उपसरपंचपदी सुवर्णा गावंड यांची निवड



पान २ वर

। पनवेल । प्रतिनिधी ।

शेतकरी कामगार पक्षाच्या केळवणे ग्रामपंचायत सदस्या सुवर्णा विनायक गावंड यांची उपसरपंचपदी निवड झाली आहे. त्याबद्दल त्यांचे पनवेल पालिकेचे माजी विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे यांनी अभिनंदन केले.

सामाजिक आणि राजकीय क्षेत्रात त्यांचा असलेला कामांचा अनुभव यापुढे ग्रामपंचायतीला नक्कीच उपयुक्त ठरेल आणि विकासाची कामे यापुढे केळवणे ग्रामपंचायतमधील मार्गी लागतील, असे मत शेकाप कार्यकर्त्यांनी व्यक्त केले.

यावेळी माजी नगराध्यक्ष जे.एम.म्हात्रे, कृषी उत्पन्न बाजार समितीचे सभापती नारायण घरत, उपसभापती सुनील सोणावळे, पनवेल पंचायत समितीचे माजी सभापती काशिनाथ पाटील, भाई पाटील, पनवेल महानगरपालिकेचे विरोधी पक्षनेते प्रीतम म्हात्रे, शेकाप नेते ज्ञानेश्वर मोरे व पान २ वर

## करंजा-रेवस सागरी सेतूमुळे रामायणातील
# द्रोणागिरी पर्वताला धोका

। उरण । प्रतिनिधी ।



रामायणातील पौराणिक काळापासून द्रोणागिरी पर्वत सर्वांनाच माहीत आहे. अनेक आयुर्वेदिक वनस्पती, औषधी संजीवनी याच डोंगराच्या कडेकपारीमध्ये आहेत. या परिसरात डोंगरदेवी म्हणून प्रसिद्ध पावलेल्या करंजा ग्रामस्थांचे आराध्यदैवत असलेल्या द्रोणागिरी मातेवर भाविकांची श्रद्धा आहे. मात्र या पौराणिक काळातील द्रोणागिरी पर्वताला पोखरून करंजा-रेवस सागरी सेतूची निर्मिती करण्याचा प्रयत्न शासनाकडून सुरू आहे. त्यामुळे उरणकर, भाविक तसेच गडप्रेमींमध्ये संतापाची लाट पसरली आहे.

या विरोधात रस्त्यावर उतरण्याच्या तयारीत ग्रामस्थ असल्याचे समजते. मात्र याबाबत कोणताच लोकप्रतिनिधी, राजकीय पक्ष व त्यांचे नेतेमंडळी व इतर कोणीच आवाज उठवीत नसल्याने आश्चर्य व्यक्त केले जात आहे. भविष्यात यामुळे ओएनजीसी प्रकल्पालाही धोका पोहचण्याची शक्यता वर्तवली जात आहे.

तुळजापूरची भवानीमाता, कोल्हापूरची महालक्ष्मी, माहूरगडची रेणुका माता, नाशिक इथल्या वणीची सप्तश्रृंगी (अर्धे शक्तीपीठ) पान २ वर

## पुणे ते मुंबई अंतर अर्ध्या तासाने कमी होणार

। पुणे । प्रतिनिधी ।

**रस्त्याचं काम ९० टक्के पूर्ण; नवी मुंबई विमानतळ आणखी वेगात गाठता येणार!**

येत्या चार महिन्यांत मुंबईसह पुणेकरांसाठीही अत्यंत सोयीच्या ठरणाऱ्या नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचं उद्घाटन होणार आहे. त्यातच आता पुण्यावरून मुंबई गाठण्यासाठी लागणाऱ्या वेळात किमान अर्ध्या तासाचा फरक पडणार असल्यामुळे पुणेकरांसाठी ही दिलासादायक बाब ठरणार आहे. पुणे-मुंबई द्रुतगती महामार्गावरील लिंक रोडचं काम पान २ वर

### ९० टक्के काम पूर्ण!

लोणावळ्याजवळील लिंक रोडचं काम जवळपास ९० टक्के पूर्ण झालं आहे. पुण्याहून मुंबईच्या दिशेनं जाणाऱ्यांचा किमान अर्धा तास या लिंक रोडमुळे कमी होईल. हा प्रकल्प पूर्ण करण्याची डेडलाईन जूनमध्ये आहे. वेगाने काम होत आहे. आम्हाला कल्पना आहे की नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळ एप्रिलमध्ये पूर्ण होत आहे आणि लोकांना विमानतळापर्यंत कमीत कमी वेळात पोहोचायचं असेल. पण लिंक रोडमध्ये दोन बोगदे आणि दोन पुलांचा समावेश आहे. त्यामुळे घाईगडबडीत आम्हाला कोणतीही जोखीम पत्करायची नाही, अशी माहिती एमएसआरडीसीचे कार्यकारी अभियंते राकेश सोनावणे यांनी दिली.

## बसमध्ये बसवणार व्हीटीएस यंत्रणा | प्रवाशांची गैरसोय होणार दूर
# एसटीचा ठावठिकाणा आता क्लिकवर

। रायगड । प्रतिनिधी ।

एसटीचा ठावठिकाणा प्रवाशांना आता एका क्लिकवर पाहता येणार आहे. राज्य परिवहन महामंडळाच्या (एसटी) बसमध्ये व्हेईकल ट्रॅकिंग सिस्टिम (व्हीटीएस) ही यंत्रणा विकसित करण्यात आली असून, प्रणालीची यशस्वी चाचणीही नुकतीच करण्यात आली आहे. त्यामुळे लवकरच ही सुविधा सुरू होणार आहे.

एसटी महामंडळातर्फे प्रवाशांच्या दृष्टीने रेल्वे प्रशासनाच्या धर्तीवर बसची माहिती सहज समजण्यासाठी समजण्यासाठी ऑनलाईन व्हीटीएस यंत्रणा विकसित करण्यात आली आहे. सद्यास्थितीला एसटी महामंडळातील १६ हजारांहून अधिक नव्या-जुन्या बसमध्ये व्हीटीएस ही आधुनिक यंत्रणा बसविण्यात आली आहे. या यंत्रणेची विविध पातळ्यांवर चाचण्या करण्यात आल्या. यातून समोर आलेल्या तांत्रिक त्रुटी दूर करण्यात आल्या असून, प्रायोगिक तत्त्वावर राबविण्यात आलेली चाचणीदेखील यशस्वी झाली आहे. ॲप विकसित करण्याचेही काम सुरू आहे.

प्रवाशांच्या दृष्टीने राज्यभरातील १६ हजारांहून अधिक नव्या-जुन्या बसमध्ये जीपीएस आणि आधुनिक यंत्रणा बसविण्यात आली आहे. रायगड विभागातील बसमध्येदखील ही यंत्रणा बसविण्यात येणार आहे.



**काय होणार फायदा ?**

रेल्वे प्रवाशांना नियोजित गाडी सध्या कुठे आहे, हे तातडीने कळते. त्याचप्रमाणे आता आरक्षण केलेल्या किंवा अपेक्षित बसची माहिती कोठे आहे, किती अंतरावर आहे, बस बिघडली आहे किंवा नाही, किती विलंब होणार आहे, याची माहिती एका क्लिकवर समजणार आहे.

**ग्रामीण भागात रस्ते आणि इंटरनेट महत्त्वाचे**

एसटी महामंडळाची बस शहरी भागापासून ते ग्रामीण भागातील कानाकोपऱ्यापर्यंत प्रवास करते. व्हीटीएस यंत्रणा परिपूर्ण आणि सुस्थितीत ठेवण्यासाठी खेड्या-पाड्यातील रस्ते आणि इंटरनेट या सुविधा अत्यंत महत्वाच्या आहेत. खडतर रस्त्यांमध्ये यंत्रणेमध्ये बिघाड आल्याचे समोर आले होते. ही दुरुस्ती करून रस्त्यांच्या अनुषंगाने व्हीटीएसचे यंत्र आणि जीपीएस यंत्रणा साचेबद्ध करण्यात आली आहे. तसेच, अवघड घाट, डोंगराळ भाग, पठारांवर तसेच बोगद्यांमध्ये इंटरनेट बऱ्याचदा नसते. अशा वेळी प्रवाशांची गैरसोय होईल.




**अभिष्टचिंतन ज्येष्ठ नागरिकांचे**

४ जानेवारी

१) श्री. अभय प्रभाकर सिनकर
अलिबाग, ४-१-१९५३

## कृषीवलच्या वाचकांना आवाहन




अलिबाग येथील श्री कच्छी जैन भवन चॅरिटेबल ट्रस्टच्या वतीने अन्नदानासाठी एक अभिनव योजना आखली आहे.जिल्हा रुग्णालयात दाखल असलेल्या रुग्णांच्या एका नातेवाईकाला जेवणाची सोय करण्यात आली आहे. या योजनेत दररोज किमान ७०/८० लोक जेवत असतात. या जेवणाचा खर्च प्रति दिवस रु. ३००० असून ही देणगी देणाऱ्याचा फोटो कृषीवलमध्ये छापला जाईल. तरी जास्तीत जास्त लोकांनी अन्नदान सेवेचा लाभ घेऊन या सामाजिक उपक्रमात सहभागी व्हावे असे आवाहन कृषीवल करीत आहे.

**संपर्क- ८०५५३२५६७८ (बीपीन राठवा)**
**९२२६०५५१५५ (अमित शहानंद)**
**- मुख्य संपादक, कृषीवल**

# उरणच्या हवेचा गुणवत्ता निर्देशांक वर्षभर १५० पार

| उरण | वार्ताहर |

**देशातील सर्वात प्रदूषित परिसर म्हणून उरणची नोंद झाली असतांना गेल्या सरत्या वर्षात उरणमध्ये सरासरी हवेचा गुणवत्ता निर्देशांक १५० ते २०० च्या पातळीवर राहिला आहे. ही मात्रा मानवी शरीरासाठी घातक म्हणून गणली जाते. या हानिकारक दूषित हवेमुळे वर्षभर उरणकरांचा श्वास कोंडला आहे. या स्थितीवर महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने उपाययोजना करण्याची मागणी आता जोर धरू लागली आहे.**



सध्या मुंबई आणि नवी मुंबई या शहरातील वाढत्या प्रदूषणाची दखल येथील स्थानिक प्रशासनाने घेत त्यासाठी च्या उपाययोजना सुरू केल्या आहेत. मात्र दुसरीकडे या दोन प्रमुख शहराचे उपनगर असलेल्या उरण आणि परिसरात दिवसेंदिवस हवेची गुणवत्ता खालावू लागली आहे. येथील वाढत्या प्रदूषणावर उपाययोजना करण्याच्या सूचना संबंधित आस्थापनाना देण्यात आल्या असल्याचा दावा महाराष्ट्र प्रदूषण नियंत्रण मंडळाने केला आहे. असे असले तरी वर्षभर सातत्याने येथील हवेतील धुळीकणात वाढ होऊ लागली आहे. हवेचा वाढता गुणवत्ता निर्देशांक सामान्य पातळीवर आणण्यासाठी उपाययोजना करण्याची मागणी गेल्या वर्षी उरण पनवेल राष्ट्रीय महामार्ग आंदोलन करीत उरण सामाजिक संस्थेने केले होते. त्यावेळी काही प्रमाणात तात्पुरती नियोजन झाले होते. मात्र त्यानंतर पुन्हा परिस्थिती जैसे थे आहे. उरण परिसरातील हवेची गुणवत्ता मोजण्यासाठी महाराष्ट्र प्रदूषण मंडळाने दोन ठिकाणी नोंदणी केली जात असल्याचा ही दावा केला आहे. तसेच येथील धूलिकणात वाढ झाली आहे. मात्र ही हवा घातक नसल्याचे त्यांचे म्हणणे आहे. तर मानवी शरीरासाठी चांगल्या हवेचा गुणवत्ता निर्देशांक नियमावलीनुसार निर्देशांक मात्रा ही ० ते ५० किंवा १०० पर्यंत चांगली मानली जाते. परंतु १०१ ते १५० पर्यंतचा निर्देशांक ही पातळी निरोगी व्यक्तीला ही हानिकारक मानली जात आहे. तर त्यापुढील नोंद ही अति घातक पातळीवर मानली जाते. उरणची हवेची गुणवत्ता ही अनेकदा ३०० पार ही पोहचली आहे. त्यामुळे उरण मधील नागरिकांच्या आरोग्याचा प्रश्न ऐरणीवर आला आहे.

थंडीतील धुके की धुरके सध्या उरणमध्ये दिवसभर ढगाळ आणि धुक्याचे वातावरण पसरले असते. वातावरणातील दिवसभराच्या धुक्यामुळे वातावरणात धुके की धुरके याचा अंदाज येत नाही. धुरक्यात नायट्रोजन ऑक्साईड, सल्फर डायॉक्साईड, कार्बन डायॉक्साईड या घातक वायूंचे प्रमाण अधिकचे असल्याने मानवी शरीरावर याचे परिणाम होण्याची शक्यता वाढत आहे. वाढत्या हवा प्रदूषणापासून बचाव करण्यासाठी नागरिकांनी मुखपट्टीचा वापर करण्याची सूचना दिली जात आहे.




# राजपुरी परिसरातील आठ शाळा डिजीटल

## अदानी फाऊंडेशनचा उपक्रम

| आगरदांडा | प्रतिनिधी |

डिजीटल शिक्षणाचा प्रचार आणि अंगणवाडींचे नूतनीकरण या संकल्पनेतून अदानी फाऊंडेशनच्यावतीने राजपुरी परिसरातील ८ शाळांना डिजीटल स्कूल किट प्रदान करून डिजीटल शिक्षणाला चालना देण्यात आली. त्याचबरोबर राजपुरी मराठी शाळेतील एका वर्गाचे नूतनीकरण सुद्धा करण्यात आले. अंगणवाड्यांच्या दर्जामध्ये सुधारणा करण्यासाठी राजपुरी येथील ४ आणि कुडगाव येथील २ अशा एकूण ६ अंगणवाड्यांमध्ये बाला पेंटिंग अंतर्गत सुंदर रंगरंगोटी करण्यात आली.

राजपुरी येथे नुकतेच अदानी फाऊंडेशन दिघी पोर्ट लिमिटेड अंतर्गत रायगड जिल्हा परिषद मराठी शाळा येथे विविध उपक्रमांचे उद्‌घाटन मोठ्या उत्साहात पार पडले. या कार्यक्रमाला प्रमुख पाहुणे म्हणून रायगड जिल्हा परिषदेच्या उपमुख्य कार्यकारी अधिकारी निर्मला कुचिक, मुरुड तालुका गटविकास अधिकारी राजेंद्रकुमार खताळ, एकात्मिक बालविकास प्रकल्प अधिकारी संजय शेडगे, राजपुरी ग्रामपंचायत सरपंच सुप्रिया गिदी, उपसरपंच इस्माईल सिद्दीकी, सदस्य अलका मोन्नाक, महेंद्र आंबटकर, सुनंदा कुणबी, राजपुरी कोळी समाज महिला मंडळ अध्यक्ष कल्पना आगरकर, केंद्रप्रमुख जितेंद्र मकु, मुख्याध्यापिका सुचेनी पाटील, शाळा व्यवस्थापन समिती अध्यक्ष जागृती आगरकर, उपाध्यक्ष यामिनी आंबटकर तसेच अदानी फाऊंडेशनच्या डेप्युटी प्रोजेक्ट मॅनेजर जयश्री काळे आणि अवधूत पाटील एकात्मिक बालविकास विभागाचे सर्व पदाधिकारी, सर्व शाळा मुख्याध्यापक, शिक्षक, अंगणवाडी सेविका व मदतनीस, सर्व शाळा व्यवस्थापन समिती सदस्य आणि ग्रामस्थ उपस्थित होते.

प्रगत शिक्षणासाठी पायाभूत सुविधा शालेय विद्यार्थ्यांना मिळण्यासाठी अदानी फाऊंडेशनने महत्त्वपूर्ण भूमिका बजावली आहे. यामुळे ग्रामीण भागातील पार्थमिक शिक्षण घेत असणाऱ्या शालेय विद्यार्थ्यांना सर्वत्कृष्ठ सेवा मिळून शैक्षणिक दर्जा उंचावण्यास मदत झाली आहे.

पान १ वरून

## महाड हादरलं

ग्रामस्थांनी रुग्णालयात गर्दी केली होती. मयत व्यक्तींमध्ये सूर्यकांत सखाराम मोरे (रा. नवेनगर), साहिल नथुराम शेलार आणि प्रसाद रघुनाथ नातेकर (रा. कुंभारआळी), समीप सुधीर मींडे (रा. दासगाव) यांचा समावेश आहे. तर सुरज अशोक नलावडे, शुभम राजेंद्र मातळ या दोघांवर मुंबई येथे विविध रुग्णालयांमध्ये उपचार सुरू आहेत.

## सरकारी काम, हेलपाटे जाम

तलाठी आणि सेतु कार्यालय याच जागेत उभारता आले असते. याबाबत नागरीकांना आश्चर्य वाटत आहे. शासन आणि प्रशासन हा नागरिकांचा मुख्य दुवा आहे. त्यांनाच सेवा सुविधा देताना संबंधित अधिकाऱ्यांनी खेळ करणे कितपत योग्य आहे, असा प्रश्न पडला आहे. उपविभागीय अधिकारी, तहसीलदार यांनी जनतेला होत असलेल्या गैरसोयीची दखल घेऊन वेळीच योग्य ती कार्यवाही करावी, अशी जाहीर मागणी म्हसळा तालुका नागरिकांनी केली आहे.

## पाणी गायब

यामध्ये सुकेळी आंबा खोरे तसेच ९ ते २९ नडवली ते देवकान्हे मालसई निडीतर्फे अष्टमी अशा शेतकऱ्यांना या सिंचनातून पाणी वापर होत होता. तसेच १ ते १० कोलाड, चिंचवली, तिसे माणगाव १ ते २० आंबेवाडी ते किल्ला, निवी, भुनेश्वर असा समावेश आहे. तसेच १ ते ३३ तिसे, धरणाचीवाडी ते मोरबा असा समावेश आहे. परंतु हे दुरुस्तीचे काम पूर्ण झालेले दिसत नाही. त्यामुळे या सर्वच परिसरातील शेतकरी पाण्यापासून वंचित राहिले असुन या सर्व परिसरातील काम पूर्ण करून पूर्वीपासून सुरु असणारे पाणी सुरु करावे, अशी मागणी शेतकरी वर्गातून केली जात आहे.

दरम्यान, कोलाड पाटबंधारे विभागाशी संपर्क साधण्याचा प्रयत्न केला असता तो होऊ शकला नाही.

## द्रोणागिरी पर्वताला धोका

अशी साडेतीन शक्तिपीठे महाराष्ट्रात आहेत. या साडेतीन शक्तीपिठांव्यतिरिक्त आदिमाया शक्तीची अनेक श्रद्धास्थाने महाराष्ट्रात आहेत. अरबी सुमद्राच्या करंजा खाडीकिनारी डोंगरमाथ्यांवरील श्री द्रोणागिरीमातेचे मंदिर अनेक वर्षांपासून प्रसिद्धीपासून दूर राहिले आहे. रामायणातील पौराणिक काळापासून द्रोणागिरी पर्वत सर्वांनाच माहीत आहे. अनेक आयुर्वेदिक वनस्पती, औषधी संजीवनी याच डोंगराच्या कडेकपारीमध्ये आहेत. या परिसरात डोंगरदेवी म्हणून प्रसिद्ध पावलेल्या करंजा ग्रामस्थांचे आराध्यदैवत असलेल्या द्रोणागिरी मातेवर भाविकांची श्रद्धा आहे. द्रोणागिरी परिसरात तिसऱ्या नवी मुंबईचा विकास होत असताना भविष्यात येणारे प्रकल्प हे या भागातील ऐतिहासिक व पुरातन वास्तू यांचे जतन करून त्यांना पर्यटन स्थळ म्हणून घोषित करून शासनाने याकडे लक्ष देणे आवश्यक असताना उरण तालुक्यातील ऐतिहासिक द्रोणागिरी पर्वत व द्रोणागिरी मंदिर यांना यांना धक्का देत भूमाफियांनी शासकीय अधिकाऱ्यांना हाताशी धरून द्रोणागिरी पर्वताचीच माती महामार्गासाठी वापरून ऐतिहासिक वारसा नष्ट करून आपली पोळी भाजण्याचा प्रयत्न सुरू केला आहे. तसेच या भागातील इतर प्रकल्पासाठी मातीचा वापर भराव करण्यासाठी करता येणे शक्य होणार असल्याचे बोलले जात आहे.

महाराष्ट्र रस्ते विकास महामंडळा (एमएसआरडीसी) च्या माध्यमातून नव्याने हा मार्ग उभारण्यात येत आहे. प्रस्तावित रेवस ते रेड्डी या मुंबईला थेट कोकणाशी जोडणाऱ्या या महत्त्वाकांक्षी सागरी महामार्गाच्या जोड मार्गिकेला करंजा ग्रामस्थांनी हरकत घेतली आहे. तत्कालीन मुख्यमंत्री बॅरिस्टर अंतुले यांनी मंजूर केल्याप्रमाणे सदरचे काम करण्याची मागणी लावून धरली होती. उरणच्या करंजा ते अलिबाग येथील रेवस दरम्यानच्या दोन किलोमीटर लांबीच्या पुलाचे भूमीपूजन १४ ऑक्टोबरला तत्कालीन मुख्यमंत्री एकनाथ शिंदे यांच्या हस्ते करण्यात आले आहे. २ हजार ४७८ कोटी रुपयांची निविदा या पुलाच्या उभारणीसाठी मागविण्यात आली आहे. या पुलाची एकूण लांबी ही १०.२०९ किलोमीटर आहे. मुंबईतील सागरी अटल सेतू मार्गे द्रोणागिरी नोड येथून या पुलावरून कोकणात प्रवास करता येणे शक्य होणार आहे.

शासनाने याचा कोणताही विचार न करता सदर सागरी सेतूचे काम काही भूमाफियांना हाताशी धरून सुरू करण्यात आल्याचे समजते. येथील लोकप्रतिनिधी, राजकीय पक्ष, नेतेमंडळी व सामाजिक संघटनाही याबाबत काहीच विरोध करीत नसल्याने त्यांचीही या पौराणिक द्रोणागिरी पर्वताचे अस्तित्व नष्ट झाले तरी काहीच देणेघेणे नसल्याचे दिसत असल्याने त्यांचेही आर्थिक साटेलोट असल्याची चर्चा सुरू आहे.

## पुणे ते मुंबई अंतर अर्ध्या तासाने कमी होणार

जवळपास ९० टक्के पूर्ण झाल्याची माहिती प्रशासनाकडून देण्यात आली आहे. यामुळे पुण्यापासून नवी मुंबई विमानतळावर जाण्याचा वेळही कमी होणार आहे.

लोणावळा शहराच्या बाहेरून द्रुतगती मार्गाला समांतर जाणारा लिंक रोड लवकरच तयार होऊन प्रवाश्यांच्या वापरासाठी खुला करण्यात येणार आहे. सध्या पुणे ते मुंबई हे अंतर साधारणपणे १६० किलोमीटर आहे. त्यावरून पुण्याहून मुंबईला पोहोचण्यासाठी अंदाजे ४ तासांचा वेळ लागतो. पण पुण्याहून नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळाचं अंतर अवघं १२० किलोमीटर आहे. त्यातही लोणावळ्याजवळील बायपास लिंक रोडमुळे पुण्याहून नवी मुंबई आंतरराष्ट्रीय विमानतळापर्यंत जाण्याचा वेळ अवघा २ तासांपर्यंत कमी झाला आहे.

**२ पूल आणि १.७ किलोमीटरचे बोगदे**

या लिंकरोडमुळे पुणे-मुंबई द्रुतगती मार्गाचं अंतर ६.५ किलोमीटरनं कमी होईल. कारण खोपोली एक्झिटपासून कुसगाव सिंहगड इन्स्टिट्युटपर्यंतचा पूर्ण पट्टाच प्रवाश्यांना या लिंकरोडमुळे टाळता येऊ शकेल. हा लिंकरोड १३.३ किलोमीटर लांब आहे. यापैकी ८.९ किलोमीटरचा भाग डोंगरांमधून जातो तर १.७ किलोमीटरचा बोगदा आहे. याशिवाय या मार्गात अनुक्रमे ८४० मीटर आणि ६५० मीटरचे दोन केबल ब्रिज आहेत.

**घाटातील भाग टाळण्याचा प्रयत्न**

या प्रकल्पाची एकूण किंमत ६ हजार ५९५ कोटी आहे. घाटातला रस्त्याचा पूर्ण भाग टाळून थेट पुढे जाता यावं, यासाठी हा लिंक रोड तयार करण्यात येत आहे. यातून खोपोली ते कुसगावपर्यंतचा टप्पा शून्य अपघात क्षेत्र करण्याचा मानस या प्रकल्पाच्या माध्यमातून पूर्ण करण्याचा प्रयत्न असेल. याशिवाय घाटाच्या परिसरात होणारा वाहतुकीचा खोळंबाही यामुळे कमी करता येऊ शकेल. २०१९ साली या प्रकल्पाचं काम सुरू झालं होतं. २०२२ मध्येच हा प्रकल्प पूर्ण होणं अपेक्षित होतं. पण मध्यंतरी आलेल्या कोरोनाच्या साथीमुळे हे काम रखडलं. आता जून २०२५ पर्यंत काम पूर्ण होईल असं प्रशासनाकडून सांगण्यात येत आहे.

## प्रमोद ठाकूर यांची रविवारी शोकसभा

सभापती म्हणून त्यांनी जबाबदारी खंबीरपणे सांभाळली. क्रीडा क्षेत्रातदेखील त्यांचे योगदान राहिले आहे. गुरूवारी (दि.२६) डिसेंबर रोजी सकाळी त्यांच्या राहत्या घरी हृदयविकाराच्या झटक्याने त्यांचे निधन झाले. त्यानिमित्ताने शेतकरी कामगार पक्षाच्या वतीने कुसूंबळे येथे शोकसभा आयोजित केली आहे. शेतकरी कामगार पक्षाचे तालुक्यातील सर्व पदाधिकारी, प्रमुख कार्यकर्ते,माजी नगरसेवक, आजी माजी सरपंच, उपसरंच, कार्यकर्त्यांनी उपस्थित राहवे असे आवाहन शेकाप तालुका चिटणीस अनिल पाटील यांनी केले.

## तीन रेल्वेगाड्या ठाणे, दादरपर्यंत धावणार

एक्स्प्रेस ठाणे, जनशताब्दी आणि तेजस या गाड्या दादर स्थानकापर्यंत धावत आहेत. तर, आता ३१ जानेवारीपर्यंत या यात वाढ केली आहे.

गाडी क्रमांक १२१३४ मंगळुरु ते मुंबई सीएसएमटी एक्स्प्रेस ठाण्यापर्यंत चालवून अंशत: रद्द केली जाईल. गाडी क्रमांक २२१२० मडगाव ते सीएसएमटी तेजस एक्स्प्रेस आणि गाडी क्रमांक १२०५२ मडगाव-सीएसएमटी जनशताब्दी एक्स्प्रेस दादरपर्यंत चालवून अंशत: रद्द केली जाईल, अशी माहिती कोकण रेल्वेद्वारे देण्यात आली.

## सानपाड्यात अंधाधुंद गोळीबार; एक जखमी

अशा गर्दीतून गोळ्या झाडणारे आपली दुचाकी सुसाट वेगाने काढून पसार झाले. ही माहिती मिळताच सानपाडा पोलिससह वरिष्ठ पोलीस अधिकारी घटना स्थळी दाखल झाले आहेत. परिमंडळ एकचे पोलीस उपायुक्त पंकज दहाणे यांनी घटनेला दुजोरा आहे. गोळ्या झाडणारे नेमके कुठल्या दिशेने आणि कुठे पळाले याचा तांत्रिक शोध घेणे सुरु आहे तसेच चारही दिशेला पथके रवाना झालेली आहेत. जखमी व्यक्तीवर उपचार सुरु आहेत. पाच गोळ्या झाडल्याची प्राथमिक माहीती प्राप्त झाली आहे. जखमी व्यक्तीची ओळख अद्याप पटलेली नाही.

## बच्चू कडूंचा अध्यक्षपदाचा राजीनामा

मिळत नाही. आम्ही दिव्यांगांसोबत बेईमानी करू शकत नाही. त्यांची भरती देखील होत नाहीये, त्यामुळे मी राजीनामा दिला आहे. पदापेक्षा काम महत्वाचे असते, आम्ही काम करू, मी माझा राजीनामा दिला आहे. आमचं प्रेम हे सामान्य लोकांवर आहे. एकनाथ शिंदे यांच्यावर आमचं प्रेम आहे. उद्या याच मुद्द्यावरून आंदोलनाची वेळ येऊ शकते. आंदोलन करावं लागेल म्हणून माझी नैतीक जाबाबदारी म्हणून मी राजीनामा दिला. नवीन नियुक्ती लवकर व्हावी अशी आमची इच्छा आहे, सरकार याबाबतचा निर्णय घेईल, असं बच्चू कडू यांनी म्हटलं आहे. दरम्यान उद्धव ठाकरे यांचं सरकार असताना बच्चू कडू यांनी उद्धव ठाकरे सरकारला पाठिंबा दिला होता. बच्चू कडू यांना राज्यमंत्रिपददेखील देण्यात आलं होतं. मात्र त्यानंतर एकनाथ शिंदे यांनी शिवसेनेतून उठाव केला. त्यामुळे ठाकरे सरकार कोसळलं, शिवसेनेच्या अनेक आमदारांनी यावेळी एकनाथ शिंदे यांना पाठिंबा दिला. बच्चू कडू यांनी देखील एकनाथ शिंदे यांना पाठिंबा दिला होता. मात्र नवीन सरकार सत्तेत आल्यानंतर त्यांना मंत्रिपद भेटलं नाही तर त्यांची नियुक्ती ही दिव्यांग कल्याण मंत्रालय अभियान अध्यक्ष पदावर करण्यात आली होती. विधानसभा निवडणुकीत देखील बच्चू कडू यांचा यावेळी पराभव झाला, त्यानंतर त्यांनी आता आपल्या अध्यक्षपदाचा राजीनामा दिला आहे.

**जाहीर नोटीस**

सर्व नागरीकांना या जाहीर नोटीसीद्वारे सुचित करण्यात येते की, आमचे अशिल, श्री.बंडू बबन तुरडे, यांनी जमीन मालक १.सुनिल रामदास राऊत, २. विनायक रामदास राऊत, ३. तानाजी रामदास राऊत यांचेकडून त्यांचे अविभक्त हिस्स्यातील, ताबेकब्जा वहिवाटीतील, व मालकीची, आणि भोगवटासदरी नावे असलेली खालील वर्णनाची जमीन मिळकत, कायमची विकत घेण्याचे ठरविले आहे. त्या मिळकतीचे वर्णन पुढील प्रमाणे:-

**मौजे माणगाव तर्फे वासरे, तालुका कर्जत, जिल्हा रायगड येथील जमीन मिळकत**

| सर्व्हे नंबर | क्षेत्र हे. आर. पॉ. | आकार रु. पै. |
|---|---|---|
| ७१/१ | ०.८९.३० या एकूण क्षेत्रापैकी लिहून देणार आणि इतर सहहिस्सेदार यांचे सामाईक क्षेत्र ०.४४.६५ या क्षेत्रापैकी १. सुनिल रामदास राऊत, २. विनायक रामदास राऊत, ३. तानाजी रामदास राऊत यांचे अविभाज्य हिस्स्यातील ०.२०.०० (२० गुंठे) इतके क्षेत्र लिहून घेणार यांस विकत दिलेले आहे. | ४.०३ |

वर वर्णन केलेल्या मिळकतीबाबत, इतर दुसरे कोणाचाही, कोणत्याही प्रकारचा कायदेशीर हितसंबंध असल्यास, ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत खालील सही करणार ॲडव्होकेट यांजकडे प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासह लेखी हरकत कळवावी. मुदतीत कोणाचीही कसलीही हरकत न आल्यास, आमचे अशिल सदर मिळकत विकत घेण्याचा व्यवहार, म्हणजेच खरेदीखत करून पूर्ण करतील. तसेच मागाहून येणारी हरकत आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही.

कळावे

**ॲड. संदिप मारूती घरत**

कर्जत दि. ०४/०१/२०२५ ऑफिस:- श्री. साई सावली, सो.लि.दुसरा मजला, ब्लॉक नं.१० कर्जत दिवाणी कोर्टासमोर, ता.कर्जत, जि.रायगड, पिन-४१०२०१.
मो. ९२२०६५३३०२/८४४६७२४९८८

# उरण महाविद्यालयात सावित्रीबाई फुले जयंती संपन्न

**उरण :** कोकण ज्ञानपीठ उरण वाणिज्य व कला महाविद्यालयातील राष्ट्रीयसेवायोजनाविभागाच्यावतीने क्रांतीज्योती सावित्रीबाई फुले यांची जयंती साजरी करण्यात आली.

महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. एम.जी. लोणे यांच्या मार्गदर्शनाखाली संपन्न झालेल्या या कार्यक्रमात प्रमुख पाहुणे म्हणून प्रा. आनंद गायकवाड उपस्थित होते. त्यांनी सावित्रीबाई फुले यांच्या जीवन चरित्रावर प्रकाश टाकताना त्यांनी केलेला संघर्ष व स्त्री शिक्षणासाठी दिलेला लढा याविषयीचे सविस्तर विवेचन केले.

कार्यक्रमाचे अध्यक्ष आयक्युएसी समन्वयक डॉ. ए. आर. चव्हाण हे होते. त्यांनी अध्यक्षीय समारोपात सावित्रीबाई फुले यांचे चरित्र समजून घेणे प्रत्येक भारतीय नागरिकांचे कर्तव्य असून विद्यार्थ्यांनी त्यांच्यापासून आदर्श घेतला पाहिजे, असे सांगितले. कार्यक्रमात डॉ. एच के जगताप, प्रा. रियाज पठाण, प्रा. निलोफर मुकरी, प्रा. पूजा गुप्ता, प्रा. हन्नत शेख, प्रा. विनिता तांडेल, प्रा. रामकृष्ण ठावरे आदी शिक्षक, शिक्षकेतर कर्मचारी व मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते.

MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

**SRM E-TENDER NOTICE**

**MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender specification.**

| Sr. No. | Tender/Notice No. | Particulars of Tender | Estimated Cost of Tender |
|---|---|---|---|
| 1. | **Tender No:-** EE/ EHV (O&M)/DIVN/MHD/Tech/ E-Tender-44/2024-25 Dtd.04.01.2025 RFX No. 7000034769 | **Sub:-** Invitation SRM E-tender for the work of measurement of tower footing impedance of 220kV & 100kV lines under Line maintenance Sub Division Mahad under EHV (O&M) Division Mahad. | Rs. 3,54,265/- (including GST + 1% Labour CESS). |

EMD will be the 1% of the estimated cost or 5000/- whichever is the highest & tender fee will be the 500/- + GST.

Bid submission is from 04.01.2025 @ 00:00 hrs to 18.01.2025 @23:59Hrs for above tender
For further details visit our website:- **https://srmetender.mahatransco.in**.
**Contact Person:-** The Addl. Executive Engineer, (O) : Phone No.7373101089
Note: All eligible Supplier / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL.

**-Sd/-**
**Executive Engineer, EHV(O&M) Dn. Mahad**

**तहसिलदार तथा कार्यकारी दंडाधिकारी यांचे न्यायालय**
(तहसिलदार कार्यालय, मुरुड-जंजिरा, दरबार रोड, ता.मुरुड जि. रायगड)

ज.म.र.अर्ज २०६/२०२४

**जाहीर नोटीस**

श्री. मोहम्मद नादिर मोहम्मद अन्वर तांबे,
रा.मु.पो.राजपुरी, ता.मुरुड, जि.रायगड — अर्जदार

**विरूद्ध**

ग्रामसेवक,
ग्रुप ग्रामपंचायत राजपुरी, — सामनेवाला
ता. मुरुड-जंजिरा, जि.रायगड

सदर या जाहिर नोटीसीव्दारे सर्व लोकांस कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदार श्री. मोहम्मद नादिर मोहम्मद अन्वर तांबे, यांचा जन्म दि. ०७/०२/१९८३ रोजी राहत्या घरी मौजे राजपुरी, ता. मुरुड-जंजिरा जि.रायगड येथे झाला आहे. त्यांच्या जन्माची नोंद ग्रुप ग्रामपंचायत राजपुरी, कार्यालय यांचे जन्म-मृत्यु नोंद रजिस्टरला नसल्याचा दाखला सामनेवाला यांनी अर्जदार यांस दिलेला आहे. त्यामुळे जन्म नोंदीचे आदेश मिळणेकरीता मुरुड न्यायालयांत रजिस्ट्रेशन ऑफ बर्थ/मॅरेज ॲण्ड डेथ ॲक्ट कलम १९६१ चे कलम १३ (३) अन्वये अर्ज दाखल केलेला आहे. तरी, श्री. मोहम्मद नादिर मोहम्मद अन्वर तांबे, यांचा जन्म दि. ०७/०२/१९८३ रोजी जन्म झाल्याबाबत कोणाचीही हरकत असल्यास ती त्याने स्वतः मे. न्यायालयांत दि. ११/०२/२०२५ रोजी सकाळी ११:०० वाजता समक्ष हजर राहून द्यावी. मुदतीत हरकतीन आल्यास कोणाचीही कोणतीही हरकत नाही असे समजुन अर्जदार यांनी जन्म-मृत्यु नोंद रजिस्टर मध्ये जन्माची नोंद होणेकरीता सामनेवाला यांना आदेश देण्यात येईल व मागावुन येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही.

आज ता. २४/१२/२०२४ रोजी माझ्या सहीनिशी व न्यायालयाच्या शिक्क्यानिशी दिली.
कळावे.

सही/-
ठाणे अंमलदार
मुरुड पोलीस ठाणे

सही/-
**(रोहन शिंदे)**
**तहसिलदार मुरुड-जंजिरा**

**जाहीर सुचना**

तमाम जनतेस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते की, मौजे चोंढी, ता.अलिबाग, जि.रायगड येथील खालील परिशिष्टात नमूद केलेली शेतजमिन मिळकत श्री. संतोष नथुराम काठे, श्रीमती निलीमा चंद्रकांत घरत, श्रीमती सुषमा द्वारकानाथ राऊत, श्रीमती वनिता अरुण चेऊलकर पुर्वाश्रमीची रत्नप्रभा नथुराम काठे, श्रीमती रेश्मा रमेश घरत पुर्वाश्रमीची विद्या नथुराम काठे, श्रीमती रसिका रविंद्र घरत पुर्वाश्रमीची शोभा नथुराम काठे, राहणार किहीम-कामथ, ता.अलिबाग, जि.रायगड यांच्या निर्वेध मालकी हक्काची असून, सदर शेतजमिन मिळकत, सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांकडून, माझ्या अशिलांनी कायमस्वरुपी खरेदी करण्याचे मान्य व कबूल केले असून, त्या आशयाचा करार सदर मिळकतीचे विद्यमान मालक व माझे अशिला दरम्यान स्वाक्षरीत झाला आहे. सदरील जमिन मिळकत पूर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकांनी माझे अशिलांस दिला आहे.

खालील परिशिष्टामध्ये नमुद केलेल्या मिळकतीवरील श्री. संतोष नथुराम काठे, श्रीमती निलीमा चंद्रकांत घरत, श्रीमती सुषमा द्वारकानाथ राऊत, श्रीमती वनिता अरुण चेऊलकर, श्रीमती रेश्मा रमेश घरत व श्रीमती रसिका रविंद्र घरत, यांच्या मालकी हक्काचा तपास करुन, मालकी हक्क निर्वेध असले बाबतचा दाखला त्यांस देणेचा आहे. तरी ज्या व्यक्ती/संस्था यांचा परिशिष्टात नमूद मिळकतीमध्ये गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, लिज, लियन, चार्ज, अन्नवस्त्र, पोटगी, करारपत्र, मृत्यूपत्र, वहिवाट वा अन्य कोणत्याही तऱ्हेचा हक्क हितसंबंध असल्यास ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ (चौदा) दिवसांचे आत त्यासंबंधी लेखी हरकती खालील पत्त्यावर कागदोपत्री पुराव्यानिशी पाठवाव्यात. सदरच्या मुदतीत कोणाचीही कसल्याही तऱ्हेची हरकत न आल्यास वर नमूद मिळकत निर्वेध आहे असे समजून तसा दाखला माझे अशिलांना देण्यात येईल व माझे अशिल त्यांचा सदर मिळकतीचा खरेदी व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही, याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी. हे सर्वांस कळावे.

**वर नमूद केलेल्या मिळकतीचे परिशिष्ट**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर) | आकार (रु.पैसे) |
|---|---|---|---|
| चोंढी, ता. अलिबाग | १३९ | ०-५५-८० ०-०४-९० पो.ख. ०-६०-७० एकूण | ०४-९९ |

अलिबाग,
दिनांक : ३१/१२/२०२४.

सही/
**(ॲड.संजय म.भगत)**
हिराबाग सोसायटी,
अे विंग, टिळक रोड,
अलिबाग-रायगड.
खरेदीदारांचे वकील

**जाहीर नोटीस** दिनांक ०३/०१/२०२५

तमाम जनतेस या जाहीर नोटीसीने असे सुचीत करण्यात येत आहे की, आमचे अशिल यांनी मौजे पोखरकरवाडी, ता. कर्जत, जि. रायगड येथील.

| मालकाचे नाव | सर्व्हे/हिस्सा | क्षेत्रफळ | आकार |
|---|---|---|---|
| श्री. शरद मधुकर पोखरकर वगैरे | ७/४ | ०-२०-८० पैकी ०-०७-५ | ०-०५ |
| श्री. अरुण पांडुरुग मोहिते वगैरे | ८/१४ | ०-७७-०० | ०-४१ |
| | ८/१३ | ०-२०-०० | ०-१६ |

च्या शेतजमीन मिळकती विद्यमान मालक यांचे कडून कायमस्वरुपी खरेदी करावयाच्या ठरविलेल्या आहेत. तसा उभयातांमध्ये व्यवहार घडून आलेला आहे.

तरी उपरोक्त शेतजमीन मिळकतींमध्ये कोणाही व्यक्तीचा कसलही अगर ताबा, बयाणपावती, साठेकरार, गहाण, दान, बोजा, लीन, लीज, भाडेपट्ट, अगर फरोक्त वा इतर कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध असल्यास सदरील नोटीस प्रसिद्ध झाल्यापासुन २१ दिवसाचे आत खाली सही करणार अधिवक्ता यांचेकडे आपल्या हरकती पुराव्यासह लेखी स्वरुपात दाखल कराव्यात सदर मुदतीत हरकती न आल्यास उपरोक्त जमीन मिळकत निर्वेध व बोजारहीत आहे. असे समजुन इतर कोणाही व्यक्तींचा कसलाही कोणताही कायदेशीर हक्कहितसंबंध नाही. व असल्यास ते जाणीपुर्वक आमचे अशिलांचे लाभात सोडून दिलेले आहेत. असे समजुन कायदेशीर बाबींची पुर्तता करुन आमचे अशिल उपरोक्त जमिन मिळकती संदर्भातचा खरेदी व्यवहार पुर्ण करतील आणि मग मुदतीनंतर उपस्थित केलेली कोणतीही हरकत वा तक्रार आमचे अशिल यांचेवर बंधनकारक राहणार नाही. याची या जाहीर नोटीसने तमाम जनतेने नोंद घ्यावी.

येणेप्रमाणे जाहीर नोटीस आहे.
**ॲड. प्रमोद नथुराम सुर्वे**
रा. मातोश्री निवास आवळस, ता.कर्जत, जि.रायगड
भ्रमणध्वनी क्र. ०९८८१५७९५५५

**जाहीर नोटीस**

माझे आशिल यांनी दिलेल्या माहिती वरून व सांगितले वरून त्यांचेतर्फे सर्व लोकांस या जाहीर नोटीशीने कळविणेत येते ते पुढील प्रमाणे. माझे आशिल यांनी खाली नमुद केलेल्या मिळकती संदर्भात श्री. मोहन एस. रायना, मु. २०१, दुसरा मजला, एकता पॅनोरमा, व्ही. एन. पुरव मार्ग, ग्रेगोरियस हायस्कुल जवळ, चेंबुर, मुंबई -४०००७१ यांचे मालकी हक्काची तपासणी करण्याच्या सुचना दिल्या आहेत.

०१) मौजे नागांव, ता.अलिबाग, जि. रायगड व ग्रुप ग्रामपंचायत नागांव हद्दीतील खालील वर्णनाचे मिळकती.

**परिशिष्ट ''अ''**

| गट क्रमांक | क्षेत्र हे.आर.चौरस मिटर | आकार रू. पैसे |
|---|---|---|
| ६१० | ००.६१.५० | २०.३१ |

सदर मिळकतीस चर्तु:सिमा खालील प्रमाणे.
पुर्वस : गट नं. ६२४ (काही भाग), गट नं. ६०९, गट नं. ६२५ आणि साडेचार मिटर रूंदीचा गाव रस्ता.
पश्चिमेस : गट नं. ६११, गट नं. ५१२, गट नं. ५११ आणि सहा मिटर रूंदीचा गाव रस्ता.
दक्षिणेस :- गट नं. ६१३ व गट नं. ६१४ ची मिळकत.
उत्तरेस - गट नं. ६०५ व गट नं. ६०७ ची मिळकत.

**परिशिष्ट ''ब''**

| गट क्रमांक | क्षेत्र हे आर. चौरस मिटर | आकार रू. पैसे |
|---|---|---|
| ६११ | ००.२७.४० | १०.५६ |

सदर मिळकतीस चर्तु:सिमा खालील प्रमाणे.
पुर्वस :- गट नं. ६१० आणि त्यामधील विहीर.
पश्चिमेस :- गट नं. ५११, गट नं. ६१० ची मिळकत.
दक्षिणेस :- गट नं. ६१२ व गट नं. ६१३ ची मिळकत.
उत्तरेस :- गट नं. ६१० ची मिळकत.

सदरहू मिळकत, त्यामधील विहीर, इतर बांधकाम अशी मिळकत, त्यात असलेला झाड झाडोरा वहिवाटीचे हक्क, वहिवारंग, वगैर सह अशी मालमत्ता सदर मिळकतीचे विद्यमान मालक श्री. मोहन एस.रायना, चेंबुर, मुंबई - ७१ यांचे मालकी हक्काची असल्याचा भरवसा श्री. मोहन एस.रायना यांनी दिला आहे. या उपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, फरोक्त, साठेकरार, कब्जा वहीवाटीचे हक्क, कुळ वहिवाट वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती कागदोपत्री पुराव्यासह लेखी स्वरूपात नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे मुदतीत खाली सही करणार यांजकडे सादर कराव्यात. मुदतीत कोणाचीही, कसलीही हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे, असे समजण्यात येईल व मालकी हक्काची खात्री करून त्या अनुषंगाने दाखला देण्यात येईल. मागाहून कोणाचीही हरकत विचारात घेतली जाणार नाही, याची नोंद घ्यावी.

अलिबाग
तारीख ०३.०१.२०२५

**(ॲड. सुयश सुयोग बारटके)**
मु.पो.ता.अलिबाग, जि. रायगड

## निवडक



### माथेरान घाटात मालवाहू पिकअपला अपघात

**माथेरान :** घाटात मालवाहू पिकअप टेम्पोला अपघात झाला. उतारावर वाहन चालकाचे नियंत्रण सुटल्याने टेम्पो उलटला. यामधे डीजे साऊंड सामान असल्याचे सांगण्यात आले. या अपघातात चालक आणि अन्य दोन जण किरकोळ जखमी झाल्याचे सांगण्यात आले आहे. नेरळ माथेरान घाटात नवीन वर्षाला वाहनाचे अपघाताचे सत्र सुरू झाल्याचे चित्र आहे. साडेनऊ वाजण्याच्या सुमारास मालवाहू पिकप टेम्पोला घाटात अपघात घडला. जुम्मापट्टी येथील प्रसिद्ध एस टन वळणावर पीकप टेम्पोला उतरत असताना अपघात घडला. यामध्ये चालक आणि अन्य दोन साथीदार किरकोळ जखमी झाले आहेत. सुरुवातीला येथे वाहनांना अडथळा निर्माण झाला होता. मात्र, वाहतूक सुरळीत सुरू झाली होती. माथेरान घाटात वाहन चालक जास्त क्षमतेपेक्षा मालाची वाहतूक करतात. त्यामुळे वाहनाचे ब्रेक न लागणे, चालकांचे वाहनावरील नियंत्रण सुटण्याचे प्रकार घडत आहेत.



### कुणबी युवती महिला सामाजिक संघटनेची दिनदर्शिका प्रकाशित

**माणगाव :** माणगाव तालुका कुणबी युवा मंच मुंबई(रजि) सामाजिक संघटना अंतर्गत कुणबी युवती महिला सामाजिक संघटना (मुंबई ) यांच्या माध्यमातून दिनदर्शिका प्रकाशन सोहळा ज्ञानेश्वर खराडे यांच्या अध्यक्षतेखाली गुजराती सेवा मंडळ माटुंगा येथे आनंदमय वातावरणात संपन्न झाला. सदर प्रकाशन सोहळ्यास कुणबी युवा मंच मुंबई माणगाव तालुका पदाधिकारी अध्यक्ष ज्ञानेश्वर खराडे, उपाध्यक्ष दत्तगुरू उभारे, सुनील माठल, सचिव सत्यजित भोनकर, खजिनदार नारायण शिंदे, सहसचिव काशिनाथ शिंदे, सहखजिनदार विनायक म्हस्के, नरेश भोसले, संपर्कप्रमुख संतोष उंडरे, राजेश शिर्के, संतोष उभारे, सल्लागार श्रीधर भोईर, राजेश शिर्के, मधुकर टेंबे, सदस्य चंद्रकांत टेंबे, श्रीराम जुमारे, वैभव शिंदे, किरण शिगवण, रुपेश वाढवळ, महिला संघटना अध्यक्षा रूपेक्षा भोस्तेकर, उपाध्यक्षा अस्मिता शिंदे, सहसचिव सलोनी पाटेक, संघटक स्वप्नाली शिंदे, संपर्कप्रमुख स्वरूपा भोईर, कल्पना खराडे, सल्लागार दिपाली शिर्के, सदस्य विशाखा तेटगुरे, समीक्षा दळवी, चेतना तेटगुरे, बेबी सुरेश टेंबे आदींसह माणगाव तालुक्यातील समाज बांधव मोठ्या संख्येने उपस्थित होते.



### सुनंदा लाड पुरस्काराने सन्मानित

**कर्जत :** जय किसान फार्मस फोरमचे कृषिरत्न पुरस्कार संपन्न, भारताचे पहिले कृषिमंत्री डॉ. पंजाबराव देशमुख जयंती निमित्त नाशिक येथिल रावसाहेब थोरात सभागृहात पुरस्कार संपन्न करण्यात आले.या सर्वांचे कार्यक्रमाच्या वेळी खासदार भास्कर भगरे आमदार सुधीर सावेत, राहुल ढीकले, ज्येष्ठ कृषी शास्त्रज्ञ डॉक्टर जयरा पुरकर, मुंबई आकाशवाणीचे संचालक डॉ. इफकोच्या संचालिका साधना जाधव आदी मान्यवर उपस्थित होते. इफकोच्या संचालिका साधना जाधव यांच्या हस्ते कर्जत मधील सदूभाव फाउंडेशन मुंबई शाखा प्रकल्प अधिकारी सुनंदा लाड यांना 'समाजरत्न' पुरस्कार तसेच ट्रॉफी, पैठणी सन्मानपत्र देऊन सन्मानित करण्यात आले.



### खारपाटील बंधूंचे कार्य गौरवास्पद

**चिरनेर :** ग्रामीण भागात आधुनिक सोयी सुविधा उपयुक्त शाळा उभारण्याची संकल्पना पी.पी. खारपाटील साहेबांची आहे. त्यांनीच हा पाया रचला. आता त्यावर कळस चढविण्याचे काम दादांबरोबर राजाशेठ खारपाटील हे करत आहेत. ही गोष्ट कौतुकास्पद आहे, असा खारपाटील बंधूंच्या गौरवास्पद कार्याचा उल्लेख उरणचे वरिष्ठ पोलीस निरीक्षक जितेंद्र मिसाळ यांनी आपल्या भाषणातून केला.

चिरनेर येथील पी.पी. खारपाटील एज्युकेशन सोसायटीच्या शाळेचा वार्षिक स्नेहसंमेलन उद्‌घाटन सोहळा पार पडला. त्यावेळी ते उद्घाटन पर भाषणात बोलत होते. यावेळी व्यासपीठावर पी.पी. खारपाटील, एकनाथ पाटील, राजेंद्र खारपाटील, के. एन.शेट्टी, अमरसिंह राऊत, समीर खारपाटील, सागर खारपाटील, परीक्षित ठाकूर, वर्षा खारपाटील, सुनिता खारपाटील, अर्चना ठाकूर, व्ही.ए. पाटील, एम.एन. पट्टेबहादूर, सुप्रिया पाटील, सुरेश पाटील, अलंकार परदेशी, रमाकांत पाटील, तसेच अन्य मान्यवर उपस्थित होते.

प्रारंभी उद्योगपती राजेंद्र खारपाटील यांनी उपस्थित मान्यवरांचे स्वागत केले. या शाळेच्या शिक्षकांकडून तुम्हाला ज्ञानाचे धडे दिले जात आहेत. त्या शिक्षकांना मी सन्मान देतो. या शाळेने आधुनिकतेकडे झेप घेतली आहे. सामाजिक, शैक्षणिक, उद्योग, धार्मिक अशा विविध क्षेत्रात मोलाचे योगदान देणाऱ्या खारपाटील बंधूंची ही किमया असून त्यांच्या कार्याचा मी गौरव करतो, असे उद्गार जितेंद्र मिसाळ यांनी शेवटी काढले.

पोलादपुरातील अमर कदम या तरुणाची यशोगाथा

# जिद्दीच्या जोरावर ड्रॅगन फ्रूट्सची शेती

| शैलेश पालकर |
| पोलादपूर |





मुंबईतून पोलादपूर तालुक्यातील नाणेघोळ गावाकडे कोरोना लॉकडाऊननंतर परतलेल्या अमर राजेंद्र कदम या तरूणाने गेल्या तीन-चार वर्षांमध्ये प्रचंड मेहनत आणि चिकाटीच्या जोरावर प्रायोगिक शेती करीत 'ड्रॅगन्स फ्रूट्स'ची यशस्वी शेती केली आहे. या शेतीतून लाखो रूपयांचे उत्पादन करून गावाकडून मुंबईकडे नोकरीधंद्यासाठी जाणाऱ्या तरूणांना गावाकडेच प्रायोगिक शेती करण्याचा संदेश दिला आहे.

कोरोना लॉकडाऊन काळात अनेकांच्या आयुष्याची दिशा बदलली. अमर राजेंद्र कदम या तरूणाचे पदवीचे शिक्षण सुरू असताना त्याचे वडील राजेंद्र कदम यांनी अमरला गावाकडे पोलादपूर तालुक्यातील नाणेघोळ येथील जमिनीवर शेती करून उदरनिर्वाहाचे साधन निर्माण करण्याचा सल्ला दिला. लहानपणी चिखलमाती हाताला लागली तरी किळस वाटणारा अमर या सल्ल्यामुळे विचारात पडला. यानंतर अमरने कोकणात विशेषत: पोलादपर तालुक्यातील उताराच्या जमिनीवर ठिबक सिंचनाद्वारे पाणी उपलब्ध करून घेता येणाऱ्या पिकांचे प्रयोग करण्याचे ठरविले. अमरने पारंपरिक भातशेती करण्याऐवजी सुरूवातीला कलिंगड, अननस, झेंडूची फुले अशी पिके घेतली. याच काळात ड्रॅगन फ्रूटस्‌च्या शेतीचा विचार अमरला शेती माती आणि हवामानाच्या अभ्यासामुळे सुचला. पोलादपूर तालुका कृषी विभागाचे मोरे, गुंड आणि भरत कदम यांनी अमरला ड्रॅगन्स फ्रूटसची शेती करण्याचा अभिनव प्रयोग करण्यासाठी रोपे मिळवून देण्यासाठी मार्गदर्शन केले. पंचायत समिती कृषी विभागाचे अरूण धीवरे यांनी कुंपणासाठीचे अनुदान देण्याची तयारी दर्शविली. मात्र, अमर कदमने स्वयंप्रेरणेने या प्रायोगिक शेतीमध्ये तन-मन झोकून काम सुरू केले. कुंपणासाठी सिमेंट पोल आणि जाळ्यादेखील अमरने शेतावरच तयार करून जोडधंदा सुरू केला. सुरूवातीला ३५० ड्रॅगन फ्रुट्ससाठी पोल उभे करणाऱ्या अमरने आतापर्यंत १२०० ड्रॅगन फ्रुट्ससाठी पोल उभे केले आहेत. सुरूवातीला दोन वर्षे कठोर परिश्रम आणि केवळ मेहनत करताना अमरला अपेक्षित उत्पादन येण्याबाबत साशंकता निर्माण झाली. बाजारपेठेची मागणी आणि आंतरराष्ट्रीय कृषीक्षेत्रात मागणीच्या तुलनेत ड्रॅगन फ्रूट्सचे उत्पादन व्हीएतनाम आणि चीनमध्ये २० टक्के उत्पादन होते. त्यामुळे भारतात हा प्रयोग यशस्वी झाल्यानंतर पोलादपूरसारख्या ग्रामीण तालुक्यामध्ये अनेक तरूण जर या ड्रॅगन्स फ्रूट पिकासाठी सरसावले, तर आंतरराष्ट्रीय बाजारपेठेच्या मागणीनुसार मोठ्या प्रमाणात पुरवठा पोलादपूर तालुक्यातून केला जाऊ शकेल, असा आत्मविश्वास अमरने व्यक्त केला. वर्षातून दोन वेळा या रोपांची वाढ होऊन पावसाळ्यामध्ये फळांचे उत्पादन होण्याची वेळ आल्यानंतर अमरने दीड वर्षांमध्ये फारसे खर्च व उत्पन्नाचे समीकरण जमून आले नसले तरी त्यानंतर दोनच वर्षांमध्ये खर्च वजा जाता खर्चाच्या दुपटीने निव्वळ नफा सुरू झाला असून, ही शेती २५ वर्षांपर्यंत दुपटीने उत्पन्न देणारी आहे तसेच ड्रॅगनचे झाड हे निवडुंग प्रकारचे असल्याने या झाडाला रोग बुरशी व करपा होण्याची शक्यता नसते, अशी माहिती अमरने यावेळी दिली. अमरने गेल्या तीन-चार वर्षांमध्ये वाडवडिलांच्या जमिनीवर आंब्यांची फळबाग तसेच लिंबांची बाग लावून काही वेगळ्या रोपांचे प्रायोगिक तत्त्वावर संवर्धन सुरू केले असल्याने मुंबईचा अमर आता खेड्यातच रमल्याने सुरूवातीला तो मुंबईची वाट धरेल, असे उपहासाने बोलणारे गावकरी आता अमरच्या चिकाटीसह जिद्द, मेहनतीची तसेच प्रायोगिक शेतीची प्रशंसा करू लागले आहेत. गावाकडून मुंबईकडे नोकरी धंद्यासाठी गेलेल्या तरूणवर्गाने गावाकडेच प्रायोगिक पध्दतीची शेती केल्यास उत्पन्नाचे साधन गावाकडे निर्माण करता येऊन इतरांना मार्गदर्शन करण्याची मानसिकता अमरला आता गावाकडे चला अशी प्रेरणा देण्यासाठी ड्रॅगन्स फ्रूटसारख्या शेतीतून आंतरराष्ट्रीय बाजारपेठेची मागणी पूर्ण करण्याइतपत उत्पादन करण्यासाठी प्रवृत्त करीत आहे.

## बालवैज्ञानिकांचे कौतुक करावे तेवढे कमीच

### पोलीस उपविभागीय अधिकारी सविता गर्जे यांचे गौरवोद्‌गार

| म्हसळा | वार्ताहर |



म्हसळा हा ग्रामीण आणि डोंगराळ तालुका असून, शहरासारखे मार्गदर्शन आणि प्रयोगासाठी लागणाऱ्या अद्ययावत साहित्य मिळत नाही त्याही परिस्थितीत या तालुक्यातील ग्रामीण भागातील विद्यार्थ्यांनी आपले नैपुण्य सिद्ध करण्याचा यशस्वी प्रयत्न केला असून, त्यांचे जेवढे कौतुक करावे तेवढे कमी आहे, असे गौरवाने सांगून विद्यार्थ्यांचे मनोधैर्य वाढविले.

म्हसळा तालुका विज्ञान प्रदर्शन २०२४-२५ चे उद्घाटन उपविभागीय पोलीस अधिकारी सविता गर्जे यांच्या हस्ते न्यू इंग्लिश स्कूल आणि जुनिअर कॉलेज म्हसळा येथे करण्यात आले. याप्रसंगी सविता गर्जे विद्यार्थ्यांचे कौतुक करताना बोलत होत्या.

तहसीलदार सचिन खाडे यांनीही विद्यार्थ्यांचे विशेष कौतुक करून यातूनच उद्याचा नामवंत आणि देशाचे नाव उंचावील असा वैज्ञानिक तयार व्हावा, अशी अपेक्षा खाडे यांनी व्यक्त केली.

विज्ञान प्रदर्शनात प्राथमिक विभागाचे एकूण ३६, माध्यमिक विभाग १२, उच्च माध्यमिक १ आणि शिक्षकांमधून एकूण ९ प्रतिकृती मांडल्या होत्या.

## शारदा इंग्लिश मिडीयम स्कुलमध्ये वार्षिक स्नेहसंमेलन संपन्न

| नेरळ | वार्ताहर |

डिकसळ येथे असलेल्या शारदा इंग्लिश स्कुलच्या २२व्या वार्षिक स्नेहसंमेलन निमित्त शाळेच्या आवारात वार्षिक स्नेह संमेलन आयोजित करण्यात आले होते.

त्यावेळी कर्जत पंचायत समितीचे गटशिक्षण अधिकारी संतोष दौंड तसेच संस्थेचे अध्यक्ष सूरज ठाकूर, शालेच्या मुख्याध्यापिका किरण ठाकूर, आश्रमशालेचे मुख्याध्यापक रमेश चव्हाण, माजी सरपंच मोनिका साळोखे, पोलीस पाटील मंजिरी राऊत पाटील, सरिता शेळके पाटील, रायगड भूषण किशोर गायकवाड, आरपीआय युवकचे प्रदेश कार्यकारिणी सदस्य ॲड. उत्तम गायकवाड यांच्यासह जीवन पाटील, धनाजी भालेराव आदी मान्यवर उपस्थित होते.

यावेळी विद्यार्थ्यांना मान्यवरांनी मार्गदशन केले. शिशु वर्गापासून दहावी पर्यंत शिक्षण देणाऱ्या या शाळेत शिक्षण घेणाऱ्या विद्यार्थ्यांनी अनेक भाषांमध्ये सांस्कृतिक कार्यक्रम वार्षिक स्नेहसंमेलनामध्ये सादर केले.

## स्मिता पाटील यांना अष्टपैलू साहित्य भूषण पुरस्कार

| अलिबाग | वार्ताहर |



शैक्षणिक, सांस्कृतिक, सामाजिक व धार्मिक क्षेत्रातील राज्यस्तरीय उपक्रमशील संस्था मुंबई तर्फे दिला जाणारा अष्टपैलू साहित्य भूषण राज्यस्तरीय पुरस्कार यंदास्मिता पाटील यांना मिळाला आहे.

स्मिता पाटील या भारतीय साहित्यिक व सांस्कृतिक मंच तथा फ्रीडम स्टोरी ऑफ इंडिया जिल्हा रायगडमध्ये चार वर्षे रायगड जिल्हाध्यक्षा म्हणून कार्यरत आहेत. त्यासोबत रायगड जिल्हा परिषद प्राथमिक शाळेत शिक्षिका म्हणून त्या उल्लेखनीय कामगिरी करत आहेत. साहित्यिक कार्यासोबत त्यांचे सामाजिक,शैक्षणिक कार्यही खूप उल्लेखनीय आहे. त्यांच्या या कार्यातील योगदान बघून त्यांना आतापर्यंत राज्यस्तरीय गुणवंत शिक्षिका पुरस्कार, सावित्रीबाई फुले आदर्श शिक्षिका पुरस्कार, ग्लोबल महाराष्ट्र आयकॉन पुरस्कार, राष्ट्रपिता महात्मा फुले समाजभूषण पुरस्कार, अष्टपैलू काव्य भूषण पुरस्कार, जागतिक संसद आंतर राष्ट्रीय पुरस्कार, कोविड योद्धा पुरस्कार इत्यादी असे पुरस्कार मिळाले आहेत.

## कृषीवलच्या दणक्याने एसटी स्थानक स्वच्छ

| अलिबाग | प्रतिनिधी |



अलिबाग एसटी बस स्थानकाच्या आवारात कचऱ्याचा ढिगारा साचला होता. प्रवासी वर्गाकडून या अस्वच्छतेबाबत नाराजी व्यक्त करण्यात आली होती. कृषीवलने बातमीच्या रुपात याबाबत आवाज उठविल्यावर एसटी बस आगार प्रशासन तातडीने कामाला लागले. कृषीवलच्या दणक्याने साचलेला कचऱ्या ढीगारा काढून परिसर स्वच्छ केले.

अलिबाग एसटी बस आगारातून रोहा, पनवेल, मुरूड, कर्जत, खोपोली, पुणे, मुंबई, शिर्डी, नाशिक अशा अनेक ठिकाणी एसटी बसेस जातात. एसटीतून प्रवास करणाऱ्याची संख्या प्रचंड आहे. विद्यार्थी, ज्येष्ठ नागरिक, महिला आदी प्रवासी एसटीतून नियमीत प्रवास करतात. अलिबाग स्थानकात प्रवाशांची कायमच वर्दळ राहिली आहे. अलिबाग पर्यटनाच्या दृष्टीने महत्वाचा असल्याने या ठिकाणी येणाऱ्यांची संख्यादेखील वाढू लागली आहे. मात्र अलिबाग एसटी बस स्थानकात कचऱ्याचा ढिगारा पाहून अनेकांनी अस्वच्छतेबाबत नाराजी व्यक्त केली. अलिबाग स्थानकात असलेल्या कचऱ्याबाबत नाकच मुरडले. स्थानकात गेल्या अनेक दिवसांपासून हा कचरा पडून होता. याबाबत दैनिक कृषीवलने आवाज उठवत अलिबाग आगार बनले कचरा डेपो या मथळ्याखाली बातमी प्रसिध्द केली. कृषीवलच्या दणक्याने गुरुवारी प्रशासन खडबडून जागे झाले. शुक्रवारी सकाळी स्वच्छता कर्मचाऱ्यांच्या मदतीने कचऱ्या ढिगारा काढून परिसर स्वच्छ केला.

> अलिबाग स्थानकात असलेला कचरा काढण्याच्या सूचना केल्या. त्यानुसार शुक्रवारी आवारात पडलेला कचरा काढण्याचे काम कर्मचाऱ्यांनी केले. आता हे परिसर स्वच्छ झाले असून त्याठिकाणी कचरा टाकू नये अशी सूचना संबंधितांना देण्यात आली आहे.
> राकेश देवरे- व्यवस्थापक अलिबाग एसटी

## महाविद्यालयात वाचन प्रेरणा दिन साजरा

| कोलाड | वार्ताहर |



तटकरे चॅरिटेबल ट्रस्ट संचालित डॉ. श्री. नानासाहेब धर्माधिकारी कला वाणिज्य व विज्ञान महाविद्यालय गोवे कोलाडचे संस्थेचे सचिव संदीप तटकरे यांच्या मार्गदर्शनाखाली गुरुवारी (दि. २) वाचन प्रेरणा दिन साजरा करण्यात आला.

यावेळी मंचावर महाविद्यालयाचे प्राचार्य डॉ. विश्वास देशमुख, उपप्राचार्या नेहल प्रधान सर्व विभागाचे प्रमुख व प्राध्यापक उपस्थित होते. या कार्यक्रमाचे प्रास्ताविक डॉ. सावळे सतीश यांनी केले. मार्गदर्शन मनोगतात प्राचार्य डॉ. विश्वास देशमुख म्हणाले की, वाचन संकल्प हा उपक्रम आयोजित केला आहे. सर्व महाविद्यालयात असा उपक्रम वाचनाची प्रेरणा मिळावी तसेच विद्यार्थ्यांना चांगले पुस्तक ग्रंथांचे वाचन करून आपल्या ज्ञानात भर टाकावी आज आपण २१व्या युगात तंत्रज्ञानाच्या या जगात पुस्तके विसरलो आहोत. पुस्तकांची जागा आता मोबाईल, कॉम्प्युटरने घेतली आहे. वाचन संस्कृती कमी होत चालली आहे. पुस्तके फूटपाथवर आणि मोबाईल हातात आली आहेत असे जर झाले तर पुस्तके कोण वाचणार? असा एक प्रश्न समाजाला पडला आहे. पुस्तकांमुळे मस्तक सुधारते असे आपण म्हणतो, वाचाल तर वाचाल ही म्हण काही खोटी नाही प्रत्येकांनी ग्रंथ वाचून आपल्या सद्सद्विवेक बुद्धीला जागृत केले पाहिजे व जीवनात योग्य अयोग्य याची शहानिशा करून आपले जीवन चांगल्या प्रकारे जगता यावे यासाठी पुस्तकांचे वाचन करणे ही काळाची गरज आहे असे यावेळी आपले मत व्यक्त केले.

या कार्यक्रमाचे आभार डॉ. सतीश सावळे यांनी मांडले हा कार्यक्रम यशस्वी करण्यासाठी महाविद्यालयातील सर्व प्राध्यापक, प्राध्यापकेत्तर कर्मचारी व मोठ्या प्रमाणात विद्यार्थी उपस्थित राहून सहकार्य केले.

## पोलिसांनी रोखली जनावरांची वाहतूक

| पोलादपूर | वार्ताहर |



मुंबई गोवा राष्ट्रीय महामार्गावरील पुलावरून पहाटे दीड वाजण्याच्या सुमारास एका मिनी पिकअप टेम्पोमधून दाटीवाटीने जर्सी गाय आणि वासरू यांची दाटीवाटीने वाहतूक करणाऱ्या मद्यपि आणि विनालायसेन्स चालकाला आणखी एका इसमासोबत पोलादपूर पोलिसांनी ताब्यात घेतले आहे. पोलीस हवालदार दिलीप सारंगे यांनी दिलेल्या फिर्यादीनुसार विशाल निकम तर दुसरा धर्मेंद्र देव हे दोघे टेम्पोमधून दाटीवाटीने जर्सी गाय आणि वासरू यांची पशु वैद्यकीय अधिकाऱ्यांच्या तपासणी अहवालाशिवाय बेकायदेशीर वाहतूक करीत होते. यावेळी दोघेही मद्यपान केल्याचे ब्रिथ ॲनालायझरद्वारे तपासणीत निदर्शनास आले. तपासणीवेळी वाहन चालकाकडे ड्रायव्हिंग लायसेन्स आढळून आले नाही. यामुळे मिनी पिकअप टेम्पो किंमत ५ लाख तर जर्सी गाय ८० हजार रूपये तसेच जर्सी गायीचे वासरू १० हजार रूपये असा मुद्देमाल जप्त करण्यात आला आहे.

दोन आरोपींना पोलिसांनी केली अटक | समलैंगिक संबंध ठेवण्याच्या आग्रहातून हत्या

# दुहेरी हत्याकांडाच्या गुन्ह्याचा २४ तासात छडा

| पनवेल | वार्ताहर |



कामोठे वसाहतीमध्ये एका राहत्या घरामध्ये वृद्ध आईसह तिच्या मुलाचा मृतदेह सापडल्याने परिसरात खळबळ उडाली होती. या गुन्ह्याचा अवघ्या २४ तासात तपास करून आरोपींना अटक केली आहे.

कामोठे येथील ड्रीम्स सोसायटी येथे जितेंद्र भुषण जग्गी व त्याची आई गिता भूषण जग्गी (७०) हे मृत अवस्थेत वेगवेगळे बेडरुमध्ये मिळून आले होते. याप्रकरणी कामोठे पोलीस ठाण्यात अज्ञात इसमांविरुध्द गुन्हा नोंद करण्यात आला होता.

आरोपीचा शोध घेत असताना पोहवा तुकाराम सुर्यवंशी, यांना मिळालेल्या गोपनीय माहितीवरुन संज्योत मंगेश दोडके आणि शुभम महिंद्र नारायणी यांना उलवे परिसरातून ताब्यात घेण्यात आले. त्यांचेकडे गुन्ह्याचे अनुषंगाने विचारपूस केली असता जितेंद्र जग्गी हा त्यांच्या चांगले परिचयाचा असून जितेंद्र यांनी त्यांना ३१ डिसेंबर २०२४ रोजी रात्री त्याचे फ्लॅटमध्ये पार्टी करण्यासाठी बोलावले होते. तिथे तिघेही दारु प्याले. त्यानंतर जितेंद्र जग्गी हा त्यांना समलैंगिक संबंध ठेवण्याकरिता आग्रह करत असल्याने शुभम नारायणी याने एक्सटेंशन बोर्ड जितेंद्रच्या डोक्यात मारुन त्याला जीवे ठार मारले, तर संज्योत दोडके याने जितेंद्रच्या आईचा गळा आवळून ठार मारल्याचे आणि जाताना मोबाईल फोन, पाकीट, टॅब व काही दागीने नेले. दोन्ही आरोपींना अटक करण्यात आली आहे.

गुन्ह्याचा तपास कामोठे पोलीस ठाण्याच्या वरिष्ठ पोलीस निरीक्षक विमल बिडवे या करीत आहेत. सदरची कामगिरी वरिष्ठ पोलीस निरीक्षक उमेश गवळी, वरिष्ठ पोलीस निरीक्षक हनिफ मुलाणी, सपोनि अजित कानगुडे, पोउपनि मानसिंग पाटील, पोउपनि अभयसिंह शिंदे, पोउपनि माधव इंगळे, सपोनि संतोष चव्हाण, सपोनि एकनाथ देसाई, सपोनि सुरज गोरे, पोउपनि लिंगराम देवकाते, पोउपनि आकाश पाटील, पोउपनि किरण राऊत, पोउपनि अमोल चौगुले, पोहवा रमेश शिंदे, अनिल पाटील, प्रशांत काटकर, मधुकर गडगे, तुकाराम सुर्यवंशी, निलेश पाटील, दिपक डोंगरे, इंद्रजीत कानु, रुपेश पाटील, सागर रसाळ, अजित पाटील, पोलीस नाईक अजिनाथ फुंदे, पोलीस शिपाई विक्रांत माळी, लवकुश शिंगाडे यांनी पार पाडली.

# आधीच्या पापांचा हिशेब

नवीन वर्षात तरी नवे राज्य सरकार कामाला लागेल अशी अपेक्षा आहे. अजूनही काही मंत्र्यांनी पदभार स्वीकारलेला नाही. दत्तात्रय भरणे आणि योगेश कदम यांची नावे याबाबत घेतली जातात. इतर काही मंत्र्यांनी काल पूजा वगैरे करून कार्यालयात प्रवेश केला. अन्य काहींनी आपल्या कार्यालयांचे काम चालू असल्याची सबब दिली. आता काम करायला लागा असे देवेंद्र फडणवीसांना त्यांना सांगावे लागले. गतिमान सरकार देण्याचे वायदे करणाऱ्यांची ही स्थिती आहे. दरम्यान, लाडकी बहीण योजनेची छाननी होणार असल्याचे काल पहिल्यांदा जाहीर करण्यात आले. विधानसभा निवडणुकीमध्ये या योजनेच्या आधारे अडीच कोटी महिलांना पैसे वाटले गेले. इतक्या मोठ्या संख्येने महिला अडीच लाख उत्पन्नाच्या निकषात कशा बसतात असा प्रश्न तेव्हाही अनेकांना पडला होता. पण मतांवर डोळा ठेवून योजना रेटली गेली. त्यामध्ये सरकारी वा खासगी नोकरी करणाऱ्या, चारचाकी गाड्या बाळगणाऱ्या अनेक महिलांनी पैसे घेतले. आता निवडून आल्यावर सरकार अक्कल आल्यासारखे दाखवत आहे. कारण, प्रश्न पैशांचा आहे. महिना १५०० च्या हिशेबाने ४६ हजार कोटी रुपये वर्षाला लागणार आहेत. २१०० च्या हिशेबाने हीच रक्कम ६५ हजार कोटींवर जाईल. ती पाहून आता सरकारच्या डोळ्यापुढे तारे चमकू लागले आहेत. त्यामुळे मग अपात्र बहिणींना यापुढे पैसे न देण्याचे ठरवण्यात आले आहे. अशी कारवाई नेमकी किती जणींबाबत होते यावर लक्ष ठेवावे लागेल. कारण, ज्या महिलांच्या पात्रतेबाबत तक्रार आली तरच त्यांची छाननी होईल असे सरकारने म्हटले आहे. अशा तक्रारी जनतेतून येण्याची शक्यता कमी आहे. त्यासाठी सरकारी यंत्रणेला स्वतःहूनच हालचाल करावी लागेल. आमदार व मंत्री लोक आपापल्या मतदारसंघात हे होऊ देणार का हे पाहावे लागेल. अशा छाननीनंतर अपात्र ठरलेल्या महिलांना यापुढे पैसे मिळणार नाहीत हे ठीक. पण त्यांना आधी मिळालेले पैसे हेही बेकायदा घेतलेला लाभ ठरतात. ते सरकार वसूल करणार का हा कळीचा प्रश्न आहे.

### एसटीतील भ्रष्टाचार

मूळ छाननी करताना सरकारी कर्मचाऱ्यांनी पुरेशी दक्षता घेतली नाही म्हणून त्यांच्यावरही कारवाई होणार का हा दुसरा प्रश्न आहे. या दोन्हींची उत्तरे बहुदा नाही अशी असतील. कारण, या लोकांमुळेच महायुतीचा स्वार्थ साधला गेला आहे. या योजनेचा लाभ रेशन कार्डाच्या आधारे दिला जातो. पण रेशन कार्डे हाच मुळी सर्वात मोठा भ्रष्ट प्रकार आहे. केशरी व पिवळी बोगस रेशनकार्डे लाखोंच्या संख्येने अस्तित्वात आहेत. शिवाय त्यांच्यावरच्या अनेक नोंदीही खोट्या आहेत. योजनेचा आढावा घेताना खरे तर या कार्डांपासूनच सुरुवात करायला हवी. ते होणार नाही. निवडणुकीच्या काळात भरमसाठ आश्वासने व योजनांचा पाऊस पाडण्यात आला. त्यातला एक प्रस्ताव होता एसटी महामंडळासाठी १३१० नवीन बस भाडेतत्वावर घेण्याचा. डिझेलवर चालणाऱ्या या बसेससाठी प्रति किलोमीटर सुमारे बारा रुपये जादाचा दर मान्य करण्यात आला व त्यामुळे एसटी महामंडळाला जवळपास दोन हजार कोटींचा फटका बसला असा अंदाज आहे. आधीच हे महामंडळ व्हेंटिलेटरवर आहे. दर महिन्याचे पगार होतील की नाही ही सततची चिंता असते. त्यात असले निर्णय घेणे म्हणजे महामंडळाचा खुनाचे कारस्थानच म्हणायला हवे. ऐन निवडणुकीच्या तोंडावर रायगड जिल्ह्याचे सुपुत्र आणि गेल्या अडीच वर्षांपासून मंत्रीपदासाठी आसुसलेले भरतशेट गोगावले यांची महामंडळाच्या अध्यक्षपदी नियुक्ती करण्यात आली होती. त्यांनीच घाईघाईने हा निर्णय घेतला का याची चौकशी करायला हवी. देवेंद्र फडणवीसांनी या कराराबद्दल नवीन परिवहनमंत्री प्रताप सरनाईक यांच्याकडे नाराजी व्यक्त केली व हा करार रद्द केला अशा बातम्या आहेत. देवेंद्र किती कर्तव्यकठोर आहेत अशी त्यांची प्रतिमा निर्माण करण्यासाठी असल्या बातम्या आणि कथा चांगल्या असल्या तरी त्यातूनही काही प्रश्न निर्माण होतात. गोगावले यांनी घेतलेला निर्णय तेव्हाच्या मंत्रिमंडळासमोर मंजुरीसाठी आला असेलच. त्यावेळीही देवेंद्र उपमुख्यमंत्री होतेच. त्यांनी या प्रस्तावाला डोळे झाकून मंजुरी दिली असेल तर गोगावले किंवा जे कोणी दोषी असतील त्यांच्याइतकेच देवेंद्रही दोषी ठरतील. मुख्यमंत्री एकनाथ शिंदे व अर्थमंत्री अजित पवार यांच्यावरही हा ठपका येतोच. हे सर्वजण या पापाची जबाबदारी स्वीकारणार काय आणि त्याबद्दल प्रायश्चित्त म्हणून काय करणार हा यातला खरा सवाल आहे. दुर्दैवाने, राज्यातले विरोधी पक्ष इतके गलितगात्र आहेत की असे प्रश्न विचारण्याइतकी शक्ती व बुध्दीही त्यांच्यात शिल्लक राहिलेली नाही. आणि टीव्ही इत्यादी मिडियाचे म्हणाल तर तो दिवसरात्र देवेंद्रांच्या आरत्या ओवाळण्यात मग्न आहे.

### सर्व लाभार्थी मोकाट

विजेवर चालणाऱ्या गाड्या हाही महामंडळातला असाच आणखी एक भ्रष्टाचार आहे. गेल्या फेब्रुवारीमध्ये ५१५० बसेस भाडेतत्वावर घेण्याचे ठरले. एकनाथ शिंदे यांच्या हस्ते योजनेचे ठाण्यात उद्घाटन करण्यात आले. दर महिन्याला २१५ गाड्या येतील असे जाहीर झाले. म्हणजे दहा महिन्यात किमान २१५० गाड्या यायला हव्या होत्या. प्रत्यक्षात वर्षभरात केवळ १६८ गाड्या आल्या. हा भाडेकरार इतका गैरसोयीचा आहे की एसटीला दर किलोमीटरला २० ते २५ रुपये तोटा सहन करावा लागतो आहे. मात्र हा चुकीचा करार करणाऱ्या अधिकाऱ्यांवर कोणतीही कारवाई केली गेलेली नाही. तशी ती होणारही नाही. कारण, तशी ती केली तर मंत्र्यांचे काय असा प्रश्न निर्माण होईल. तो एकनाथ शिंदे आणि मंडळींना गैरसोयीचा आहे. उघडच यात प्रचंड भ्रष्टाचार झाला आहे. मात्र त्याचे लाभार्थी असेच मोकाट राहणार आहेत. महायुतीच्या काळात घडलेल्या गुन्हेगारी प्रकरणांबाबतही हेच घडले आहे. बदलापूर, मालवण पुतळा ही सहज आठवणारी उदाहरणे आहेत. मुंबईत घाटकोपरला महाकाय होर्डिंग पडून काही लोक मेले. त्या होर्डिंगला परवानगी देणाऱ्या महापालिका अधिकाऱ्यांवरही कोणतीही कारवाई झालेली नाही. आरोग्य विभागातील बनावट औषधांचे प्रकरण अलिकडेच बाहेर आले होते. याचाही थेट संबंध महायुतीच्या गेल्या सरकारातील मंत्री तानाजी सावंत व अधिकाऱ्यांशी होता. मात्र त्यांच्याविरुध्द कारवाईचा क देखील उच्चारण्यात आलेला नाही. या सर्व आधीच्या पापांचा हिशेब प्रामाणिक व सच्चे देवाभाऊ कधी तरी करतील काय?

## विचार

# बिघडलेली 'इंडिया' आघाडी

**लोकसभा निवडणुकीनंतर अवघ्या सहा महिन्यांमध्ये 'इंडिया' आघाडीमध्ये बिघाडी सुरू झाली आहे. विरोधक कोण आणि मित्र कोण याचे भान 'इंडिया' आघाडीतील घटक पक्ष गमावून बसले आहेत. आता एकमेकांना संपवण्याची भाषा सुरू झाली आहे. 'इंडिया' आघाडीतील ही बिघाडी भाजपच्या पथ्यावर पडणारी आहेच, पण विरोधकांच्या एकजुटीचे संधीसाधू रुपही दाखवून देणारी आहे.**



**राही भिडे**

विरोधी पक्षांच्या 'इंडिया' आघाडीमध्ये काही दिवसांपासून गोंधळ सुरू आहे. हा गोंधळ काँग्रेसला सर्वाधिक अस्वस्थ करत आहे. तृणमूल काँग्रेसच्या नेत्या ममता बॅनर्जी यांनी 'इंडिया' आघाडीचे नेतृत्व करण्यास तयार असल्याचे सांगितले तेव्हा 'इंडिया' आघाडीमध्ये सर्व काही ठीक नाही, याचे संकेत मिळाले. उद्योजक गौतम अदानी प्रकरणावरून काँग्रेस संसदेत गोंधळ घालत असताना हे ममता यांचे हे वक्तव्य आल्यानंतर 'इंडिया' आघाडीमधील इतर सर्व पक्ष अदानी मुद्द्याला महत्त्व देण्यास फारसे तयार नसल्याचे स्पष्ट झाले. काँग्रेसला अदानी मुद्द्यावर प्रादेशिक पक्षांपुढे झुकावे लागले, हे विचित्र आहे. ममता या 'इंडिया' आघाडीच्या योग्य नेत्या असल्याच्या विधानांना इतर काही नेत्यांनी आणि विशेषतः लालूप्रसाद यादव यांनीही पाठिंबा दिला होता. समाजवादी पक्षाचे सरचिटणीस रामगोपाल यादव यांनी 'इंडिया'चे नेते राहुल नसून मल्लिकार्जुन खर्गे असल्याचे सांगितल्यावर काँग्रेसच्या मित्रपक्षांना राहुल यांचे नेतृत्व आवडत नसल्याचे स्पष्ट झाले. काँग्रेस राहुल गांधी यांच्याकडे 'इंडिया' आघाडीचे केवळ नेतेच नाही, तर भावी पंतप्रधान म्हणूनही पाहत आहेत. अलीकडेच आम आदमी पक्षाच्या नेत्यांनी दिल्लीतील काही काँग्रेस नेत्यांवर दिल्ली लोकसभा निवडणुकीत 'आप'चा पराभव करून भाजपच्या विजयाला हातभार लावल्याचा आरोप केला. त्यामुळे 'आप' आणि काँग्रेसमधील दरी वाढत चालली आहे. हरियाणा विधानसभेच्या निवडणुकीत काँग्रेसने युती न करता स्वबळावर निवडणूक लढवल्यापासून या दोन पक्षांत कमालीचे अंतर वाढले आहे. भाजपपेक्षा आता तेच परस्परांचे शत्रू असल्यासारखे वागायला लागले आहेत.

दरम्यान, आम आदमी पक्षाचे नेते काँग्रेसवर संतप्त झाले आहेत. अजय माकन यांनी तर केजरीवाल यांच्यावर फसवणुकीचा आरोप केला आहे. ज्या केजरीवाल यांनी तत्कालीन मुख्यमंत्री शीला दीक्षित यांचा पराभव केला, त्यांचे चिरंजीव माजी खासदार संदीप दीक्षित हेच आता केजरीवाल यांच्या विरोधात विधानसभेची निवडणूक लढवणार आहेत. 'आप'ने खासगी संस्थांमार्फत सुरू केलेल्या सर्वेक्षणाविरोधात दीक्षित यांनी आता उपराज्यपालांकडे तक्रार केली आहे. 'आप'ची महत्त्वाकांक्षी 'महिला सन्मान योजना' आता चौकशीच्या फेऱ्यात अडकली आहे. २०१३ मध्ये आम आदमी पक्षाला पाठिंबा देऊन सरकार स्थापन करणे ही काँग्रेसची चूक होती, हे आता माकन यांनी मान्य केली. गेल्या लोकसभा निवडणुकीत दिल्लीत आम आदमी पक्षाशी झालेली आघाडीही त्यांनी अयोग्य ठरवली आहे. माकन यांनी तर केजरीवाल यांना देशद्रोही म्हटले. त्यांच्या वक्तव्यानंतर दिल्लीचे मुख्यमंत्री आतिशी आणि राज्यसभा सदस्य संजय सिंह यांनी इशारा दिला की, काँग्रेसने माकन यांच्यावर कारवाई न केल्यास आम आदमी पक्ष आघाडीतील पक्ष 'इंडिया'मधून काँग्रेसला हटवण्याची मागणी करेल.

वास्तविक पाहता, 'इंडिया' आघाडीतून काँग्रेसची हकालपट्टी करण्याची मागणी हास्यास्पद आहे. 'इंडिया' आघाडीतील घटक पक्षांमधील तणाव वाढत असल्याचे यावरून दिसून येते. काँग्रेसच्या नेतृत्वाखाली 'इंडिया' स्थापना झाली, तेव्हा ही आघाडी केवळ भाजपला पर्यायी धोरणे आणि विचारांद्वारे विरोध करणार नाही, तर देशाला राजकीय दिशा देण्याचे काम करेल, असे मानले जात होते; परंतु ती पर्यायी विचार देऊ शकली नाही. 'इंडिया' आघाडी देशासमोर कोणताही प्रभावी दृष्टीकोन किंवा किमान समान कार्यक्रम मांडू शकली नाही. भाजपला राज्यघटना बदलायची आहे, असे वातावरण काँग्रेसच्या नेतृत्वाखालीच निर्माण झाले. अशा वातावरणामुळे लोकसभा निवडणुकीत काँग्रेसला ९९ जागा मिळाल्या आणि भाजपच्या जागा २४० वर आल्या, तेव्हा विरोधी 'इंडिया' आघाडीचा विजय झाल्यासारखे वातावरण तयार करण्यात आले. हा प्रचार काँग्रेसने सर्वाधिक केला; पण हरियाणा आणि नंतर महाराष्ट्राच्या निवडणुकीच्या निकालांनी लोकसभेच्या निवडणुकीतील 'इंडिया' आघाडीने मिळवलेला विजय हा अपघात होता, हे सिद्ध झाले. कर्नाटक, तेलंगणा, मध्य प्रदेश, राजस्थान, छत्तीसगड, हिमाचल आणि काही प्रमाणात हरियाणा-पंजाबमध्ये काँग्रेसचे प्रभावी अस्तित्व आहे. इतर राज्यांमध्ये ती एक तर खूपच कमकुवत आहे किंवा प्रादेशिक पक्षांच्या दयेवर आहे. लोकसभेमध्ये दुसऱ्या क्रमांकाचा पक्ष म्हणून तो नक्कीच उदयास येतो; पण त्यात मित्रपक्षांचे योगदान आहे.

दिल्लीमध्येही काँग्रेसची पिछेहाट झाली आहे. विधानसभा निवडणुकीमध्ये केजरीवाल काँग्रेससोबत समन्वय साधणार नसल्याचे दिल्लीमध्ये आधीच स्पष्ट झाले होते. दिल्लीमध्ये आम आदमी पक्ष, भाजप आणि काँग्रेसमध्ये तिरंगी लढत होऊ शकते. गेल्या दहा वर्षांच्या सत्ताविरोधी समस्येवर मात करण्यासाठी आम आदमी पक्ष जोरदार प्रयत्न करत आहे. तिरंगी लढत न झाल्यास भाजपकडून 'आप'चा पराभव होईल. भाजपसाठी तिरंगी लढत होण्याची शक्यता आहे. काँग्रेसने दिल्लीमध्ये जोर लावून निवडणूक लढवू नये, असे 'आप' ला वाटते, तर दिल्लीत काँग्रेसची ताकद वाढली, तरच 'आप'चा पराभव करता येईल, असे भाजपचे गणित आहे. दिल्लीत जोरदार मुकाबला करायचा असेल, तर भाजपसह काँग्रेसला 'आप'वर हल्लाबोल करावा लागणार आहे. दिल्लीनंतर बिहार विधानसभेची निवडणूक होणार आहे. तिथे झारखंडमधील झारखंड मुक्ती मोर्चाप्रमाणेच काँग्रेस राष्ट्रीय जनता दलावर अवलंबून असेल. काँग्रेसला स्वतःचे भले करायचे असेल तर प्रादेशिक पक्षांसारखे राजकारण करणे टाळावे लागेल. काँग्रेसने जातनिहाय जनगणना, दलित आणि मागासवर्गीयांचे एकत्रीकरण, अल्पसंख्याकांचे तुष्टीकरण, आंबेडकरांचा वारसा आदींच्या आधारे राजकारण केले, तर प्रादेशिक पक्षांना अडचणी येतील असा अंदाज आहे. प्रादेशिक पक्षांच्या मुद्द्यांवर काँग्रेसने राजकारण करणे टाळले, म्हणून 'इंडिया' आघाडीच्या नेतृत्वाचा प्रश्न निर्माण झाला यात आश्चर्य नाही.

काँग्रेसला राष्ट्रीय पक्ष म्हणून आपली प्रतिमा मजबूत करायची असेल आणि भाजपचा मुकाबला करायचा असेल, तर मूळ विचारसरणीच्या आधारे राजकारण करावे लागेल. मित्रपक्षांनी स्वबळावर राजकारण करायला सुरुवात केली आणि काँग्रेसला सोडचिठ्ठी दिली तर लोकसभेतील संख्याबळाचा आलेख खाली जाईल, हे काँग्रेसला माहीत नाही असे नाही; परंतु तिला उमगत नाही. काँग्रेस बळकट झाली तर ती आपल्यासाठी धोक्याचे ठरेल, हे भाजपलाही ठाऊक आहे. त्यामुळे काँग्रेसला लक्ष्य करण्याबरोबरच तो मित्रपक्षांनाही इशारा देत आहे. प्रादेशिक पक्षांनी काँग्रेसला सोडचिठ्ठी देणे भाजपच्या पथ्यावर पडणार आहे. आपली स्थिती सुधारण्यासाठी काँग्रेसला भाजपशी एकहाती लढा द्यावा लागेल. सध्या काँग्रेसची केवळ काही राज्यांमध्ये भाजपला स्वबळावर तोंड देण्याची क्षमता आहे. गेल्या महिनाभरात अनेक प्रमुख मुद्द्यांवर 'इंडिया'आघाडीतील सहा पक्षांनी काँग्रेसला सोडचिठ्ठी दिल्यामुळे 'इंडिया' आघाडी पुन्हा संयुक्त पुरोगामी आघडीत बदलत असल्याची चर्चा आहे. २०२३ मध्ये, विरोधी पक्षांनी संयुक्त पुरोगामी आघाडी संपवून 'इंडिया' आघाडीची स्थापना केली.

नितीशकुमार यांनी २०२२ मध्ये 'यूपीए'च्या विस्ताराची कल्पना मांडली. यासाठी त्यांनी केजरीवालांपासून ममता बॅनर्जींपर्यंत आणि अखिलेश यादवांपासून माकपच्या सीताराम येचुरींपर्यंत सर्वांशी संपर्क साधून रणनिती आखली. त्यानंतर जुलै २०२३ मध्ये २६ पक्षांसोबत 'इंडिया' आघाडी तयार झाली. त्यात द्रमुक, राष्ट्रवादी काँग्रेस, झारखंड मुक्ती मोर्चा, राष्ट्रीय जनता दल या पक्षांचा भारत आघाडीमध्ये समावेश होता. समाजवादी पक्ष, 'आप', तृणमूल काँग्रेस, 'बीएपी' आणि 'आरएलपीए' यासारखे नवीन पक्षही आघाडीत सामील झाले. तथापि, जानेवारी २०२४ मध्ये नितीशकुमार यांनी आघाडी सोडत 'एनडीए'मध्ये सामील झाले होते. समाजवादी पक्ष हा लोकसभेतील तिसरा सर्वात मोठा पक्ष 'इंडिया' आघाडीमध्ये असला, तरी अनेक प्रसंगी या पक्षाने समाजवादी पक्षापेक्षा वेगळी भूमिका घेतली आहे. काँग्रेस नेते राहुल गांधी यांच्या संभल दौऱ्यावरून दोन्ही पक्षांमध्ये मतभेद झाले होते. आता अखिलेश यांनी दिल्ली निवडणुकीत आम आदमी पक्षाला पाठिंबा देऊन आपले इरादे व्यक्त केले आहेत. ममता यांच्या तृणमूल काँग्रेसचाही 'इंडिया' आघाडीमध्ये समावेश आहे; परंतु ममतांनी गेल्या तीन वेळा काँग्रेसला धक्का दिला आहे. येचुरी यांच्या निधनानंतर काँग्रेस आणि माकपमधील संबंधही चांगले चाललेले नाहीत. केरळमध्ये २०२६ मध्ये विधानसभा निवडणुका होणार आहेत. तिथे मुख्य लढत माकप आणि आणि काँग्रेस आघाडीमध्ये आहे. राष्ट्रीय लोकतांत्रिक पक्ष हा हनुमान बेनिवाल यांचा पक्ष असून सहा महिन्यांनंतर त्यांचे काँग्रेससोबतचे संबंध बिघडले. भारतीय आदिवासी पक्षाचा २०२४ मध्ये 'इंडिया' आघाडीत समावेश करण्यात आला.

एकंदरीत, इंडिया आघाडीतील दरी चांगलीच रुंदावली आहे.

## चर्चा आजची

# शैक्षणिक गळतीचे आव्हान कायमच

**सुयोग आंग्रे**

प्रजासत्ताक दिनी शाळांना असणारी सुट्टी रद्द करण्याचे आदेश आले आहेत. या दिवशी शाळांना उपक्रम राबविण्याच्या सूचना दिल्याने शिक्षकांच्या देशाटनाच्या फुग्याला टाचणी लागली आहे. शासनाच्या शाळांमध्ये आजची स्थिती पाहिलीतर शिक्षक अधिक आणि विद्यार्थी कमी असे चित्र आहे. खासगी शाळांना मात्र सुगीचे दिवस आहेत. शासनाच्या शाळांमधील गळती रोखण्यासाठी प्रयत्नांची पराकाष्ठा केली जाते पण प्रयत्नांती विद्यार्थीसंख्या वाढविण्याचे दिव्य उचलणे क्रमप्राप्त ठरणारे आहे. अन्यथा शासनाच्या शाळांना टाळे लावण्याशिवाय गत्यंतर उरणार नाही.

शैक्षणिक गळती हा खूप जुना आणि तितकाच चघळला गेलेला विषय आहे. शैक्षणिक गळतीची सांगितली जाणारी कारणेही पारंपरिकच आहेत. त्यांपैकी अनेक कारणे आज कालबाह्यही झालेली आहेत. परंतु स्वतः विचार न करता 'गुगलबाबा' सांगतो तेच खरे मानून आपल्या बुद्धीला ताण आणि त्रास द्यायचा नाही, हे बहुतेकांनी ठरवलेलेच असल्यामुळे या विषयावरील गुगलबाबाची मते आपलीच आहेत अशा आविर्भावात बिनधास्त मांडली जातात. त्यामुळे इतर अनेक समस्यांप्रमाणे या विषयावरही स्वतंत्रीत्या चिंतन झालेलं दिसत नाही. आपल्याकडील शिक्षणक्षेत्राशी संबंधित अनेक समस्या विशिष्ट औषध घेतलं की एखादा रोग जसा बरा होतो, तशा स्वरूपाच्या नाहीत. त्या दिसायला वरकरणी साध्या, सोप्या, सरळ वाटतात, परंतु त्या खूप जटिल असतात. त्यांची वरकरणी दिसणारी कारणे फसवी असतात. खरी कारणे आत दडून बसलेली असतात. ती शोधून काढल्याशिवाय त्या समस्या सोडवण्याचे उपाय सापडणे कठीण असते. शैक्षणिक गळती ही अशाच प्रकारची एक समस्या आहे.

गरिबी, जवळपास शाळा नसणे, वाहतुकीची व्यवस्था नसणे, आजारपण, अपंगत्व, शाळेत असुरक्षित वाटणे, पालकांचा व शिक्षकांचा परीक्षेत चांगले यश प्राप्त करण्यासाठीचा दबाव, घरकामात व अर्थार्जनात मदत करण्यासाठी मुलांची गरज ही जी शैक्षणिक गळतीची कारणे सांगितली जातात, ती सार्वत्रिक नाहीत. काही ठिकाणी, काहींच्या बाबतीत, काही प्रमाणात ती लागू होतील; परंतु याच कारणांमुळे सगळीकडील मुले शाळा सोडतात, हा दावा ग्राह्य धरता येणार नाही. या समस्येच्या मुळाशी सार्वत्रिक कारणे काय आहेत, याचा विचार केला तरच या समस्येवर काही प्रमाणात तरी उपाययोजना करता येईल. अर्ध्यावर शाळा सोडणारी मुलेच शैक्षणिक गळतीला जबाबदार नसतात. त्यांपैकी काही मुले शाळा सोडण्याचा निर्णय स्वतः घेत असतील. परंतु अनेकांच्या बाबतीत शिक्षक, पालक, शिक्षण व्यवस्था, अध्यापन पद्धती आणि समाजाचा शिक्षणाकडे बघण्याचा दृष्टिकोन या गोष्टी समस्येच्या मुळाशी असतात. म्हणून या समस्येचा विचार करताना आणि त्यावर उपाययोजना करताना सर्वंकष विचार करणे गरजेचे आहे. शिक्षण हे व्यक्तिमत्त्व विकासाचे, चारित्र्य निर्मितीचे, सामाजिक परिवर्तनाचे साधन आहे, हा विचार आपल्या ऋषिमुनींनी दिलेला आहे. परंतु शिक्षण हे अर्थार्जनाचे साधन आहे, हा व्यावहारिक विचार जेव्हा पूर्वसूरींच्या विचारांवर आरूढ झाला, तेव्हाच शैक्षणिक गळतीच्या महामार्गाचे खोदकाम सुरू झाले.

आजचा विद्यार्थी आणि पालक केवळ आपलाच विचार करतो. शिक्षणसंस्था प्रमुखांना आणि शिक्षकांना मात्र संपूर्ण शाळेचा आणि शाळेतील सर्व विद्यार्थ्यांचा विचार करावा लागतो. त्यामुळे शाळेत विशिष्ट शिस्तीचे, नियमांचे, संकेतांचे पालन विद्यार्थ्यांनी करणे अपेक्षित असते. परंतु, आजच्या बहुतांश विद्यार्थ्यांना शिस्त तथा नीतिनियम पाळण्याची सवय नाही. कौटुंबिक नियम न पाळण्याची सवय जडल्यामुळे आणि त्याला घरून मूक संमती मिळाल्यामुळे, शाळेत शिस्तीचे, नियमांचे पालन करणे विद्यार्थ्यांना फार मोठे संकट वाटते. वास्तविक विद्यार्थीदशेत नियम पाळण्याची लागलेली सवय भावी आयुष्यात उपयुक्त ठरते. पालकही अनेकवेळा शाळेचा विचार न करता आपल्या पाल्याचाच विचार करतात, आणि अशा अत्यंत मामुली कारणांसाठीही काही विद्यार्थी शाळेला रामराम करतात. यासाठी विद्यार्थी, पालक आणि शिक्षकांचं समुपदेशन आवश्यक आहे. अनेक योग्य, उपयुक्त आणि चांगल्या गोष्टी या योग्य, व्यवस्थित आणि चांगल्या पद्धतीने सांगितल्या जात नाहीत. त्यामुळे त्या ऐकून घेतल्या जात नाहीत. शिक्षणाचं महत्त्व, विद्यार्थीदशेत घेतलेले त्रास, शिस्त व नियम पाळण्यासाठी केलेली तडजोड भावी आयुष्य सुखी व समाधानी बनवण्यास कशी उपयुक्त ठरते, हे पालकांनी आणि शिक्षकांनी मुलांना व्यवस्थित रीतीने पटवून दिले तर शाळेपासून दूर जाणाऱ्या मुलांची संख्या कमी होईल.

## लोकसंसद

### कायद्याच्या अंमलबजावणीची गरज

मुंबईत सातत्याने आगीच्या घटना घडणे ही सामान्य बाब झाली असून गेल्या दोन वर्षात (२०२३, २०२४) मुंबईत १० हजार ३७० आगीच्या घटना घडल्याचे वास्तव समोर आले आहे. यामध्ये ५१ जणांचा दुर्दैवी मृत्यू झाला असून ४७९ जण गंभीर जखमी झाले आहेत. मुंबईत एकीकडे गगनचुंबी इमारतीचे जाळे पसरले असतानाच दुसरीकडे दिवसागणिक दाटीवाटीने वाढणाऱ्या झोपड्यांचे साम्राज्य उभे राहिले आहे. गॅस सिलिंडरच्या चुकीच्या हाताळणीमुळे होणारे सिलिंडरचे स्फोट, शॉर्ट सर्किटमुळे लागणाऱ्या आगी, न विझलेली रस्त्यावर फेकलेली सिगारेटची थोटके, मिळेल त्या जागी फोडलेले फटाके, रस्त्यावरून होणारी ज्वालाग्रही पदार्थांची बेकायदेशीर वाहतूक अशा अनेक कारणांमुळे आगी लागण्याचे प्रमाण वाढले आहे. अलीकडच्या काळात मुंबईतील रेस्टॉरंट, उपहारगृह, दुकाने, रहिवाशी इमारती, झोपडपट्ट्या, कारखाने, रुग्णालये, मॉल, गगनचुंबी इमारती, कार्यालये अशा सर्वच ठिकाणांना लोकांच्या निष्काळजीमुळे आगीने आपल्या कवेत घेतले. त्यामुळे मोठी जीवितहानी आणि वित्तहानी झाली आहे. आग सुरक्षा नियमांचे काटेकोर पालन होण्यासाठी महाराष्ट्र आग प्रतिबंधक व जीव संरक्षक उपाययोजना अधिनियम २००६ ची कठोर अंमलबजावणी करण्याची आवश्यकता आहे.

**– प्रदीप शंकर मोरे, अंधेरी**

### आर्थिक शिस्त बाळगणे जरुरीचे

महायुतीने विधानसभेच्या निवडणुकांचा तोंडावर अनेक लोकोपयोगी योजनांची घोषणा केली होती. याचा भार राज्यावर सुमारे ८० हजार कोटींचा पडणार आहे. मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांनी राज्याच्या आर्थिक तिजोरीवर कोणताही आर्थिक भार पडेल अशी आश्वासने देऊ नयेत असे आदेश मंत्र्यांना दिले आहेत अशी बातमी ऐकावयास मिळाली राज्याला आर्थिक शिस्त लावण्यासाठी मंत्री व आमदारांना कठोर सूचना केल्या आहेत असेही कळते. विधानसभा निवडणुका च्या आधी महायुती सरकारने लाडकी बहीण, विद्यार्थी बेरोजगार जेष्ठ नागरिक या घटकासाठी अनेक योजना जाहीर केल्या होत्या. त्याच्या तरतुदीसाठी ८० हजार कोटी रुपये आवश्यक आहेत. अर्थ खात्याच्या परवानगी शिवाय कोणतेही आर्थिक भार असेल असे निर्णय जाहीर करू नका असे आदेश मुख्यमंत्रीनी दिले आहेत. राज्याला आर्थिक शिस्त लावणे अत्यंत आवश्यक आहे. सध्या राज्यावर सुमारे साडे सात लाख कोटीचे कर्ज आहे. सन २०३० पर्यंत सुमारे पावणेतीन लाख कोटी रुपयांचे कर्ज फेडावे लागणार आहे.

**– शांताराम वाघ, पुणे**

## दिनविशेष

# अनाथांची माय सिंधुताई सपकाळ

अनाथांची माय म्हणून ओळखल्या जाणाऱ्या सिंधुताई सपकाळ यांचा ४ जानेवारी २०२२ रोजी निधन झाले. त्या एक सामाजिक कार्यकर्त्या असून अनाथ मुलांचे संगोपन करण्याच्या कार्यासाठी ओळखल्या जातात. तिच्या कार्याची ओळख सार्वत्रिक होती, ज्याची साक्ष तिला मिळालेल्या असंख्य पुरस्कार आणि सत्कारांद्वारे दिली जाते.

सिंधुताईंनी आपले संपूर्ण आयुष्य अनाथांसाठी समर्पित केले. परिणामी तिला प्रेमाने ममाईफ म्हटले जाते. सिंधुताईंचा जन्म १४ नोव्हेंबर १९४८साली वर्धा जिल्ह्यातील पिंप्री मेघे गावात झाला. वयाच्या १२ व्या वर्षी सिंधुताईंचे लग्न त्यांच्यापेक्षा २० वर्षांनी मोठ्या असलेल्या श्रीहरी सपकाळ यांच्याशी झाले. सासरच्या कुटुंबात शैक्षणिक वातावरण नसल्यामुळे चौथी उत्तीर्ण होऊन त्यांना शिक्षण सोडावे लागले. वयाच्या विसाव्या वर्षी सिंधुताईंना तीन मुले झाली आणि जेव्हा त्या चौथ्यांदा गरोदर राहिल्या तेव्हा त्यांच्या पतीने संशयातून त्यांना मारहाण करून घरातून हाकलून दिले. त्यानंतर सिंधुताईंना त्यांच्या माहेरीही आसरा मिळाला नाही. त्या दिवसभर भीक मागायच्या आणि रात्री स्टेशनवरच झोपायच्या. मग त्यांनी अनाथ मुलांना सांभाळून त्यांच्या जीवनाला दिशा देण्याचे ठरवले. हे त्यांच्या आयुष्याचे ध्येय बनले. यासाठी माईंनी १९९४ साली पुण्याजवळ पुरंदर तालुक्यात कुंभारवळण या गावात ममता बाल सदन संस्थेची स्थापना केली. या ठिकाणी अनाथ आणि बेवारस मुलांना आधार दिला, त्यांना जेवण, कपडे पुरवले. या अनाथ मुलांना आर्थिकदृष्ट्या स्वावलंबी केले. आर्थिकदृष्ट्या स्वयंपूर्ण झाल्यावर या युवक युवतींना योग्य जोडीदार शोधून त्यांची लग्न लावून दिली.

**'जागतिक ब्रेल दिवस'**

४ जानेवारी म्हणजे ब्रेल लिपीचे जनक लुई ब्रेल यांचा जन्मदिन. लुई ब्रेल यांनी ब्रेल लिपी विकसित करून अंध लोकांच्या आयुष्यात प्रकाश आणला. म्हणून लुई ब्रेल यांच्या स्मरणार्थ दरवर्षी ४ जानेवारी हा 'जागतिक ब्रेल दिवस' म्हणून साजरा केला जातो.

लुई ब्रेल यांच्या लहानपणी एका अपघातामुळे त्यांची दृष्टी गेली. योग्य वेळी योग्य ते उपचार न मिळाल्यामुळे हळूहळू त्यांच्या दुसऱ्या डोळ्यातील दृष्टीही खराब होऊ लागली आणि वयाच्या अवघ्या ८ व्या वर्षी ते पूर्णपणे अंध झाले. मात्र, ते खचून गेले नाहीत. त्यानंतर त्यांना अंधांसाठी 'ब्रेल लिपी' विकसित करण्याची कल्पना सुचली. आणि वयाच्या अवघ्या १५ व्या वर्षी त्यांनी ब्रेल लिपीचा शोध लावला, जे आज अंधांसाठी मोठे वरदान आहे. मात्र, त्यावेळी ब्रेल लिपीला मान्यता नव्हती. दुर्दैवाने, त्याच्या मृत्यूनंतरच ते वापरण्यासाठी मंजूर केले गेले. ६ जानेवारी १८५२ रोजी वयाच्या ४३ व्या वर्षी त्यांचे निधन झाले. ब्रेल लिपीला १८६८ मध्ये अधिकृत मान्यता मिळाली.

६ नोव्हेंबर २०१८ रोजी युनायटेड नेशन्स जनरल असेंब्लीने लुई ब्रेल यांचा जन्मदिन दरवर्षी ४ जानेवारी हा मजागतिक ब्रेल दिनफ म्हणून साजरा करण्याचा निर्णय घेतला. त्यानंतर ४ जानेवारी २०१९ रोजी प्रथमच जागतिक ब्रेल दिन साजरा करण्यात आला.

ब्रेल ही एक प्रकारची सांकेतिक भाषा असून अंध आणि अंशतः दृष्टिहिन लोकांसाठी वापरली जाणारी अतिशय स्पर्शक्षम लेखन प्रणाली आहे. या लिपीमुळे अंधांसाठीची शिक्षणपद्धती अधिक विकसित झाली.

# गोल्डन ग्रुपच्या अध्यक्षपदी वसंत भगत

**रसायनी** : गोल्डन ग्रुपच्या वार्षिक सर्वसाधारण सभेमध्ये वसंत भगत यांची सर्वानुमते अध्यक्षपदी निवड झाली तर सरचिटणीसपदी नीलकंठ भगत उपाध्यक्षपदी अनिल नलावडे आणि खजिनदारपदी रत्नाकर पाटील यांची देखील बिनविरोध निवड करण्यात आली.

गोल्डन ग्रुप हा समाजकारणात अग्रेसर राहिलेला ग्रुप आहे. गोल्डन ग्रुपतर्फे आजपर्यंत तालुक्यातील अनेक आदिवासी शाळांची दुरुस्ती करण्यात आली आहे त्याचप्रमाणे येथील विद्यार्थ्यांना दप्तरे वाटप, वह्या पुस्तकांचे वाटप, तसेच गणवेश वाटप कार्यक्रम करण्यात येत असतो. त्याचबरोबर महापुरुषांच्या जयंती व पुण्यतिथी साजरी करणे, आरोग्य शिबीर भरवणे असे कार्यक्रमदेखील गोल्डन ग्रुप राबवीत असतो. महाराष्ट्रात येणाऱ्या नैसर्गिक आपत्तींना सामोरे जात असताना गोल्डन ग्रुपने नेहमीच आपला मदतीचा हात आपत्तीग्रस्तांसाठी पुढे केला आहे. अनेक वेळा गोल्डन ग्रुपतर्फे नैसर्गिक आपत्तीग्रस्तांना आर्थिक मदत करण्यात आली आहे. यापुढे देखील गोल्डन ग्रुप समाजकारणात अशाच प्रकारे सहभाग घेत राहील अशी ग्वाही यावेळी नवनिर्वाचित अध्यक्ष वसंत भगत यांनी दिली. याप्रसंगी अमोल गवारी, विवेक पाटील, प्रकाश फडके, विजय पाटील, आशुतोष पाटील, पप्पू गायकवाड आदी उपस्थित होते.

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसद्वारे कळविण्यात येते कि, मौजे कुरूळ ता. अलिबाग जि.रायगड येथील खालील वर्णनाच्या मिळकतीचे विद्यमान मालक श्री. सुरेश गोपाळ पाटील यांच्याकडून माझ्या अशिलांनी कायम विकत घेण्याचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्रमांक व उपविभाग | क्षेत्र हे.आर | आकार रु.पैसे |
|---|---|---|---|
| कुरूळ ता. अलिबाग जि. रायगड | ७९/१/२/अ/१ | ०-०८-१० पो.ख ०-००-५० एकूण ०-०९-४० | १.७५ |

तरी वरील संदर्भात कोणाचाही विक्री, गहाण, दान, भाडेपट्टा, विक्रीचा करार, वारसाहक्क, बक्षीस, लीज, लीन, चार्ज, पोटगी, ताबा, इजमेंटरी हक्क, या अथवा अन्य कोणत्याही प्रकारचा हक्क हितसंबंध असल्यास त्यांना हि नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या आत खाली सही करणार यांच्या पत्त्यावर प्रथमदर्शनी कागदोपत्री पुराव्यासहित लेखी स्वरुपात हरकत घ्यावी.

वरील मुदतीत कोणाचीही, कोणत्याही प्रकारची लेखी हरकत न आल्यास सदर मिळकतीमध्ये कोणाचाही हक्क, हितसंबंध नाही. अगर असल्यास तो सोडून दिला आहे असे समजून सदर मिळकत हि निर्वेध व बोजारहित आहे असे गृहीत धरून सदर मिळकतीचे खरेदीखताचे व्यवहार पूर्ण करतील व मागाहून मुदतीनंतर आलेल्या हरकती आमच्यावर बंधनकारक राहणार नाहीत हे सर्वांस कळावे.

अलिबाग
दिनांक - ०४/०१/२०२५

**ॲड. आशिष संदीप रानडे**
रा. रानडे निवास तात्या रानडे मार्ग
शिवलकर नाका अलिबाग-रायगड
मो. नंबर - ९२७०२९४५४५

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसने असे कळविण्यात येते की, आमचे अशिल यांनी खालील वर्णन केलेली शॉप मिळकत तिचे मालक सौ.हेमा नानिक हिंगोराणी, रा. प्लॉट नं. १०२, पहिला मजला, गुलमार्ग पॅलेस, सेक्टर १७, उल्हासनगर ३, जि. ठाणे. यांचेकडून कायमची खरेदी करणेचे ठरविले आहे.

**मिळकतीचे वर्णन**

मौजे अलिबाग, ता.अलिबाग, जि. रायगड येथील सी.टी.एस.नं. १२७२ भाग व १२७८ भाग वरील शिव घनश्याम रेसिडेन्सी मधील तळ मजल्यावरील शॉप नं. ६, अलिबाग नगरपरिषद मालमत्ता क्रमांक ए.एल.बी००००४९६५(५९२/अ), कारपेट क्षेत्र १४६ चौ. फुट ही मिळकत.

संदर्भित मिळकत पुर्णतः निर्वेध व बिनजोखमी असल्याबाबतचा हवाला सदर मिळकतीच्या विद्यमान मालकाने आमचे अशिलांस दिला आहे. याउपरही संदर्भित मिळकतीत अन्य कोणाचेही कसल्याही तऱ्हेचे हक्क, हितसंबंध व अधिकार असल्यास त्यांनी ही सुचना प्रसिद्ध झाल्या दिनांकापासुन १५ दिवसांचे कालावधीत माझेकडे लेखी पुराव्यानिशी हरकत देऊन माझी खात्री पटवुन द्यावी विहित मुदतीत अशी कोणतीही लेखी हरकत न आल्यास माझे अशिल संदर्भित मिळकतीचा खरेदी व्यवहार पुर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत माझे अशिलांवर बंधनकारक राहणार नाही याची कृपया सर्वांनी नोंद घ्यावी.

अलिबाग,
दिनांक : ०३/०१/२०२५

**ॲड. अश्विनी अ. म्हात्रे**
बी. कॉम. एल. एल. बी.
००१, वैद्यबाग को.ऑप
हौ.सो.कामत आळी,
ता.अलिबाग, जि.रायगड.

## वाचकांसाठी निवेदन

कृषीवल वृत्तपत्रातून प्रसिद्ध होणाऱ्या विविध जाहिरातींची शहानिशा करुनच वाचकांनी संबंधितांशी व्यवहार करावेत. वर्तमानपत्रातून प्रसिद्ध जाहिरातीतील उत्पादने, सेवा किंवा त्यासंदर्भातील दावे यांची नागेश पब्लिशर्स प्रा. लि. कोणतीही हमी घेत नाही. त्या मजकुराच्या अथवा दाव्याच्या पूर्ततेसंदर्भातील कोणतीही जबाबदारी नागेश पब्लिशर्स प्रा.लि.चे मुद्रक, प्रकाशक, संपादक किंवा मालक यांच्यावर राहणार नाही, याची कृपया वाचकांनी नोंद घ्यावी.

- मुख्य संपादक

## MAHATRANSCO
Maharashtra State Electricity Transmission Co. Ltd.

## SRM E –TENDER NOTICE (THIRD CALL)

**MSETCL invites online bids (E-Tender) from reputed & registered Electrical contractors on Mahatransco Website https://srmetender.mahatransco.in for the following Tender specification.**

| Sr. No. | Tender/Notice No. | Particulars of Tender | Estimated Cost of Tender |
|---|---|---|---|
| 1. | **Tender No:-** EE/EHV (O &M) /DIVN/MHD/Tech/Third Call/E-Tender-32/2024-25 Dtd.04.01.2025 **RFX No.** 7000034249 | **Sub:-** Third Call for SRM E- Tender for Supply of digital Multimeter at various Substations under EHV (O&M) Division Mahad. | Rs.1,00,359/- (Including GST) |
| 2. | **Tender No:-** EE/EHV (O &M) /DIVN/MHD/Tech/Third Call/E-Tender-38/2024-25 Dtd.04.01.2025 **RFx No. –**7000034793 | **Sub:-**Third Call for SRM E-Tender for Supply of Discharge Rod at EHV(O&M) Division Mahad. | Rs.4,93,837/- (Including GST) |
| 3. | **Tender No:-** EE/EHV (O &M) /DIVN/MHD/Tech/Third Call/E-Tender-39/2024-25 Dtd. 04.01.2025 **RFx No. –**7000033413 | **Sub:-**Third Call for SRM E-Tender for Supply of Twin Terminal connector for Hybrid Pass at 220 kV Kandalgaon Substation EHV(O&M) Division Mahad. | Rs.1,85,260/- (Including GST) |

EMD will be the 1% of the estimated cost or 5000/- whichever is the highest & tender fee will be the 500/- + GST.
Bid submission is from 04.01.2025 @ 00:00 hrs to 13.01.2025 @23:59Hrs for above tender
For further details visit our website:-**https://srmetender.mahatransco.in**
**Contact Person:-** The Addl.Executive Engineer, (O) : Phone No.7373101089
Note:All eligible Supplier / Contractors are mandated to get enrolled on SRM E-Tenders (New) portal of MSETCL

**-Sd/-**
**Executive Engineer, EHV(O&M) Dn. Mahad**

## जाहीर नोटीस

अर्ज क्र. : -१८७/२०२४

**मे. कार्यकारी दंडाधिकारी सो., माणगांव यांचे न्यायालयात**

कु. सुजाता संजय घाडगे
वय २३ वर्षे, धंदा : शिक्षण — अर्जदार
रा. कडापेवाडी,
ता. माणगांव, जि. रायगड

विरुद्ध

१. निबंधक जन्म-मृत्यु व विवाह,
नोंदणी अधिकारी,
ग्रुप ग्रामपंचायत कडापे,
ता. माणगांव, जि. रायगड. — सामनेवाला
२. गटविकास अधिकारी सो.,
पंचायत समिती माणगांव,
ता. माणगांव, जि. रायगड.

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

सदरहू अर्जदार कु. सुजाता संजय घाडगे हिचा जन्म मौजे कडापेवाडी, ता. माणगांव, जि. रायगड. येथे दि. ०२/०९/२००१ रोजी राहत्या घरी झाला. तिची जन्माची नोंद सामनेवाल्याचे कार्यालय सदरी नसल्यामुळे सामनेवाल्याने तसा दाखला अर्जदार यांना जावक क्र. ७६ ने दि. १५/१०/२०२४ रोजी दिला आहे. त्यामुळे अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये अर्जदार हिचा जन्म मौजे कडापेवाडी, ता.माणगांव, जि.रायगड येथे दि. ०२/०९/२००१ रोजी राहत्या घरी झाला असल्याचे घोषित करून मिळणेकरीता कार्यकारी दंडाधिकारी माणगांव यांचे न्यायालयात जन्म व मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अन्वये व तशी नोंद दाखल होऊन दाखला मिळणेकरीता या न्यायालयाचा अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देणेस कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे किंवा कसे हे तपासण्याकरीता सदरची जाहीर नोटीस अर्जदारामार्फत दिली आहे. तरी सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरीता १ महिन्याचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे. न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळवावी.

विहीत मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार कु. सुजाता संजय घाडगे हिचा जन्म मौजे कडापेवाडी, ता. माणगांव, जि. रायगड. येथे दि. ०२/०९/२००१ रोजी राहत्या घरी झाला. असे गृहीत धरून आदेश देण्यात येईल.

माणगांव
ता. २७/१२/२०२४

सही /-
**कार्यकारी दंडाधिकारी माणगांव**

## जाहीर नोटीस

अर्ज क्र. :-१९१/२०२५

**मे. कार्यकारी दंडाधिकारी सो., माणगांव यांचे न्यायालयात**

श्रीम. वंदना दत्ताराम मारणे
लग्नापूर्वीचे नाव
श्रीम. अस्मिता आदेश शिर्के — अर्जदार
लग्नानंतरचे नाव
वय ५० वर्षे, धंदा : गृहिणी
रा. मु. वावे, पो. उणेगांव,
ता. माणगांव, जि. रायगड.

विरूद्ध

१. निबंधक जन्म-मृत्यु व विवाह,
नोंदणी अधिकारी,
ग्रुप ग्रामपंचायत उणेगांव,
ता. माणगांव, जि. रायगड. सामनेवाला
२. गटविकास अधिकारी सो.,
पंचायत समिती माणगांव,
ता. माणगांव, जि. रायगड.

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

सदरहू अर्जदार श्रीम. वंदना दत्ताराम मारणे- लग्नापूर्वीचे नाव व श्रीम. अस्मिता आदेश शिर्के - लग्नानंतरचे नाव हिचा जन्म मौजे वाव/निजामपूर, ता. माणगांव, जि. रायगड येथे दि. २५/१२/१९७४ रोजी झाला. तिची जन्माची नोंद सामनेवाल्याचे कार्यालय सदरी नसल्यामुळे साम नेवाल्याने तसा दाखला अर्जदार यांना जावक क्र.०१/२०२५ दि. ०२/०१/२०२५ रोजी दिला आहे. त्यामुळे अर्जदार हिने या न्यायालयामध्ये अर्जदार हिचा जन्म मौजे वावे/निजामपूर, ता. माणगांव, जि. रायगड येथे दि. २५/१२/१९७४ रोजी झाला असल्याचे घोषित करून मिळणेकरीता कार्यकारी दंडाधिकारी माणगांव यांचे न्यायालयात जन्म व मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अन्वये व तशी नोंद दाखल होऊन दाखला मिळणेकरीता या न्यायालयाचा अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देणेस कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे किंवा कसे हे तपासण्याकरीता सदरची जाहीर नोटीस अर्जदारामार्फत दिली आहे. तरी सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरीता १ महिन्याचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे. न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळवावी.

विहीत मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार श्रीम. वंदना दत्ताराम मारणे- लग्नापूर्वीचे नाव व श्रीम. अस्मिता आदेश शिर्के-लग्नानंतरचे नाव हिचा जन्म मौजे वावे / निजामपूर, ता. माणगांव, जि. रायगड येथे दि. २५/१२/१९७४ रोजी झाला. असे गृहीत धरून आदेश देण्यात येईल.

माणगांव
ता. ०३/०१/२०२५

सही/-
**कार्यकारी दंडाधिकारी माणगांव**

## जाहीर नोटीस

अर्ज क्र. १९६/२०२४

**मे. तालुका कार्यकारी दंडाधिकारी सो., माणगांव यांचे न्यायालयात**

श्री. बळीराम महादू म्हसकर
वय : ६८ वर्षे, धंदा : शेती,
कायमचा पत्ता :- रा. रिळे,
ता. माणगांव, जि.रायगड.
सध्याचा पत्ता :- रूम नं. ६१२/२, — अर्जदार
इंदिरा नगर, साल्ट पॅन रोड,
निअर साई बाबा मंदिर, वडाळा ईस्ट,
ॲनटॉप हिल मुंबई सिटी,
मुंबई - ४०००३७

विरुद्ध

१. निबंधक जन्म-मृत्यु व विवाह,
नोंदणी अधिकारी,
ग्रुप ग्रामपंचायत देगांव,
ता.माणगांव, जि.रायगड. — सामनेवाला
२. गटविकास अधिकारी सो.,
पंचायत समिती माणगांव,
ता.माणगांव, जि.रायगड.

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

सदरहु अर्जदार श्री. बळीराम महादू म्हसकर यांचे वडील कै. महादू धाकल्या म्हसकर हे दि. १३/०३/१९९७ रोजी मौजे रिळे, ता.माणगांव, जि.रायगड. येथे राहत्या घरी वयस्करपणात मयत झाले. त्यांचे मुत्युची नोंद सामनेवाल्याचे कार्यालय सदरी नसल्यामुळे सामनेवाल्याने तसा दाखला अर्जदार यांना दि. १३/०२/२०२४ रोजी दिला आहे. त्यामुळे अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये अर्जदार यांचे वडील कै. महादू धाकल्या म्हसकर हे दि. १३/०३/१९९७ रोजी मयत झाली असल्याचे घोषित करून मिळणेकरीता कार्यकारी दंडाधिकारी माणगाव यांचे न्यायालयात जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अन्वये व तशी नोंद दाखल होवून दाखला मिळणेकरीता या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देण्यास कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे. किंवा कसे हे तपासण्याकरीता सदरीची जाहीर नोटीस अर्जदारामार्फत दिली आहे. तरी सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरीता १ महिन्याचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळवावी.

विहीत मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार श्री. बळीराम महादू म्हसकर यांचे वडील कै. महादू धाकल्या म्हसकर हे दि. १३/०३/१९९७ रोजी मौजे रिळे, ता.माणगांव, जि.रायगड येथे राहत्या घरी वयस्करपणात मयत झाले. असे गृहीत धरून आदेश देण्यात येईल.

माणगांव :
ता.:२७/१२/२०२४

सही/-
**कार्यकारी दंडाधिकारी माणगांव**

## जाहीर नोटीस

अर्ज क्र.१९७/२०२४

**मे. तालुका कार्यकारी दंडाधिकारी सो., माणगांव यांचे न्यायालयात**

श्री. बळीराम महादू म्हसकर
वय : ६८ वर्षे, धंदा : शेती,
कायमचा पत्ता :- रा. रिळे,
ता. माणगांव, जि. रायगड.
सध्याचा पत्ता :- रूम नं. ६१२/२, — अर्जदार
इंदिरा नगर, साल्ट पॅन रोड,
निअर साई बाबा मंदिर, वडाळा ईस्ट,
ॲटॉप हिल मुंबई सिटी, मुंबई - ४०००३७

विरुद्ध

१. निबंधक जन्म-मृत्यु व विवाह,
नोंदणी अधिकारी,
ग्रुप ग्रामपंचायत देगांव,
ता. माणगांव, जि. रायगड. — सामनेवाला
२. गटविकास अधिकारी सो.,
पंचायत समिती माणगांव,
ता. माणगांव, जि. रायगड.

तमाम लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की,

सदरहु अर्जदार श्री. बळीराम महादू म्हसकर यांची आई कै. रूक्मिणी महादू म्हसकर ही दि. १९/०७/१९९४ रोजी मौजे रिळे, ता.माणगांव, जि.रायगड. येथे राहत्या घरी वयस्करपणात मयत झाली. त्यांचे मुत्युची नोंद सामनेवाल्याचे कार्यालय सदरी नसल्यामुळे सामनेवाल्याने तसा दाखला अर्जदार यांना दि. १३/०२/२०२४ रोजी दिला आहे. त्यामुळे अर्जदार यांनी या न्यायालयामध्ये अर्जदार यांची आई कै. रूक्मिणी महादू म्हसकर ही दि. १९/०७/१९९४ रोजी मयत झाली असल्याचे घोषित करून मिळणेकरीता कार्यकारी दंडाधिकारी माणगाव यांचे न्यायालयात जन्म-मृत्यु नोंदणी अधिनियम १९६९ चे कलम १३ (३) अन्वये व तशी नोंद दाखल होवून दाखला मिळणेकरीता या न्यायालयात अर्ज दाखल केला आहे. सदर दाखला देण्यास कोणाची कोणत्याही प्रकारची हरकत आहे. किंवा कसे हे तपासण्याकरीता सदरीची जाहीर नोटीस अर्जदारामार्फत दिली आहे. तरी सदर अर्जास कोणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत असल्यास त्याकरीता १ महिन्याचे मुदतीपर्यंत कागदोपत्री पुराव्यासह मे न्यायालयात हजर रहावे व आपली हरकत कळवावी.

विहीत मुदतीत कोणाचीही हरकत न आल्यास अर्जदार श्री. बळीराम महादू म्हसकर यांची आई कै. रुक्मिणी महादू म्हसकर ही दि. १९/०७/१९९४ रोजी मौजे रिळे, ता. माणगांव, जि. रायगड येथे राहत्या घरी वयस्करपणात मयत झाली. असे गृहीत धरून आदेश देण्यात येईल.

माणगांव :
ता. : २७/१२/२०२४

सही/-
**कार्यकारी दंडाधिकारी माणगांव**


# ऐश्वर्य ज्वेल कलेक्शन

१ ग्रॅम सोन्याचे प्लेटींग
दागिने-नविन डिझाइन्स



मोत्याचे दागिने– तन्मणी, चींचपेटी, बांगड्या, बाजुबंद. गॅरंटीचे दागिने– मंगळसूत्र, बांगड्या, पाटल्या, हार, माळ. डायमंड– कुंदन– पोलकी– सेट– मॅचिंग बांगड्या– कानातले. सर्व नामांकित कंपन्यांची कॉस्मेटीक्स, परफ्यूम, डीओ. वाजवी भाव आणि भरपूर व्हरायटीसाठी प्रसिद्ध दुकान.

**२/१२ पी.एन.पी. नगर, अलिबाग.**
**मोबाईल : ९८६०६५८५६५**


## कर्जत नगर परिषद
KARJAT MUNICIPAL COUNCIL
ता.कर्जत जि.रायगड पिन ४१०२०१
E-mail : karjatcouncil@gmail.com

जावक क्रमांकः कनप/२५४८/२४-२५ — दिनांकः ०३/०१/२०२५

### ई- निविदा सुचना

कर्जत नगरपरिषद, जि. रायगड १. कर्जत नगरपरिषदेची वंजारवाडी येथील दाबमोड टाकी (BPT) पाडणे. या कामाचे ई-निविदा मागविण्यात येत आहेत. सदर संपुर्ण निविदा प्रक्रिया ई निविदाद्वारे ऑनलाईन पद्धतीने संगणक प्रणाली होईल. सदर निविदा, नोटीसा, प्रसिद्धी, सुचना आवश्यक असणारी कागदपत्रे, शुद्धिपत्रक इत्यादीची माहिती https://mahatenders.gov.in या संकेत स्थळावर उपलब्ध होईल.

सही/-
**मुख्याधिकारी**
**कर्जत नगरपरिषद, कर्जत**

## जाहीर नोटीस

दिनांक : ०३/०१/२०२५

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यात येते की, मौजे-आवास, ता. अलिबाग, जि. रायगड, येथील गट नंबर ७३०/१/ब, एकूण क्षेत्र ०-२४-२० हे.आर., आकार ६.५० रू. पैसे या मिळकती पैकी क्षेत्र ०-१६-९० हे. आर., आकार ५.४१ रू. पैसे पैकी क्षेत्र ०-१२-०० हे.आर. ही बागायत मिळकत, या मिळकतीचे विद्यमान मालक रणजित प्रभाकर राणे रा.मु.पो.आवास, ता. अलिबाग, जि. रायगड यांच्याकडून आमच्या अशिलांनी सर्व हक्कांसह विकत घेण्याची ठरविलेली आहे. सदरहू मिळकत निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीचे विद्यमान मालक यांनी आमचे अशिल यांस दिला आहे. याउपरही सदरहू मिळकतीत कोणाचाही गहाण, दान, बक्षिस, फरोक्त, साठेकरार, कब्जा, बोजा, वहिवाटीचे हक्क, वारसाहक्क व हितसंबंध वा दुरान्वये देखील संबंध असल्यास अशा व्यक्तींनी आपल्या हरकती लेखी स्वरूपात कागदोपत्री पुराव्यासह खाली सही करणार खरेदीदार यांचे वकिल यांजकडे ही नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांच्या मुदतीत सादर कराव्यात. मुदतीत कुणाचीही कोणत्याही प्रकारची हरकत न आल्यास मिळकत निर्वेध आहे. असे समजून आमचे अशिल खरेदीखताचा व्यवहार पूर्ण करतील. मागाहून कोणाचीही, कसलीही हरकत विचारात घेतली जाणार नाही याची नोंद घ्यावी.

अलिबाग,
तारीख : ०३/०१/२०२५

**(ॲड. संजय द. म्हात्रे)**
पत्ता -श्रुती सारंग को.ऑप.हौ.सो.,ए विंग,
रूम नं. ५, युनियन बँकेच्या समोर, ब्राम्हणआळी,
अलिबाग, ता. अलिबाग जि. रायगड.

## जाहीर नोटिस

दिनांक : ०३/०१/२०२५

तमाम जनतेस कळविण्यात येते की, आमचे अशिल खालील नमुद केलेली मिळकत कायम खरेदी करण्याचे ठरविले आहे. तशा आशयाची बोलणी विद्यमान मालक दत्ताराम गोपाळ पवार यांचेसोबत झालेला आहे. सदरची मिळकत ही निर्वेध व बोजा विरहित असल्याचा भरवंसा आमचे अशिल विद्यमान मालक यांनी दिला असून सदर मिळकतीचे विक्री व्यवहारास कोणाचीही कसलीही हरकत असल्यास त्याची खातरजमा करणेकामी जाहीर नोटीस प्रसिद्ध करण्याचे काम आहे. त्या मिळकतींचे वर्णन खालीलप्रमाणे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्र व उपविभाग | क्षेत्र आर.चौ.मी. | आकार रू. पै. |
|---|---|---|---|
| वरंडे ता.अलिबाग | २२७ | ०.२६.४० पो.ख ०.०२.०० एकुण ०.२८.४० | ६.४८ |

तरी वरील सर्व मिळकतींचे संदर्भात कोणाचाही गहाण, दान, बक्षीस, लिज, फरोक्त, पोटगी, साठेकरार, वहिवाटीचे जाण्यायेण्याचे मार्ग, वारसा हक्क आदी कोणत्याही प्रकारे हक्क व हितसंबंध असल्यास व त्यांची वरील मिळकतीच्या विक्री व्यवहारास हरकत असल्यास त्यांनी त्यांची हरकत योग्य त्या कागदोपत्री पुराव्यानिशी हि नोटीस प्रसिद्ध झालेपासून होणाऱ्या १४ दिवसांचे मुदतीत खालील सही करणार याजकडे कळवावी. येणेप्रमाणे विहित मुदतीत कोणाचीही कसल्याही प्रकारची हरकत न आल्यास सदरची मिळकत निर्वेध व बिनजोखमी आहे असे समजून आमचे अशिल सदरचे मिळकतीचा विक्री व्यवहार पूर्ण करतील व मागाहून येणारी कोणतीही हरकत अशिलांवर बंधनकारक राहणार नाही. याची तमाम जनतेने नोंद घ्यावी हे कळावे.

अलिबाग
दिनांक : ०३/०१/२०२५

सही/-
**ॲड. प्रतिक्षा मोहन पाटील**
जिल्हा न्यायालय अलिबाग-रायगड

## ग्रुप ग्रामपंचायत नागांव
मु. पो. नागांव, ता.अलिबाग, जि.रायगड, पिन - ४०२ २०४

जावक क्र.-२२०८ — दिनांक - ३१/१२/२०२४

### जाहीर नोटीस

महाराष्ट्र ग्रामपंचायत अधिनियम १९५९ व कर व फी (शुल्क) १९६० नुसार खालील मालमत्तेच्या नावे संबंधाने ग्रुप ग्रामपंचायत नागांव कडे प्राप्त झालेल्या मालमत्ता धारकांच्या परत्वे १६ अ मधील नियमाप्रमाणे सदर संदर्भाने कोणत्याही हित संबंधाने हरकत अगर आक्षेप असल्यास सदरची नोटीस प्रसिद्ध झाल्यापासून १५ दिवसांच्या आत हित संबंधाच्या व हरकतीच्या लेखी पुराव्यासह ग्रुप ग्रामपंचायत नागांव कडे लेखी स्वरुपात हरकत नोंदवावी अन्यथा करवसुलीच्या सोयीसाठी सदर हस्तांतर करून दप्तरी या बाबतची नोंद घेतली जाईल.

| अ. क्र | गावाचे नाव | घर क्र. | असेसमेंट दप्तरी असलेल्या घर मालकाचे नाव | नवीन नोंद करावयाचे घर मालकाचे नाव |
|---|---|---|---|---|
| १ | नागांव | ३१२३ | सुहास दत्ताराम पवार स्नेहा सुहास पवार | विनायक गोविंद मुझुमदार दर्शना विनायक मुझुमदार |
| २ | नागांव | २४१२ | सचिन दत्तात्रेय कदम | वृषिक विलास कवळे धनश्री शैलेश नाईक |

सही/-
**सौ. श्वेता संजय कदम**
**ग्रामविकास अधिकारी,**
**ग्रुप ग्रामपंचायत नागांव**
**ता.अलिबाग, जि.रायगड**

सही/-
**सौ. हर्षदा निखील मयेकर**
**सरपंच**
**ग्रुप ग्रामपंचायत नागांव**

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, मौजे वेश्वी, ता. अलिबाग, जि. रायगड येथील खालील वर्णन केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालक १. नरेश अनंत शेळके, २ संदीप अनंत शेळके, ३. प्रगती प्रकाश सकपाळ, ४. राजेंद्र कृष्णा शिंदे, ५. मयुरी महेश बोभाटे, ६. सुनंदा यशवंत साळवी, ७. प्रणाली प्रकाश कदम, ८. रसिका रमेश शेळके, ९. वृषाली वैभव तरे, १०. दिपाली परेश चितळे, ११. निलम सागर गावंड, १२. उत्कर्षा रमेश शेळके, १३. रिया राकेश शिंदे, १४. सुलभा सुरेश शेळके, १५. स्वप्निल सुरेश शेळके, १६. सोनल वैभव महाबळे, १७. शितल सुरेश शेळके सर्व रा.मु.पो. वेश्वी, ता.अलिबाग, जि.रायगड यांच्या मालकीहक्काची व त्यांचे कब्जातील खालील वर्णन केलेल्या जिरायत मिळकत माझे अशिल यांनी कायम स्वरुपात विकत घेण्याचे ठरविले आहे. तशा आशयाची बोलणी विद्यमान मालकांबरोबर माझे अशिलांनी केली आहे. सदर मिळकत निर्वेध असल्याचा हवाला विद्यमान मालकांनी माझ्या अशिलांना दिलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्र. व उपविभाग | पोट नं. | क्षेत्र(हे.आर.) | आकार(रु.पै.) |
|---|---|---|---|---|
| वेश्वी ता.अलिबाग | १२१/१/ब | - | ०-१२-०० | २.५० |

तरी सदरहू मिळकतीमध्ये अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, ताबा कब्जा, भाडेपट्टा, इजमेंट, साठेकरार, खरेदीखत, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसंबंध असल्यास त्यांनी या नोटीशीच्या तारखेपासून चौदा दिवसांचे आत प्रथमदर्शनी पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खालील पत्त्यावर समक्ष वा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. याप्रमाणे सदर मिळकतीबाबत कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे असे गृहीत धरुन माझे अशिल वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व विहित मुदतीच्यानंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती माझ्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

दिनांक : ०३/०१/२०२५

सौ. वैशाली सुहास ढवळे
अशिलांची सही.

मालकाची सही.
संदिप अनंत शेळके

सही / -
**ॲड. नितीन हरिश्चंद्र पाटील**
रा. उत्कर्ष बंगला, श्रीबाग नं. २, अलिबाग,
ता. अलिबाग, जि. रायगड.
Mobile No.9422690842

## नोटीस

दिनांक : ०३/०१/२०२५

सर्व जनतेस या जाहीर नोटिसीद्वारे कळविण्यात येते की, खालीलप्रमाणे नमुद मिळकत आमचे अशिल यांनी सदर मिळकतीचे विद्यमान मालक १. अस्लम याकूब सुपारीवाला, २. नसरीन असिफ सुपारीवाला, ३.आरिफा अस्लम सुपारीवाला यांचेकडून कायमस्वरुपी खरेदी करण्याचे ठरविले आहे. त्याप्रमाणे त्यांच्यात बोलणी झालेली आहे. सदरहू मिळकत ही निर्वेध असल्याचा भरवसा मिळकतीच्या विद्यमान मालकांनी दिलेला असला तरी या खरेदी-विक्री व्यवहाराबाबत कोणाचीही कोणतीही हर हरकत, दावा, लिज, पोटगी, बक्षिसपत्र, मृत्युपत्र, तारण, ताबा/गहाण, वहिवाट इ.स्वरुपाचे हक्क हितसंबंध असल्यास ते योग्य त्या लेखी पुराव्यासह निम्न स्वाक्षांकीत खरेदीदार यांच्या वकीलांकडे ही जाहीर नोटिस प्रसिद्ध झाल्यापासून १४ दिवसांचे आत कळवावे. मुदतीत हरकत न आल्यास सदरहू मिळकत ही निर्वेध आहे असे समजून आमचे अशिल खरेदी व्यवहार पुर्ण करतील व तद्नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकतींचा विचार केला जाणार नाही व अशा हरकती आमचे अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत हे सर्वास कळावे.

**ता. रोहा, जि. रायगड**

| मौजे | गट क्रमांक व उपविभाग | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|
| आरे बुद्रुक, ता. रोहा | १६६ | क्षेत्र १-३६-०० पो.ख. ०-०९-०० एकूण क्षेत्र १-४५-०० | १.१६ |
| आरे बुद्रुक, ता. रोहा | १६९/अ/१ | क्षेत्र ३-१७-०० पो.ख.०-८८-०० एकूण क्षेत्र ४-०५-०० | २.३८ |
| आरे बुद्रुक, ता. रोहा | १६९/अ/२ | क्षेत्र ३-१७-०० पो.ख.०-८८-०० एकूण क्षेत्र ४-०५-०० | २.३८ |
| आरे बुद्रुक ता. रोहा | १६९/अ/३ | क्षेत्र १-६७-०० पो.ख ०-८९-०० एकूण क्षेत्र २-५६-०० | ०.७१ |
| आरे बुद्रुक, ता. रोहा | १६९/ब/३ | क्षेत्र १-६४-०० पो.ख. ०-८९-०० एकूण क्षेत्र २-५३-०० | १.४२ |
| आरे बुद्रुक, ता. रोहा | १७२ | क्षेत्र १-४२-०० पो.ख. ०-०९-०० एकूण क्षेत्र १-५१-०० | १.३१ |
| आरे बुद्रुक ता. रोहा | १८३ | क्षेत्र २-२४-०० पो.ख. ०-०७-०० एकूण क्षेत्र २-३१-०० | २.०६ |
| आरे बुद्रुक, ता. रोहा | १९१ | क्षेत्र २-२४-० पो.ख. ०-०६-०० एकूण क्षेत्र २-३०-०० | २.०७ |
| आरे बुद्रुक, ता. रोहा | १६४ | क्षेत्र २-७५-०० पो.ख. ०-१९-०० एकूण क्षेत्र २-९४-०० | २.४४ |
| आरे बुद्रुक ता. रोहा | १६९/२/ब/१ | क्षेत्र ३-१३-०० पो.ख. ०-८८-०० एकूण क्षेत्र ४-०१-०० | २.०२ |
| आर बुद्रुक, ता. रोहा | १६९/ब/२ | क्षेत्र ३-१४-०० पो.ख. ०-८८-०० एकूण क्षेत्र ४-०२-०० | २.०२ |
| आर बुद्रुक, ता. रोहा | १७५ | क्षेत्र १-४१-०० पो.ख. ०-०९-०० एकूण क्षेत्र १-५०-०० | १.३१ |
| आरे बुद्रुक, ता. रोहा | १७८ | क्षेत्र ०-१७-५० पो.ख. ०-०१-५० एकूण क्षेत्र ०-१९-०० | १.५१ |
| आरे बुद्रुक, ता. रोहा | १७९ | क्षेत्र ०-३१-५० पो.ख. ०-०२-५० एकूण क्षेत्र ०-३४-०० | ०.३८ |
| आरे बुद्रुक ता. रोहा | १८० | क्षेत्र ०-४१-०० पो.ख. ०-०३-०० एकूण क्षेत्र ०-४४-०० | ०.३८ |
| आरे बुद्रुक, ता. रोहा | १८१ | क्षेत्र १-२४-५० पो.ख. ०-०८-५० एकूण क्षेत्र १-३३-०० | १.१६ |
| आरे बुद्रुक, ता. रोहा | १८२ | क्षेत्र ०-४३-०० पो.ख. ०-०३-०० एकूण क्षेत्र ०-४६-०० | ०.३९ |

दिनांक :- ०३/०१/२०२५

अशिलांची सही

**ॲड. समीर सुरेश नाईक**
जिल्हा न्यायालय रायगड-अलिबाग
ऑफिस पत्ता :- फ्लॅट नं. १०३, पहिला मजला,
बी विंग, मोरेश्वर अपार्टमेंट, जे.एस.एम कॉलेज जवळ
अलिबाग-रायगड, मोबा. ९७६७०१०९०२

## जाहीर नोटीस

सर्व लोकांस या जाहीर नोटीसीने कळविण्यांत येते की, मौजे वेश्वी, ता. अलिबाग, जि.रायगड येथील खालील वर्णन केलेल्या मिळकतीचे विद्यमान मालक श्री. एकनाथ दत्तात्रेय शेळके रा.मु.पो. वेश्वी, ता.अलिबाग, जि.रायगड यांच्या मालकीहक्काची व त्यांचे कब्जातील खालील वर्णन केलेल्या जिरायत मिळकत माझे अशिल यांनी कायम स्वरुपात विकत घेण्याचे ठरविले आहे. तशा आशयाची बोलणी विद्यमान मालकांबरोबर माझे अशिलांनी केली आहे. सदर मिळकत निर्वेध असल्याचा हवाला विद्यमान मालकांनी माझ्या अशिलांना दिलेला आहे.

**मिळकतीचे वर्णन**

| मौजे | भूमापन क्र. व उपविभाग | पोट नं. | क्षेत्र (हे.आर.) | आकार (रु.पै.) |
|---|---|---|---|---|
| वेश्वी ता. अलिबाग | १२१/१/अ | —— | ०-०८-३० | १.७५ |

तरी सदरहू मिळकतीमध्ये अन्य कोणाचा कोणत्याही प्रकारचा हक्क, हितसंबंध, ताबा कब्जा, भाडेपट्टा, इजमेंट, साठेकरार, खरेदीखत, गहाण, दान, बोजा व अन्य कोणत्याही प्रकारचा हितसबंध असल्यास त्यांनी या नोटीशीच्या तारखेपासून चौदा दिवसांचे आत प्रथमदर्शनी पुराव्यासह त्यांच्या लेखी हरकती खालील पत्त्यावर समक्ष वा रजिस्टर पोस्टाने दाखल कराव्यात. याप्रमाणे सदर मिळकतीबाबत कोणतीही हरकत न आल्यास सदर मिळकत निर्वेध व बोजाविरहित आहे असे गृहीत धरुन माझे अशिल वरील मिळकतीच्या संदर्भातील नियोजित खरेदीचा व्यवहार पुर्ण करतील व विहित मुदतीच्या नंतर येणाऱ्या कोणत्याही हरकती माझ्या अशिलांवर बंधनकारक राहणार नाहीत. याची कृपया संबंधितांनी नोंद घ्यावी.

दिनांक : ०३/०१/२०२५

अशिलांची सही.
सौ. वैशाली सुदास ढवळे
सही /-
मालकाची सही.

सही/-
**ॲड. नितीन हरिश्चंद्र पाटील**
रा. उत्कर्ष बंगला, श्रीबाग नं.२, अलिबाग,
ता.अलिबाग, जि.रायगड.
Mobile No.9422690842

## निवडक



## बांगलादेशच्या खेळाडूने घेतल्या धडाधड ७ विकेट

**मुंबई** : बांग्लादेश प्रीमियर लीग स्पर्धेतील पाचव्या सामन्यात धडाधड विकेटची अनुभूती क्रीडारसिकांना घेता आली. बांग्लादेश प्रीमियर लीग स्पर्धेचा सामना दरबार राजशाही आणि ढाका कॅपिटल्स यांच्यात रंगला होता. तस्किन अहमदने ४ षटकात १९ धावा देत ७ गडी बाद केले. त्यामुळे ढाका कॅपिटल्सला फक्त १७४ धावांपर्यंत मजल मारता आली.

या सामन्यात ढाका कॅपिटल्सने नाणेफेक जिंकून फलंदाजीचा निर्णय घेतला. पण हा निर्णय फसल्याचं दिसलं. तस्किन अहमदच्या गोलंदाजीमुळे धावांची गती मंदवली. सुरुवातीला लिटन दास आणि तन्झिद हसन यांच्या विकेट घेतल्या. त्यानंतर मधल्या फळीत स्टी एस्किनाझी आणि शहादत दिपू यांनी डाव सावरला आणि तिसऱ्या विकेटसाठी ७९ धावांची भागीदारी केली. ही जोडी फोडण्यात तस्किन अहमदला यश आलं. त्यानंतर त्याने डेथ ओव्हरमध्ये कहर केला. उरलेल्या दोन षटकात चार विकेट घेत इतिहास रचला. तस्किन अहमदने ४ षटकात १९ धावा देत ७ गडी बाद केले. त्यामुळे ढाका कॅपिटल्सला फक्त १७४ धावांपर्यंत मजल मारता आली. या धावांचा पाठलाग करताना दरबार राजशाही संघाने ३ विकेट गमवल्या आणि १८.१ षटकात आव्हान पूर्ण केलं. बांग्लादेश प्रीमियर लीग इतिहासात पहिल्यांदाच ७ विकेट घेण्याची किमया साधली गेली आहे. यापूर्वी १७ धावा देत ६ गडी टीपून मोहम्मद अमिरने हा विक्रम नोंदवला होता. इतकंच काय तर लीग स्पर्धेत अशी कामगिरी करणार तस्किन हा पहिला गोलंदाज ठरला आहे. तर टी क्रिकेटमध्ये अशी कामगिरी करणारा तिसरा गोलंदाज ठरला आहे. टी क्रिकेटमध्ये सर्वोत्तम गोलंदाजीचा विक्रम मलेशियाच्या सियाझरुल इद्रासच्या नावावर आहे. त्याने २०२३ मध्ये चीनविरुद्ध ८ धावांत ७ बळी घेतले होते. तर या यादीत कॉलिन अकरमनचे नाव दुसऱ्या क्रमांकावर आहे. लीसेस्टरशायरकडून खेळताना ॲकरमनने २०१९ मध्ये बर्मिंगहॅम बिअर्सविरुद्ध १८ धावांत ७ बळी घेतले होते.



## प्रीतीच्या गालावर खुलली कळी, काव्याही झाली आनंदी

**मुंबई** : पंजाबने विजय हजारे ट्रॉफी स्पर्धेत हवा केली आहे. त्यांचे सलामीवीर प्रभसिमरन सिंग आणि अभिषेक शर्मा यांच्या बॅटमधून खोऱ्याने धावा निघत आहेत. हैदराबादविरुद्धच्या लढतीत प्रभसिमरनने शतकी खेळी केली, तर अभिषेकचे शतक ७ धावांनी हुकले. या दोन्ही फलंदाजांचा खेळ पाहून त्यांच्या इंडियन प्रीमिअर लीगमधील फ्रँचायझीच्या मालकीण प्रीति झिंटा आणि काव्या मारन यांना नक्कीच आनंद झाला असेल.

विजय हजारे ट्रॉफीत पंजाब विरुद्ध हैदराबाद असा सामना सुरू आहे आणि प्रभसिमरन व अभिषेक यांनी पहिल्या विकेटसाठी पुन्हा एकदा विक्रमी १९६ धावांची भागीदारी केली. मागील लढतीत या दोघांनी शतकं झळकावताना सौराष्ट्रविरुद्ध २९८ धावा जोडल्या होत्या. त्यांनी हैदराबादच्या गोलंदाजांचा समाचार घेतला. या दोघांनी २४.१ षटकांत फलकावर १९६ धावा चढवल्या. अभिषेक ७२ चेंडूंत ७ चौकार व ६ षटकारांसह ९३ धावांत तंबूत परतला. तनय त्यागराजन याने ही विकेट मिळवली. प्रभसिमरन दुसऱ्या बाजूने दमदार खेळ करत होता आणि त्याने अनमोलप्रीत सिंगसोबत दुसऱ्या विकेटसाठी ६३ धावांची भागीदारी केली.

प्रभसिमरनने १०५ चेंडूंत २० चौकार व ३ षटकारांसह १३७ धावा केल्या. विजय हजारे ट्रॉफीतील हे त्याचे सलग तिसरे शतक ठरले. यापूर्वी त्याने सौराष्ट्रविरुद्ध १२५ व मुंबईविरुद्ध नाबाद १५० धावांची खेळी केली होती. अभिषेकनेही सलग दुसरे शतक झळकावले. त्याने मागील सामन्यात १७० ( वि. सौराष्ट्र) धावा कुटल्या होत्या. त्यामुळे चाहते आनंदी आहेत.


## क्लासिफाईड

*जाहिरात छोटी, उपयुक्तता मोठी*

- **मेडिकल एजन्सीज पिंपळभाट** येथे कामासाठी मुले व मुली १० वी ते १२ शिक्षण असलेल्या अलिबाग जवळील राहणाऱ्या स्टॉफची जागा खाली आहे. व Driver ची जागा खाली आहे. मो. ९६२३३६६७७८
- **जमिनीची खरेदी व विक्री** अलिबाग परिसरात NA. Plat उपलब्ध बुरुमखान, भुते, खडताळपुल, एरियामध्ये जागा उपलब्ध. सहाण, खानाव, भादाणेमध्ये जागा उपलब्ध. ऑफीस सन स्टोन रीयल इस्टेट अलिबाग, साईना कॉम्प्लेक्स, बायपास रोड ८६६९००६९०२,९२७०८८८८०३
- **अलिबाग येथे कंस्ट्रक्शन** कंपनी साठी पिकअप वर ड्रायव्हर पाहिजे ८८०६७५९०९०, ९६२३६८७१५७
- वरसोली रायगड आदर्श नगर येथे NA ४.५ गुंठेचे (एकूण ३६ गुंठे), ८ प्लॉट एकत्रित अथवा वेगवेगळे विकणे आहेत. अपेक्षित किंमत ६३ लाख प्रत्येकी, एकत्रित ५.०४ कोटी (५ कोटी ४ लाख) संपूर्ण चेक पेमेंट- ९८२२२५७९२९
- किहीम, रायगड समुद्रकिनाऱ्यापासून ३५० मीटर अंतरावर ३६० मीटरचा NA प्लॉट विकणे आहे. अपेक्षित किंमत. १.०५ कोटी, (१ कोटी ५ लाख) बंगल्यासाठी योग्य- ९८२२२५७९२९
- Resort + Bunglow. Available fully developed Resort +Bunglow Plot Area 15.1 R Land (with exclusix Access 3.0R) on chondhi kihim Road, just 500 meters from beach, Rate Rs. 30 Lac Per Guntha. Total Lumsum price Rs 4.5 crore. All cheque payment 9822257929.

जाहिरातीसाठी संपर्क : (०२१४१) २२२२९०/ २२२७६१


### स्वामी समर्थ स्पोर्टस्, आरबीआय स्पोर्टस्

# उपांत्य पूर्व फेरीत

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**

स्वामी समर्थ स्पोर्टस्, आरबीआय स्पोर्टस् यांनी जिल्हा अजिंक्यपद निवड चाचणी कबड्डी स्पर्धेतील पुरुष प्रथम श्रेणी व्यावसायिक गटाची उपांत्य पूर्व फेरी गाठली. मुंबई शहर कबड्डी असोसिएशनने या स्पर्धेचे आयोजन केले आहे.

महिलांच्या व्यावसायिक गटाच्या अव्वल साखळी सामन्यात अग्निशमन सेवा, कला, क्रीडाने एक विजय व एका सामन्यात बरोबरी साधत बाद फेरीतील आपला प्रवेश जवळ जवळ निश्चित केला. वडाळा येथील भारतीय क्रीडा मंदिराच्या पटांगणावर आयोजित पुरुषांच्या प्रथम श्रेणी व्यावसायिक गटात स्वामी समर्थ स्पोर्टस्ने रुपाली ज्वेलर्सचा प्रतिकार ३५-२६ असा मोडून काढला. पूर्वार्धात १२-१४ अशा २ गुणांनी पिछाडीवर पडलेल्या स्वामी समर्थने उत्तरार्धात जोशपूर्ण खेळ करीत सामना आपल्या बाजूने झुकाविला. अजय अहिर, अक्षय शेवडे यांच्या उत्तरार्धातील चढाई, पकडीच्या दमदार खेळामुळे हे शक्य होऊ शकले. अमर कश्यप, संदेश देशमुख यांचा पूर्वार्धातील खेळातील जोश उत्तरार्धात दाखवू न शकल्याने पराभवाचा सामना करावा लागला. दुसऱ्या सामन्यात रिझर्व्ह बँक स्पोर्टस्ने आयकर स्पोर्टस्चा ४८-१७ असा सहज पराभव केला. मध्यांतराला २४-०९ अशी आघाडी घेणाऱ्या बँकेने नंतर देखील खेळातील गती कायम ठेवत आपला विजय सोपा केला.

तुषार शिंदे, रुपेश साळुंखे यांच्या धडाकेबाज खेळाला या विजयाचे श्रेय जाते. आयकराच्या सर्वेश पाटील, अमर मणियार यांचा प्रतिकार अतिशय दुबळा ठरला. व्यावसायिक महिलांत ४ संघाचा सहभाग असल्याने सामने अव्वल साखळी पद्धतीने खेळविण्यात आले. त्यात अग्निशमन सेवाने प्रथम आर.बी.एस. रॉयल बोर्डला ३१-३१ असे बरोबरीत रखले. तर दुसऱ्या सामन्यात मुंबई महानगर पालिकेला ३५-२० असे नमवित बाद फेरीतील आपले स्थान निश्चित केले. मेघा कदम, ऐश्वर्या ढवण यांच्या दमदार चढाया, त्यांना दीक्षा तिहवाडकर, चेतना नेहवाल यांची मिळालेली पकडीची साथ यामुळे हे शक्य झाले. सदरचा सामना पाहण्यासाठी क्रीडाप्रेमींनी मोठ्या संख्येने गर्दी केली होती. क्रीडाप्रेमी हे आपल्या खेळाडूंचे मनोबल वाढवण्यासाठी त्यांना चिअरअप करत होते. संघाने विजय संपादन केल्यानंतर एकच जल्लोष केला.



## चॅम्पियन्स ट्रॉफीसाठी भारतीय संघात या खेळाडूचं नाव पक्कं!

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**

चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ स्पर्धेचा गुंता संपल्यानंतर भारताचे सर्व सामने दुबईत होणार आहेत. ही स्पर्धा १९ फ ेब्रुवारीपासून सुरु होणार असून यासाठी आठ संघांनी कंबर कसली आहे. भारताच्या गटात न्यूझीलंड, पाकिस्तान आणि बांग्लादेश हे संघ आहेत. भारताचा पहिलाच सामना बांगलादेशशी २० फेब्रुवारीला होणार आहे. त्यानंतर २३ फेब्रुवारीला हायव्होल्टेज भारत पाकिस्तान सामना आणि साखळी फेरीतील शेवटचा सामना २ मार्च रोजी न्यूझीलंडशी होणार आहे. असं सर्व असताना भारतीय संघात कोणते खेळाडू असतील, याबाबत खलबतं सुरु आहेत.

कर्णधार रोहित शर्मा असेल यात काही शंका नाही. कारण टी-२० वर्ल्डकपनंतर रोहित शर्माच्या कर्णधारपदावर शिक्कामोर्तब झालं होतं. त्याच्या नेतृत्वात चॅम्पियन्स ट्रॉफी आणि वर्ल्ड टेस्ट चॅम्पियनशिप अंतिम फेरी खेळणार असं जाहीर केलं होतं. पण कसोटीत भारताची पिछेहाट झाली असून आता क्वॉलिफाय करेल की नाही हे गुलदस्त्यात आहे. असं असताना चॅम्पियन्स ट्रॉफीसाठी संघाची निवड कशी होते. याकडे लक्ष लागले आहे.रोहित शर्माच्या खांद्यावर कर्णधारपदाची धुरा असल्यास विराट कोहली, ऋषभ पंत, रवींद्र जडेजा, हार्दिक पांड्या, जसप्रीत बुमराह या खेळाडूंचं संघात असणं जवळपास निश्चित आहे. तर टीम इंडियात एका नावाची जोरदार चर्चा आहे. ती म्हणजे श्रेयस अय्यर. हा खेळाडू गेल्या काही दिवसांपासून टीम इंडियात नाही. श्रेयस अय्यर टीम इंडियात पदार्पण करण्यासाठी देशांतर्गत क्रिकेट खेळत आहे. त्याचा फॉर्मही जबरदस्त आहे. विजय हजारे ट्रॉफीत त्याने शतकी खेळी करत आपला दावा पक्का केला आहे. विजय हजारे ट्रॉफी ही ५० षटकांची असून तग धरून ठेवणारा खेळाडू भारतीय संघात असणं आवश्यक आहे. दरम्यान, वर्ल्ड कप २०२३ स्पर्धेत चौथ्या क्रमांकावर फलंदाजी करत होता. त्यामुळे त्याचा विचार केला जाऊ शकतो. टीम इंडिया चॅम्पियन्स ट्रॉफीपूर्वी इंग्लंडविरुद्ध टी-२० आणि वनडे मालिका खेळणार आहे. या मालिकेत निवड झाली की त्याचा चॅम्पियन्स ट्रॉफीतही समावेश होईल यात शंका नाही.

विजय हजारे ट्रॉफीत श्रेयस अय्यरने पुडुचेरीविरुद्ध १३३ चेंडूत नाबाद १३७ धावा केल्या. यावेळी त्याने १६ चौकार आणि ४ षटकार मारले. आयसीसी चॅम्पियन्स ट्रॉफी २०२५ साठी संघ जाहीर करण्याची अंतिम तारीख १२ जानेवारी आहे. ११ जानेवारी रोजी जाहीर करण्याची शक्यता आहे.

## नांदगावमध्ये वार्षिक कराटे प्रशिक्षण शिबीर संपन्न



**। कोर्लई । वार्ताहर ।**

मुंबईच्या इंडियन मार्शल ट्रेनिंग सेंटर तर्फे संस्थेचे अध्यक्ष अजय शाह यांच्या मार्गदर्शनाखाली मुरुड तालुक्यातील नांदगाव येथील सोमवंशीय चौकशी समाज हॉलमध्ये नुकतेच पाच दिवशीय वार्षिक कराटे प्रशिक्षण शिबिर संपन्न झाले.

इंडियन मार्शल आर्ट्स ट्रेनिंग सेंटर गेल्या ३७ वर्षांपासून या संस्थेचे अध्यक्ष अजय आर. शाह यांच्या मार्गदर्शनाखाली या वार्षिक कराटे शिबिर आयोजित केले जात आहे.

या शिबिरामध्ये वर्षभर मुलांनी केलेल्या मेहनतीची परीक्षा घेऊन त्यांची गुणवत्ता केली जाते. या शिबिरात फक्त कराटे नव्हे तर प्राचीन युद्धकला तसेच विविध शस्त्रकला पारंगत व्यक्तींकडून शिकवल्या जातात. मुंबई, उल्हासनगर, ठाणे अशा विविध जिल्ह्यांमधून जवळजवळ २००-२५० खेळाडू दरवर्षी सहभाग घेत असतात. हे पाच दिवसीय शिबीर दिनांक २८ डिसेंबर २०२४ ते दिनांक १ जानेवारी २०२५ या कालावधीत संपन्न झाले. या शिबिरात व्हाईट बेल्ट पासून ब्लॅक बेल्ट व डिग्री पर्यंत सर्वांची परीक्षा घेतली.

### 'मोठीजुई प्रीमियर लीग'२०२४

## शिवाज्ञा संघ २०२४ चा विजेता, मालिकावीर ठरला जितेश भोईर

**। उरण । वार्ताहर ।**

एकाच गावातील खेळाडूंची लिलाव पद्धतीने १६ संघांची निवड करून त्याची लीग ठेवली जाते. ती उरण तालुक्यातील मानाची टेनिस क्रिकेट स्पर्धा समजली जाणारी मोठीजुई प्रीमियर लीग २०२४ च्या चौथ्या पर्वाचे दिमाखदार आयोजन ए व्ही स्पोर्ट युवा प्रतिष्ठान मोठीजुईच्या माध्यमातून केले होते. या पाच दिवसीय खेळल्या गेलेल्या स्पर्धेचा ३१ डिसेंबर रोजी अंतिम फायनल सामना झाला. एकूण सोळा संघ मालकांनी या स्पर्धेत सहभाग घेतला होता.



त्यात आपल्या खेळवृत्तिने अंतिम चार संघ टॉप ४ मध्ये पोचले त्यापैकी शिवाज्ञा ईटरप्रायझेस संघ प्रथम क्रमांक, प्रिन्सि प्रिता इलेव्हन संघ द्वितीय क्रमांक, एसएसडी इंडियन संघ तृतीय तर काव्य ईटरप्रायझेस संघ चतुर्थ क्रमांकचा मानकरी ठरला. यंदाच्या एमपीएलमध्ये तीन अर्धशतकीच्या बहारदार खेळीने ८ विकेट संपादन करून २२ षटकार अशा तब्बल २८८ धावा काढून २०२४ या स्पर्धेत जितेश भोईर मालिकावीर ठरला.

## रोहितला कसोटी संघातून कायमची विश्रांती

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**

रोहित शर्माने सिडनी कसोटीत विश्रांती घेण्याचा निर्णय घेत नेतृत्त्वाचे एक उत्तम उदाहरण मांडले आहे, असे बुमराहने नाणे फेकीच्या वेळेस सांगत सिडनी कसोटीत रोहित शर्मा खेळणार नसल्याचं स्पष्ट झालं. रोहितच्या या निर्णयाने चाहते नक्कीच चकित झाले होते. काही वेळाने सामना सुरू होताच रोहित शर्मा ड्रेसिंग रूमबाहेर बसलेला दिसला. रोहित शर्माच्या या निर्णयानंतर कदाचित त्याने भारतासाठी कसोटी क्रिकेटमधील अखेरचा सामना खेळल्याची चर्चा होती, पण आता या निर्णयावर शिक्कामोर्तब झाल्याचा एक रिपोर्ट समोर आला आहे. इंडियन एक्सप्रेसने दिलेल्या वृत्तानुसार, रोहित शर्मा हा ऑस्ट्रेलिया दौऱ्यानंतर भारताच्या कसोटी क्रिकेटमधील योजनांचा भाग नसणार आहे आणि याची माहिती त्याला सिडनी कसोटीपूर्वीच देण्यात आली आहे. ऑस्ट्रेलिया



दौऱ्यानंतर भारतीय संघाची निवड समिती विराट कोहलीबरोबर देखील चर्चा करणार असल्याची माहिती मिळाली आहे. ऑस्ट्रेलिया दौऱ्यानंतर भारताचा कसोटी संघ एक मोठ्या संक्रमणातून जाणार आहे. याचबरोबर वरिष्ठ खेळाडूंपैकी एक म्हणजे रवींद्र जडेजा मात्र त्याची अष्टपैलू कामगिरी पाहता भारताच्या कसोटी क्रिकेटच्या योजनांचा भाग असणार आहे. रोहित शर्मा सिडनी कसोटी न खेळण्याचा निर्णय हा खेळाडू आणि मुख्य प्रशिक्षक गौतम गंभीर यांनी निवड समितीचे अध्यक्ष अजित आगरकर यांच्याशी झालेल्या बैठकीनंतर घेतल्याचे दिसते. रोहित शर्मा या मालिकेदरम्यान फॉर्मशी झगडताना त्याने ५ डावांमध्ये ३,६,१०,३ आणि ९ धावांची खेळी केली. रोहितच्या या फॉर्मचा परिणाम त्याच्या नेतृत्त्वावरही दिसून आला. रोहित शर्मा भारताच्या कसोटी योजनांचा भाग नसल्याचे जरी बीसीसीआयने सांगितले आहे, पण भारताने फायनलमध्ये प्रवेश केला तर रोहित संघात पुनरागमन करू शकेल का हा मोठा प्रश्न आहे. चॅम्पियन्स ट्रॉफीच्या संदर्भात, येत्या काही दिवसांत संघ भारतात परतल्यावर चर्चा होणार आहे.

## विराट कोहलीचा लाजिरवाणा विक्रम!

**। मुंबई । वृत्तसंस्था ।**

टीम इंडियाचा स्टार फलंदाज विराट कोहलीसाठी २०२४ हे वर्ष खूप वाईट होते. वर्षभर तो आपल्या खराब फॉर्मशी झुंजत राहिला. २०२५ मध्ये विराट चांगली सुरुवात करेल अशी चाहत्यांना आशा होती, पण जुन्या कमकुवतपणामुळे नवीन वर्षातही त्याने विकेट गमावली. सिडनीमध्ये खेळल्या जात असलेल्या शेवटच्या कसोटीत विराट ऑफ स्टंपच्या बाहेर जाणाऱ्या चेंडूवर आऊट झाला आणि यासोबतच त्याने एक लज्जास्पद विक्रमही नोंदवला. विराटची ही खेळी त्याच्या कसोटी कारकिर्दीतील एकही चौकार नसलेली सर्वात मोठी खेळी ठरली आहे.

सिडनी कसोटीत विराट कोहलीने ६९ चेंडूंचा सामना करत केवळ १७ धावा केल्या. ६९ चेंडूत विराटने एकही चौकार मारला नाही आणि एकही षटकार त्याच्या बॅटमधून आला नाही. ही खेळी त्याच्या कसोटी कारकिर्दीतील एकही चौकार नसलेली सर्वात मोठी खेळी ठरली. यापूर्वी २०२१ मध्ये इंग्लंडविरुद्ध ४८ चेंडू खेळताना विराटने एकही चौकार मारला नव्हता. तेव्हा विराटने केवळ ११ धावा केल्या होत्या. विराट आतापर्यंत या दौऱ्यातील आठपैकी सात डावांमध्ये असाच बाद झाला आहे.

### चॅम्पियनशिप रॅली जिंकणारी पहिलीच युवती | विविध देशातील २२ स्पर्धकांचा समावेश

# पुण्याच्या निकिताची कमाल

**। पुणे । प्रतिनिधी ।**

आज सर्वच क्षेत्रात महिला आणि मुली या मागे नाहीत. याचा प्रत्यय हा नेहमीच आपल्याला येत असतो. मलेशियामध्ये मलाका येथे पार पडलेल्या मलेशिया चॅम्पियनशिप रॅलीमध्ये भारताचे प्रतिनिधित्व करणाऱ्या पुण्याच्या निकिता टकले खडसरे या युवतीने चॅम्पियनशिप रॅलीचे प्रथम पारितोषिक पटकावले. राष्ट्रीय स्तरावर अनेक पारितोषिके मिळविलेली निकिता आंतरराष्ट्रीय पातळीवर चॅम्पियनशिप मिळविणारी पहिली युवती ठरली. स्पर्धेच्या चार विभागात निकिताने ट्रॉफी मिळविली




आहे. एमआयआरसी रॅली ऑफ आशान, मलेशियामध्ये मलाका येथे आयोजित चॅम्पियनशिप रॅलीमध्ये भारत, मलेशिया, इंडोनेशिया, चायना देशातील सुमारे २२ स्पर्धक सहभागी झाले होते. राज्यस्तरीय, राष्ट्रीय, पातळीवर स्पर्धेत अनेक वेळा भाग घेतला. आंतरराष्ट्रीय स्तरावर खेळताना अनेक अडचणींना निकिताला सामोरे जावे लागले. त्यात भाषा, तंत्रज्ञान, नियमावली या सर्व गोष्टींना तोंड द्यावे लागले. रॅली सुरू झाल्यावर पहिल्याच स्टेजमध्ये एक किलोमीटरला इलेक्ट्रिक समस्या झाली. कार दुरुस्त केली पुन्हा रॅलीत सहभागी होऊन पूर्ण केली. यामध्ये नऊ स्टेजमध्ये जास्त गुण मिळवून निकिताने सर्व समस्यांवर मात करत चॅम्पियनशिप ट्रॉफी पटकाविली. सुमारे ३६५ रॅली त्यातील ८६ आंतरराष्ट्रीय रॅलीत सहभाग असल्याने सहचालक मुसा शरीफ यांच्या अनुभवाचा खूप फायदा झाला, असं निकिता सांगते.

मलेशिया चॅम्पियनशिप रॅली ही आंतरराष्ट्रीय पातळीवरील अवघड रॅली मानली जाते. या रॅलीत सहभागी स्पर्धक जगातील कुठल्याही रॅलीत चांगल्या पद्धतीने सहभागी होऊ शकतात. त्यामुळे या रॅलीला अधिक महत्त्वआहे. पामच्या झाडांमधून कार चालविताना फार सावध भूमिका घेत सहचालक मुसा शरीफ यांच्या सहकार्याने निकिता टकलेने चॅम्पियनशिप रॅलीत भारताचा झेंडा फडकविला. आंतरराष्ट्रीय स्तरावर चॅम्पियनशिप मिळविणारी निकिता पहिली स्पर्धक ठरली आहे. भविष्यात माझं स्वप्न आहे की जगात ज्या मोठ्या मोठ्या रॅली आहेत. त्यामध्ये सहभाग घ्यायचा आणि मला तिथं पर्यंत पोहोचायचं आहे. या सगळ्यात मला माझ्या कुटुंबाची चांगली साथ मिळाली, असे निकिताने स्पष्ट केले.

# बालांगण



## अनोखी नृत्यपरंपरा

छोट्यांनो, तुम्हाला नाचायला आवडतं का? तुम्ही वाढदिवसाच्या पार्टीत किंवा गणपती उत्सवात थिरकत असाल. नृत्याचेही विविध प्रकार आहेत. भारतातले कथक, भरतनाट्यम, मोहिनीअट्टमसारखे शास्त्रीय नृत्यप्रकार जगभरात प्रसिद्ध आहेत. त्याचप्रमाणे विविध देशांमध्ये अनोखी नृत्य सादर केली जातात. अशाच काही नृत्यप्रकारांवर नजर टाकू या.

✻ ब्राझील हा फुटबॉलप्रेमी देश. पण इथे नृत्यांचीही अनोखी परंपरा पहायला मिळते. 'कॅपोइरा' हा या देशातला भन्नाट नृत्यप्रकार आहे. नृत्य आणि मार्शल आर्ट यांच्या मिश्रणातून हा डान्स तयार झाला आहे. समूहात किंवा एकट्यानेही हे नृत्य करता येतं.



**रंजक**

✻ स्पेनमध्ये 'फंडान्गो' नावाचं नृत्य केलं जातं. या नृत्याचा उगम स्पेनमध्ये झाला असला तरी ते या देशाचा शेजारी पोर्तुगालमध्ये खूप लोकप्रिय झालं. या नृत्यप्रकारात वेगवान हालचाली कराव्या लागतात. पावलं जमिनीवर आपटत नाचावं लागतं.

✻ 'यांग्को' हा चीनमधला पारंपरिक नृत्यप्रकार आहे. या नृत्याला एक हजार वर्षांची परंपरा असून विशिष्ट तालात शारीरिक हालचाली कराव्या लागतात.

✻ 'कैबुकी' हा जपानमधला नृत्यप्रकार. यातल्या कलाकारांना विशिष्ट मेक अप केला जातो. या नृत्यात खास वेशभूषाही केली जाते.

✻ कंबोडियात 'सेलिस्टिअल' हा नृत्यप्रकार खूप प्रसिद्ध आहे. यात नृत्याच्या माध्यमातून पौराणिक कथांचं सादरीकरण होतं. यातले कलाकार खूप आकर्षक वेशभूषा करतात.

## समुद्रकिनाऱ्यांनी नटलेला 'गांबिया'

**सफर देशांची**

'गांबिया' या उत्तर-पश्चिम आफ्रिकेतल्या देशाच्या सीमा सेनेगलशी जोडलेल्या आहेत. गांबिया हा आफ्रिका खंडातल्या सर्वात लहान देशांपैकी एक. या देशात फार कमी प्रमाणात धान्य पिकवलं जातं. शेंगदाणे हे इथलं महत्त्वाचं पीक. गांबिया हा शेंगदाण्याची निर्यात करणारा प्रमुख देश आहे. १९६५ मध्ये गांबिया स्वतंत्र झाला. या देशावर ब्रिटिशांचं राज्य होतं. 'बँजूल' ही या देशाची राजधानी. 'सेरेकुंदा' आणि 'ब्रिकामा' ही इथली प्रमुख शहरं. ब्रिटिशांनी राज्य केल्यामुळे इंग्रजी ही गांबियाची प्रमुख भाषा बनली. इतरही काही भाषा इथे बोलल्या जातात.




गांबिया हा खूप छोटा आणि अरूंद असा देश आहे. इथून वाहणारी 'गांबिया' ही नदी आफ्रिका खंडातली प्रमुख नदी आहे. या देशात छोटी बेटंही आहेत. सुंदर समुद्रकिनारे हे गांबियातलं खास आकर्षण. या देशाला ८० किलोमीटरचा समुद्रकिनारा लाभला आहे. इथले समुद्रकिनारे कमी गर्दीचे आणि स्वच्छ असतात. गांबियात येणारे पर्यटक या समुद्रकिनाऱ्यांना भेट दिल्याशिवाय जात नाहीत. गांबियामध्ये बरीच पर्यटन स्थळं आहेत. नैसर्गिक साधनसंपत्ती तसंच वन्यजीवांचं या देशात संरक्षण करण्यात आलं आहे. खास मगरींसाठी इथे स्वतंत्र तलावाची निर्मिती करण्यात आली आहे. या देशातल्या दोन ठिकाणांना युनेस्कोने जागतिक वारसा यादीत स्थान दिलं आहे.


## संधी रूरल मॅनेजमेंटमधल्या

आपल्या देशात ग्रामीण भाग मोठ्या प्रमाणावर आहे. मात्र तिथे म्हणावा तितका विकास झालेला नाही. त्यामुळे तुम्ही रूरल मॅनेजमेंट करून ग्रामीण भागाच्या विकासासाठी प्रयत्न करू शकता. सध्या रूरल मॅनेजमेंट हा अभ्यासक्रम बराच चर्चेत आहे. ग्रामीण भागाचा विकास करण्यासाठी सरकारही अनेक योजना राबवत असतं. गावांना मुख्य प्रवाहाशी जोडण्याचे प्रयत्न होत असतात. रूरल मॅनेजमेंट करून तुम्ही या कामात मदत करू शकता.

रूरल मॅनेजमेंट हे खूप मोठं क्षेत्र आहे. ग्रामीण भागाचा विविध पातळीवर विकास होत असतो. त्यामुळे रूरल प्लॅनिंग अँड डेव्हलपमेंट, नॅचरल रिसॉर्स डेव्हलपमेंट अँड मॅनेजमेंट, रूरल मार्केटिंग अँड मॅनेजमेंट, रूरल कम्युनिटिज फॅसिलिटी अँड सर्व्हिसेस, सोशल सिक्युरिटी अँड प्रॉब्लेम्स, पॉलिसीज अँड प्रोग्राम अशा रूरल मॅनेजमेंटच्या विविध शाखा आहेत. तुम्ही तुमच्या आवडीनुसार अभ्यासक्रमाची निवड करू शकता. बारावीनंतर रूरल मॅनेजमेंटमध्ये डिप्लोमा करता येईल. सहा महिने तसंच एक वर्षाचा हा अभ्यासक्रम असतो. या विषयात पदवीही मिळवता येईल. पुढे पीएचडी करण्याचीही संधी आहे.

**कोण होणार?**

हा अभ्यासक्रम पूर्ण केल्यानंतर सेल्स अँड बिझनेस डेव्हलपमेंट मॅनेजर, रूरल डेव्हलपमेंट ऑफिसर, बिझनेस डेव्हलपमेंट एक्सिक्युटिव्ह, सेल्स ऑफिसर अशा पदांवर काम करता येईल. विविध सरकारी संस्थांमध्ये तुम्हाला संधी मिळू शकते. ग्रामीण भागात काम करणाऱ्या सेवाभावी संस्थाही रूरल मॅनेजर्सच्या शोधात असतात.




## प्लास्टिक बाटलीचं बनवा फूल

**करून तर पहा**

घराबाहेर पडल्यावर शुद्ध पाणी मिळणं अवघड असतं. अशा वेळी कुठलंही पाणी पिण्याचा धोका न पत्करता बाटलीबंद पाणी विकत घेतलं जातं. पण मित्रांनो, तुम्हाला माहीत आहे, प्लास्टिक बाटल्यांच्या या कचऱ्यामुळे पर्यावरणविषयक मोठ्यासमस्या जन्म घेतात. म्हणूनच या बाटल्याटाकून न देता त्यांचा वापर करायला हवा. चला तर, आज प्लास्टिकच्या बाटल्यांपासून छानशी कलाकृती कशी साकारायची ते पाहू.

**साहित्य :** प्लास्टिकची बाटली, गम, कात्री, माती किंवा वाळू, गोट्या किंवा गुळगुळीत दगड, स्ट्रॉ इत्यादी.

**कृती :** सर्वप्रथम बाटलीवरील लेबल आणि झाकणं काढा. पण ती टाकून देऊ नका. आता ती मधोमध कापा. अर्धा भाग ठेऊन द्या. बाटलीच्या वरच्या अर्ध्या भागावर एक इंच रुंदीच्या चिरा द्या. साधारण आठ पाकळ्या होतील अशा पद्धतीने बाटली कापा. या पाकळ्या बाहेरच्या बाजूने वाकवा. बाटलीचं झाकण लावा. आता या झाकणात आतल्या बाजूला पांढरा गम लावा. यात स्ट्रॉ अडकवा. बाटलीचं झाकण घट्ट बंद करा. त्यावर लेबल गुंडाळता येईल. यामुळे स्ट्रॉ स्थिर राहील. आता बाटलीचा उरलेला अर्धा भाग घ्या. त्यात माती किंवा वाळू भरा. साधारण दीड ते दोन इंचांपर्यंत वाळू भरा. आता स्ट्रॉचा खालचा भाग या वाळूत रूतवा. वर दगड किंवा गोट्या ठेवा. यामुळे स्ट्रॉ हलणार नाही.



पाकळ्या सजवण्यासाठी रंगांचा किंवा गिफ्ट पेपरचा वापर करता येईल. कात्रीने कापून पाकळ्यांना गोल आकार देता येईल. कल्पनाशक्तीला वाव देऊन पाकळ्यांना वेगवेगळे आकारही देता येतील. या पाकळ्या मनपसंत रंगात रंगवता येतील.

**दोस्त हे मस्त**

### सर्वात छोटा सरडा

'ब्रुकेशिया मायक्रा' नावाचा एक सरडा आहे. अवघ्या ३० मिलीमीटर लांबीचा मायक्रा जगातला सर्वात लहान सरडा आहे. मादागास्कारमधल्या एका छोट्याशा बेटावर शास्त्रज्ञांना हा सरडा सापडला. या सरड्याचे नर आणि मादी फक्त ३० मिलीमीटरपर्यंत वाढतात. हे छोटेसे सरडे तुमच्या मुठीतही आरामात सामावतील.



**दोस्त हे मस्त**

### कोकनट क्रॅबविषयी...

दोस्तांनो, खेकड्याच्या वेगवेगळ्या प्रजाती आहेत. त्यापैकी एक म्हणजे कोकोनट क्रॅब. हा खेकडा पॅसिफिक बेटांवर आढळतो. त्याचं दिसणं आणि खाणं-पिणं यावरून त्याला कोकोनट क्रॅब म्हटलं जातं.



कोकनट क्रॅबची त्वचा राखाडी आणि हिरव्या रंगाची असते. खोबरं खाण्यासाठी तो नारळाच्या झाडावर चढतो. हे खेकडे दिवसा झोपतात आणि रात्री जागतात.

**लाईफस्टाईल**

### यांनाही असते एक्सपायरी डेट

अन्नपदार्थ, औषधं, मेकअप प्रोडक्ट्स आदींची एक्सपायरी डेट असते. म्हणजे विशिष्ट काळानंतर ही उत्पादनं वापरायोग्य रहात नाहीत. पण नॅपकिन टॉवेलसारख्या वस्तू आपण वर्षानुवर्षं वापरतो. हे चुकीचं आहे. लक्षात ठेवा, टूथब्रश दर तीन महिन्यांनी बदलायचा असतो. कंगवा एक वर्षापेक्षा जास्त वापरायचा नसतो. टॉवेलमध्ये बॅक्टेरियांची वाढ होते. त्यामुळे तो वारंवार धुवायला हवा. शिवाय तो कितीही चांगला असला अथवा डिझाईन तुम्हाला कितीही आवडत असलं तरी दर तीन वर्षांनी टॉवेल बदलायला हवा. आरोग्यासाठी हे नियम पाळायलाच हवेत.



**योगा टाईम**

### अशी आहे ज्ञानमुद्रा



मुलांनो, एकाग्रता वाढवण्यासाठी तुम्ही ज्ञानमुद्रा करू शकता. यासाठी गुडघे दुमडून बसा. हाताचं पहिलं बोट आणि करंगळी जोडून 'ओ' सारखा आकार करा आणि डोळ्यांजवळ न्या. या गोलातून तुम्हाला बाहेर बघायचं आहे. ही मुद्रा नियमित केल्यामुळे अभ्यास करताना तुमचं मन एकाग्र होईल.

## वर्ष नवे संकल्प नवे

**नवीन काही**

काय मित्रांनो, नववर्षाची पार्टी कशी झाली? काय काय मजा केली या पार्टीत? नवीन वर्षाचे काही संकल्पही सोडले असतील. आपण दरवर्षी एखादे चांगले काम हाती घेण्याचं ठरवतो. पण काही दिवसांतच निग्रह गळून पडतात आणि आपण नेहमीच्या रुटीनमध्ये परततो. पण मित्रांनो, या वर्षीतरी असं वागायचं नाही. नवीन वर्षात पहिला संकल्प करु या तो व्यायामाचा. आपण शाळेत, क्लासमध्ये अभ्यास करतो, घरी असल्यावर टीव्ही बघतो, गेम्स खेळतो. पण या सगळ्यात व्यायाम करणं मात्र सोयीस्कर विसरतो. पण मित्रांनो, आरोग्य राखायचं असेल आणि शरीर बळकट बनवायचं असेल तर व्यायामाला पर्याय नाही. तेव्हा आपणही लवकर उठून जॉगिंगला जाऊ या, दोरीवरच्या उड्या मारू या, लोंबकाळण्याचा व्यायाम करु या, सूर्यनमस्कार घालू या आणि एखादा खेळही खेळू या. या सर्व गोष्टी आपल्याला शारीरिक स्वास्थ्य देतीलच त्याचबरोबर संयम शिकवतील आणि स्पर्धात्मक वातावरणात खंबीरपणे उभं राहण्यासाठी तयारही करतील.



दुसरा संकल्प हवा डायरी लिहिण्याचा. आपण दुसऱ्यांशी बोलतो त्यापेक्षा जास्त स्वत:ची गप्पा मारतो. अनेक विषयांवर सखोल विचार करतो. आपल्या मनात काही शंका येतात. हे सगळे विचार डायरीत लिहून ठेवा आणि संबंधित व्यक्तीचे मार्गदर्शन घेऊन उत्तरं शोधा. यामुळेही ज्ञानात भर पडेल. सगळ्यांशी गोड बोलण्याचा आणि चांगलं वागण्याचा निश्चयही महत्त्वाचा आहे बरं... यामुळे तुम्हाला बरेच मित्र मिळतील आणि त्यांची मदतही मिळेल.

## ओळखा पाहू

**जिज्ञासा**

१) पृथ्वी सूर्याभोवती फिरते हा शोध सर्वात पहिल्यांदा लावणारा शास्त्रज्ञ कोण?
२) 'असोसिएटेड' प्रेस ही कोणत्या देशातली वृत्तसंस्था आहे?
३) 'नेताजी सुभाष नॅशनल इन्स्टीट्यूट ऑफ स्पोर्टस' कोणत्या शहरात आहे?
४) तिरूचिरापल्ली हे शहर कोणत्या नदीकिनारी आहे?
५) टायगर वूड्स कोणता खेळ खेळतो?
६) युनेस्कोची स्थापना कधी झाली?
७) भारताचं सर्वात जुनं निमलष्करी दल कोणतं?
८) शेक्सपिअरचा जन्म कोणत्या वर्षी झाला?
९) आसाममधला प्रसिद्ध नृत्यप्रकार कोणता?
१०) राजस्थानातलं 'झवार' कशासाठी प्रसिद्ध आहे?

उत्तरं : १) कोपर्निकस २) अमेरिका ३) पटियाला ४) कावेरी ५) गोल्फ ६) १९४६ ७) आसाम रायफल्स ८) १५६४ ९) बिहू १०) झिंकच्या खाणींसाठी

**चित्र रंगवा**



## निळकंठाची निळाई


**वेचक वेधक**

आज आपण माहिती घेऊ या एका सुंदर पक्ष्याची. याचं नाव आहे निलकंठ. याला ब्लु जे किंवा इंडियन रोलर या नावानंही ओळखतात. निळकंठ उडताना तर खूपच छान दिसतो. उडताना पंखांमधली निळाई याचं रुप शतपटीनं आकर्षक बनवते. निलकंठाचा आकार कबुतराएवढा असतो. निळे पंख असल्यानं आणि कंठावरही निळी झाक असल्यानं याचं नाव पडलंय निळकंठ. याच्या पाठीवर आणि मानेवर हलका भूरा रंग असतो तर पोट आणि शेपटीपाशी पिवळसर निळा रंग असतो. उडताना पंखांमध्ये लपलेल्या या सगळ्या छटा समोर येतात. हा पक्षी एकटं राहणं जास्त पसंत करतो. संपूर्ण भारतात त्याचं वास्तव्य आढळतो. विशेषत: शहरं आणि गावांजवळच्या विरळ जंगलात हे पक्षी मोठ्या संख्येने आढळतात. या पक्ष्याचं अन्न म्हणजे मोठे किडे, पाली आणि बेडूक.



शिकार दिसताच ते एकदम झडप घालतात आणि फांदीवर बसून एका झटक्यात गिळून टाकतात. कीटक हे मुख्य अन्न असल्यामुळे निलकंठ शेतकऱ्यांचा मित्र आहे. विविध प्रकारचे कीटक धान्याची नासधूस करतात हे आपण जाणतोच. ते दाणे फस्त करतात, पानं खातात. पण निलकंठासारखे पक्षी हे किडे खातात आणि त्यांची संख्या मर्यादीत राहून पिकांना संरक्षण मिळतं. मग काय मंडळी, आता बाहेर पडाल तेव्हा निलकंठ दिसतोय ते पहाणार का? तीव्र आवाजात कलकलाट करत उडणारा निळ्या पंखांचा निलकंठ मित्रांनाही अवश्य दाखवा.

**ठिपके जुळवा**



## करू या गणिताशी दोस्ती!

**स्टडी टिप्स**

मित्रांनो, परीक्षा अजून लांब आहेत म्हणून अभ्यासाला सुट्टी दिली नाहीत ना? नाहीतर शाळेत अभ्यासाचा ताण नसला म्हणून तुम्हीही अभ्यासाला सुट्टी दिली असे व्हायचे. पण हा आळस नंतर महागात पडतो ना! परीक्षा जवळ आल्यावर एकच धांदल उडते आणि पुरेसा अभ्यास न झाल्यामुळे परीक्षेत कमी गुण मिळतात. हे टाळण्यासाठी आत्तापासूनच थोडी थोडी तयारी करू या. आम्हाला माहितीये, तुमच्यापैकी अनेकांना गणिताचा अभ्यास करायला अजिबात आवडत नाही. त्यातील आकडेमोड आणि गुंतागुंत डोक्याला मुंग्या आणते. पण हा अभ्यास वाटतो तेवढा अवघड नाहीच मुळी. तुम्ही योग्य त्या पद्धतीनं गणिताचा अभ्यास केला तर आपोआप गणितं सुटत जातील आणि उत्तर मिळत जातील. यासाठी शिक्षक, मोठी भावंडं आणि मित्रांची मदत घ्या. तुम्हाला माहिती आहेच गणितातले सगळे टॉपिक्स आणि चॅप्टर्स एकमेकांशी संबंधित असतात. जर तुम्ही आधीचा धडा व्यवस्थित अभ्यासला नाही तर पुढचं काहीच कळणार नाही आणि गणिताप्रती अरुची वाढत जाईल. तेव्हा पहिली पायरी म्हणजे प्रत्येक धडा काळजीपूर्वक अभ्यासा. शाळेतल्या पुस्तकांव्यतिरिक्त सरावासाठी आणखी दोन-तीन पुस्तकांची मदत घ्या. गणित हा विषय लॉजिकवर अवलंबून आहे.





इथे पाठांतराचा काही उपयोग नाही. पहिली स्टेप विसरली की पुढचं सगळचं गाडं गडगडणार. तेव्हा भरपूर गणितं सोडवा. सराव करताना आकडेमोड करण्यासाठी कॅल्क्युलेटर वापरु नका. त्याऐवजी वेगवान आकडेमोड करण्याच्या काही ट्रिक्स शिकून घ्या. अलिकडे या ट्रिक्स शिकवणारे क्लासेस सगळीकडे घेतले जातात. वैदिक मॅथ्समध्ये कितीही मोठ्या संख्यांचा गुणाकार, भागाकार, बेरीज, वजाबाकी झटपट करण्याच्या टिप्स आहेत. पाढे पाठ केलेत तरी तुमचं बरचसं काम हलकं होईल. यासाठी घरामध्ये तक्ते लावून ठेवा. तुमचा सतत वावर असेल अशा ठिकाणी हे तक्ते असतील अशी खात्री करा. सतत त्यावर नजर फिरवा. शक्य तेवढं लक्षात ठेवण्याचा प्रयत्न करा. मग बघा तुमचे गणितातले गुण वाढतात की नाही!



# कलासक्त

## जनकवि पी. सावळाराम



**शरद कोरडे**

पुण्याहून कोल्हापूरला निघालेली संध्याकाळची रेल्वेगाडी प्लॅटफॉर्मवर उभी होती. मे महिना असल्याने गाडीला गर्दी होती. दुपारी झालेल्या लग्नाचे एक वऱ्हाड प्लॅटफॉर्मवर आले. वऱ्हाडी मंडळींनी घाईघाईत आपापल्या जागा पकडल्या. नवरी मुलगी पुण्याहून सासरी कोल्हापूरला चालली होती. माहेरकडील करवल्यांचे डोळे पाण्याने भरलेले होते. मुलीची आई आपल्या कोकराला मिठी मारत रडत होती. मुलीच्या होणाऱ्या विरहाने ती कोलमडली होती. आता मला दिवसभर आई ऽऽ आई ऽऽ म्हणून कोण प्रेमाने हाक मारणार? तुझ्याशिवाय मला कोण आहे? एकाकीपणे मी कसे जीवन कंठणार. अशा मायेच्या उमाळ्याने ती आपल्या मुलीचा चेहरा ओंजळीत धरून रडत होती. हे दृश्य पाहून वऱ्हाडातील अनेक मंडळींचे डोळेही पाणावले. वरमाईने त्यांची समजूत काढली. तुमची मुलगी माझी सून नाही तर, मुलगीच असेल. तिला मी सुखात ठेवीन. आईच्या नयनातील अश्रुधारा थांबेनात. कारण पतीच्या निधनानंतर मोठ्या धीराने व कष्टाने तिने मुलीचे संगोपन केले होते. दोघींचेही एकमेकींवर पराकोटीचे प्रेम होते. वरमाईने प्रेमाने सूनेचा हात धरून तिला गाडीत बसविले. मुलीकडील करवल्यांनी तिच्या आईला सावरले. गाडी सुटेपर्यंत आई-मुलगी एकमेकांकडे पाहून रडत होत्या. गाडी फलाटावरून सुटली तेव्हा खिडकीतून मुलगी आईकडे पाहून हात हलवित होती व आई तिला प्रतिसाद देत आपला हात हलवित होती व गाडी स्टेशनपासून दूर गेली तरी मुलगी खिडकीबाहेर आपला हात काढून हलवित होती. बहुदा तिची आईही फलाटावरून दूर गेलेल्या गाडीकडे पाहून हात हलवित असावी. हा प्रसंग त्या गाडीत बसलेली एक सुसंस्कृत, संवेदनशील व्यक्ती पहात होती व तिच्याही डोळ्यातून हा करूण प्रसंग पाहून अश्रू ओघळत होते. कोल्हापूरला उतरेपर्यंत ते अस्वस्थ होते. घरी गेल्यावर त्यांनी प्रथम वही उघडून त्यावर एक गीत लिहिले.

**गंगा यमुना डोळ्यात उभ्या का?**
**जा मुली जा दिल्या घरी तू सुखी रहा!**
**कडकडून तू मिठी मारता बाळे**
**बालपण आले आले घुमवित घुंगुरवाले**
**आठवले सारे सारे गहिवरले डोळे**
**कंठ मायेचे तुला सांगती जा**

या कवीचे नाव होते पी सावळाराम. हे गीत थोर संगीतकार वसंत प्रभू यांनी संगीतबद्ध केले व साक्षात गानसरस्वती लता मंगेशकर यांनी ते गाणे गायले होते.

निवृत्तीनाथ रावजी पाटील उर्फ पी. सावळाराम यांचा जन्म ४ जुलै १९१३ मध्ये कोल्हापूरजवळील येडेनिपाणी येथे झाला. त्यांचे शिक्षण कोल्हापूरच्या राजाराम कॉलेजमध्ये झाले. १९४४ मध्ये ते ठाण्याला येऊन स्थायिक झाले. मराठी भावगीते रसिकांमध्ये रूजविण्यात ग.दि. माडगूळकर, शांता शेळके यांच्यासह पी. सावळाराम यांचे नाव घेतले जाते. मराठी गीतांना सुवर्णकाळ आणण्यात त्यांचाही मोठा वाटा आहे. त्यांच्या काव्याच्या साध्या सोप्या रचनांमुळे कुसुमाग्रज यांनी त्यांना 'जनकवी' ही उपाधी दिली. ठाणे-मुंबईच्या जनतेने पी. सावळाराम यांच्यावर अतोनात प्रेम केले. ते ठाणे महापालिकेचे महापौरही झाले. त्यांच्या नावाने महापालिकेने संगीतक्षेत्रात योगदान देणाऱ्या कलावंतांना 'पी. सावळाराम पुरस्कार' देण्यास सुरूवात केली. संगीतकार यशवंत देव, गायक सुरेश वाडकर यांना व नाट्यचित्र अभिनेता शिवाजी साटम यांना हे पुरस्कार मिळाले आहेत. ठाण्यातील वाद्यवृंदांनी पी. सावळाराम यांच्या गीतांवर 'गंगायमुना' व 'अक्षयगाणी' हे लोकप्रिय कार्यक्रम अनेक वर्षे केले.



पी. सावळाराम यांनी अपुरे माझे स्वप्न राहिले, असावे घर ते आपुले छान, आम्ही गोकुळच्या नारी, आली हासत पहिली रात, उठी गोविंदा उठी गोपाळा, ओळख पहिली गाली हसते, कलेकलेने चंद्र वाढतो, कुणी गोविंद घ्या, कोकिळ कुहूकुहू बोले, खरा ब्राह्मण नाथची झाला, या कोकिळा गा, गाव तुझे पैलतिरी आदी अनेक गोड गीते लिहिली व ती लोकप्रिय झाली.

ह.ना. आपटे यांच्या 'उषःकाल' या कादंबरीतील नायक 'सावळाराम' या व्यक्तिरेखेच्या प्रेमात पडून आपले निवृत्तीनाथ या नावाऐवजी पाटील मधील पी. घेऊन त्यांनी पी. सावळाराम हे नाव कवी म्हणून धारण केले. लता मंगेशकर व आशा भोसले यांच्या अमृततुल्य स्वरामध्ये त्यांची अनेक गाणी रेकॉर्ड आली. वात्सल्य, कारूण्य, भक्ती व खानदानी सोज्वळ श्रृंगार या त्यांच्या वैशिष्ट्यामुळे मराठी मनावर त्यांनी अधिराज्य गाजवले. ज्ञानदेव बाळ माझ्या सांगे गीता भगवंता, कशाला जाऊ मी पंढरपुरी, जो आवडतो सर्वांना तोचि आवडे देवाला, शरण तुला भगवंता, उघडीद्वार पूर्व दिशा, भक्तीच्या फुलांचा बोलतो सुवास, मजवरी माधव रूसला बाई, चंद्रकला रुक्मिणी नेसली, आदी गीते त्यांची साक्ष देतात.

मा. दिनानाथ मंगेशकर यांच्या स्मृतीदिनाचा भव्य कार्यक्रम करण्याचे मंगेशकर भावंडांनी ठरविले होते. त्यावेळी लता मंगेशकर यांनी पी. सावळाराम यांना त्यांच्यावर एक गीत लिहिण्याची विनंती पी. सावळाराम यांनी केली, जे गीत मुंबईत होणाऱ्या कार्यक्रमात त्यांना सादर करता येईल. काही दिवसांनी पी. सावळाराम यांनी लता मंगेशकर यांना फोन केला व आपण सुचविल्याप्रमाणे गाणे लिहिले आहे. आपणास वेळ असेल तर मुखडा ऐकवतो, असे म्हटल्यावर लतादिदींनी त्यांना ते ऐकविण्याची विनंती केली. पी. सावळाराम यांनी फोनवर मुखडा सांगितला, 'कल्पवृक्ष कन्येसाठी लावूनिया बाबा गेला, वैभवाने बहरूनी आला, याल का हो बघायला', मुखडा ऐकविल्यावर पलिकडून कोणताही प्रतिसाद आला नाही. शांतता पसरली. पी. सावळाराम यांनी थोडी वाट पाहून विचारले, 'काय झाले?' गाणे आवडले नाही?' त्यांना पलिकडून हुंदक्याचा आवाज आला. मुखडा ऐकून वडिलांच्या आठवणीने दिदींचा कंठ दाटून आला होता. पुढील कडवे होते.

**'तुम्ही गेला आणिक तुमच्या**
**देवपण नावा आले**
**सप्तस्वर्ग चालत येता थोरपण तुमचे कळले**
**गंगेकाठी घर हे आपुले तिर्थक्षेत्र काशी झाले**
**तुम्हाविण शोभा नाही वैभवाच्या देऊळाला'**

पी. सावळाराम यांनी काही निवडक मराठी चित्रपटांसाठी गाणी लिहिली होती. त्यात माधव शिंदे निर्मित व दिग्दर्शित १९६० सालचा 'कन्यादान' ज्यात उषा किरण, सूर्यकांत, राजा गोसावी यांनी कामे केली होती. त्यातील 'माझिया नयनांच्या कोंदणी उमलली शुक्राची चांदणी, लेक लाडकी या घरची, मानसीचा चित्रकार तू तुझे निरंतन चित्र काढतो, कोकिळ कुहू कुहू बोले' ही वसंत प्रभू यांनी संगीत दिलेली गीते खूप गाजली होती. यशवंत पेठकर यांच्या 'मोलकरीण' या चित्रपटासाठी त्यांनी गदिमांसोबत काही गीते लिहिली होती. त्यातील 'देव जरी मज कधी भेटला माग हवे ते माग म्हणाला', हे वसंत देसाई यांनी संगीतबद्ध केलेले गाणे प्रचंड लोकप्रिय झाले. अभिनेत्री व निर्माती शुभा खोटे यांच्या 'चिमुकला पाहुणा' या १९६७ सालच्या चित्रपटासाठी पी. सावळाराम यांनी 'तुजसाठी शंकरा', 'हले झुलत डुले पाळणा', 'प्रीत ही पहिली वाट ही पाहिली' ही गाणी लिहिली. ज्यांना स्नेहल भाटकर यांनी संगीत दिले होते. माधव शिंदे निर्मित व दिग्दर्शित 'धर्मकन्या' या १९६८ सालच्या चित्रपटासाठी त्यांनी 'गोड गोजिरी लाज लाजरी ताईच होणार नवरी', 'सखी ग मुरली मोहन मोही मना', 'गंगेचं पाणी पाटाला' ही अजरामर गीते लिहिली, ज्यांना पं. हृदयनाथ मंगेशकर यांनी संगीत दिले होते. पंडित महादेव शास्त्री जोशी यांची कथा-पटकथा असलेल्या या चित्रपटात अनुपमा चंद्रकांत गोखले, राजशेखर, जयश्री टी व हंसा वाडकर यांच्या भूमिका होत्या. या चित्रपटाला भारत सरकारचे राष्ट्रपती रौप्यपदक मिळाले होते.

पी. सावळाराम यांचे चरित्र 'जनकवि पी. सावळाराम' या नावाने मधु पोतदार यांनी लिहिलेले होते. २२ डिसेंबर १९९७ साली त्यांनी या जगाचा निरोप घेतला. त्यांची अजरामर भावगीते व चित्रपटगीते आपण विसरू शकत नाही. ●●

## अभिनेते रमेश भाटकर यांची एक करुण शोकांतिका



**श्रीराम शेटये**

भारतरत्न घटनेचे शिल्पकार डॉ. बाबासाहेब आंबेडकर म्हणाले होते. ''विद्या हे दुधारी शस्त्र आहे. जेव्हा ती शिलवान माणसाच्या हातात असेल तेव्हा तो जनतेचे भले करील. जनतेला न्याय मिळवून देईल. परंतू त्याच विद्येचा वापर चारित्र्यहीन दुष्ट माणूस मात्र आपल्या बुद्धिचा वापर धूर्तपणाने करील. कायद्यातील पळवाटांचा आपल्या बुद्धिच्या आणि ज्ञानाच्या आधारे गैरफायदा घेऊन जनतेचा घात करेल.''

सध्याच्या देशातील राजकिय व सामाजिक घडामोडींचा विचार केला तर बाबासाहेब किती दूरदर्शी होते. याची कल्पना येते. लिहिण्याचे कारण हेच आहे की एखादा निर्दोष माणूसही षढयंत्रात कसा अडकतो? अलिकडेच मुंबई उच्च न्यायालयाच्या निवृत न्यायमूर्ती श्रीमती मृदूला भाटकर यांचे एक पुस्तक प्रकाशित झाले. त्यातूनच मग रमेश भाटकर यांची बाजू समोर आली. रमेश भाटकर यांचे वडील संगीतकार होते. साहजिकच रमेश भाटकर यांना आपल्या वडीलांकडून चित्रपट क्षेत्राचा वारसा लाभला होता. दादरला वाडीवस्तीमध्ये रमेश भाटकर रहायचे. त्यावेळची मुंबई खुपच छान होती. मुंबईत वाडी वस्त्या होत्या. भाज्यांचे मळे होते. टांगा आणि ट्राम गाडीचा तो जमाना होता. रमेशने संगीत शिकाव असे त्यांच्या वडिलांना वाटे. रमेश भाटकर यांच्या शेजारी संगीतकार लक्ष्मीकांत प्यारेलाल या जोडीतील प्यारेलाल यांचे घर होते. प्यारेलाल यांचे वडील रामप्रसाद शर्मा यांच्याकडे रमेश भाटकर व्हायोलीन शिकायला जायचे. अब्दूल करीम खा रमेश भाटकर यांना तबला शिकवायला घरी यायचे. परंतू रमेश भाटकर तेव्हा वयाने लहान होते. तबला शिकता शिकता ते झोपून जायचे. या संगीत क्षेत्रात काही ते येऊ शकले नाहीत.

रमेश भाटकर यांचे पहिले ते दहावीपर्यंतचे शिक्षण दादरच्या महाराष्ट्र हायस्कुलमध्ये झाले. जेथे त्यांची आई शिक्षिका होती. पुढील शिक्षण किर्ती कॉलेज मध्ये झाले. पुढे रमेश भाटकर पुणे येथे टेल्को कंपनीत अप्रेंटीस म्हणून नोकरीस लागले आणि प्रशिक्षण पुर्ण झाल्यावर टेल्कोमध्ये नोकरीस लागले. सुहास वाळूंजकर टेल्को मध्ये नाटक बसवायचा. या नाटकातून रमेश भाटकर यांनी छोट्या मोठ्या भुमिका केल्या.

सुहास वाळूंजकर आणि माधव वझे यासारख्या नाट्य कलाकारांनी रमेश भाटकर यांना नाटकात भूमिका करण्यास प्रवृत्त केले. पुढे पुण्यातील व्यावसायिक नाटक कंपन्यातून रमेश भाटकर आपली नोकरी सांभाळून काम करू लागले. त्यांचे काम प्रेक्षकांना आवडू लागले. त्यांच्या नाटकांना प्रथम क्रमांकाची अनेक पारितोषिके मिळाली. 'कालाय तस्मै नम:'. हे त्यांचे पहिले नाटक. त्यानंतर 'अश्रूंची झाली फूले' या नाटकात काम केले. १९७५ मध्ये या नाटकातील लाल्या ही त्यांची भूमिका लोकप्रिय झाली. ही भुमिका डॉ. काशिनाथ घाणेकर यांनी गाजवलेली होती. मग मात्र रमेश भाटकर यांनी मागे वळून पाहिले नाही. दुरदर्शन मालिका, चित्रपट असा चढता आलेख सुरुच राहिला. फर्ग्यूसन कॉलेजची एकांकिका बसविताना मृदूला बेहरे या मुलीशी त्यांची ओळख झाली. ओळखीचे रूपांतर पुढे प्रेमात झाले. विहाह बंधनात अडकले. चित्रपट आणि नाट्य क्षेत्रात करिअर उत्तम झाले. पत्नी मृदूला भाटकर न्यायाधीश झाल्या. सर्व आनंदात सुखाचा संसार चालू होता.

पण तो काळा दिवस आला सन २००७ ची एक सकाळ महाराष्ट्रातील सुप्रसिद्ध न्यायाधीश असलेल्या श्रीमती मृदूला भाटकर आपले पती सुप्रसिद्ध अभिनेते रमेश भाटकर यांना फोन करून तातडीने घरी यायला सांगतात. अर्थात रमेश भाटकर बाहेरगावी चित्रपटाच्या शूटिंग दरम्यान व्यस्त असतात. त्यांना तातडीने येणे शक्य नसते. कारण तसे केल्यास चित्रपट निर्माता आणि सहकलाकार यांना फार मोठा आर्थिक फटका बसू शकतो. ही नुकसान भरपाई रमेश भाटकर यांना भरुन द्यावी लागली असती. परंतू घटनाच अशी होती की रमेश भाटकर यांना हे सगळे नुकसान सोसून परतावेच लागले. त्या दिवशीच्या महाराष्ट्रातील सर्व प्रमुख वर्तमानपत्रांच्या मुखपृष्ठावर सकाळीच एक बातमी झळकली होती. तसेच दिवसभर टीव्ही वरही ही बातमी पुन्हा पुन्हा झळकत होती. ती बातमी होती सुप्रसिद्ध अभिनेते रमेश भाटकर यांनी एका तरूणीवर बलात्कार केल्याची. रमेश भाटकर तातडीने घरी परतले. घरी येताच पत्नी मृदूला भाटकर यांनी त्यांना याबाबत जेव्हा प्रश्न विचारता तेव्हा रमेश भाटकर यांना याची काही कल्पनाच नव्हती. कारण जी घटना कधी घडलीच नव्हती त्याबाबत रमेश भाटकर यांना काय माहित असणार? ही बातमी धादांत खोटी होती. ते मीडियाला हाताशी धरून रचलेले एक रीतसर षडयंत्र होते. रमेश भाटकर यांना मृदूला भाटकर यांनी तरीही प्रश्न विचारता ''रमेश तू खरंच असं काही केलेलं नाहिस ना?''

रमेश भाटकर म्हणाले, ''मी निर्दोष आहे. जरी पोलिसांनी मला थर्ड डीग्री लावली तरी मग घाबरणार नाही. सत्य आहे तेच सांगेन. पण तू कोणताही हस्तक्षेप करु नकोस ज्याने तुझ्या न्यायाधीश पदावर डाग लागेल.'' ''दुसऱ्या दिवशी सकाळी मॉर्निंग वॉक साठी निघताना न्यायाधीश पदावर असलेल्या मृदूला भाटकर आणि अभिनेते रमेश भाटकर यांना घरातून बाहेर पडून लोकांसमोर जायचे धाडस होत नव्हते.'' दररोज दोघे सकाळी मुंबईतील मरीन लाईन्सच्या किनाऱ्यावर मॉर्निंग वॉक साठी जात असत. परंतू प्रसारमाध्यमांनी आज त्यांना एवढे बदनाम केले होते की समाजासमोर जायला हिंमत होत नव्हती. परंतू मग दोघांनीही ठरवलं आपण जो गुन्हा केलाच नाही त्याची भिती का बाळगावी. दोघेही परत एकदा मॉर्निंग वॉकला गेले. परंतू लोकांचा बदललेला दृष्टीकोन आणि नजरा पाहून दोघांनीही आत्महत्या करावीशी वाटली. या केसमध्ये मृदूला भाटकर यांच्या एक गोष्ट लक्षात आली. ती अशी की बातम्या मीडियावर दाखविण्यात आल्या परंतू ही जर अशी गोष्ट आहे. तर मग पोलीस घरी का आले नाहीत रमेश भाटकर यांना अरेस्ट करायला? परंतू शोकांतिका अशी होती की मृदूला भाटकर स्वत: एक न्यायाधीश पदावर असल्यामुळे आपल्या नात्यातील आरोपीच्या कोणत्याही कामकाजात त्यांना हस्तक्षेप करता येणार नव्हता. परंतू पोलीस अटक करण्यासाठी आलेले नाहीत ही बाब लक्षात येताच रमेश भाटकर यांनी कोर्टात जाऊन अटकपूर्व जामिन मिळविला. मग ही खोट्या केसची लढाई असली तरी रमेश भाटकर यांना आणि त्यांच्या कुटूंबियांना सहा वर्षे लढा द्यावा लागला. भगवान कृष्ण गीता उपदेश करताना अर्जूनाला म्हणतात, ''हे अर्जुन तू युद्ध कर समोर असलेल्या नातेवाईकांना अभय देण्यासाठी तू युद्ध सोडून सन्यास घेतलास तर लोक तुला युद्धाला घाबरुन पळाला म्हणून कलंक लावतील. जो किर्तिमान आहे त्याला लावलेला कलंक हा खरा असला काय? किंवा खोटा असला काय?'' त्याला तो मृत्यूसमान आहे. ''रमेश भाटकर सहा वर्षाच्या न्यायालयीन लढाई नंतर निर्दोष सिध्द झाले. परंतू हा कलंक मुंबई उच्च न्यायलयाच्या न्यायमूर्ती या सारख्या पदावर पोहचलेल्या मृदूला भाटकर आणि जनमाणसात लोकप्रिय असलेले अभिनेते रमेश भाटकर यांच्यासाठी मृत्यूसमानच होता. एका खोट्या केसमुळे मुंबई उच्च न्यायालयाच्या न्यायमूर्ती हतबल होऊ शकतात तर सर्वसामान्यांची काय कथा?

आता या सगळ्या घटनेमागे अनेक कंगोरे होते. मृदूला भाटकर स्वतः न्यायाधीश होत्या. मृदूला भाटकर यांचे वडील म्हणजे रमेश भाटकर यांचे सासरे देखील न्यायाधीश होते. अनेक वेगवेगळ्या कोर्टात अनेक वर्षे दोघेही अनेक गुन्हेगारांचे खटले हाताळत होते. या प्रकरणात राग ठेऊन म्हणा किंवा न्यायाधीशांवर दबावासाठी म्हणा हे सगळे प्रकार चालू असतात. राजकिय दबाव, मीडीयाला हाताशी धरून अनेक खेळ केले जातात. अर्थात न्यायाधीश पदावर असलेल्या व्यक्तीला मीडियासमोर बोलण्यास कायद्याने प्रतिबंध आहे. त्याला आपली बाजू लोकांसमोर निवृत होईपर्यंत कधीच मांडता येत नाही. भारतीय लोकशाहीची ही तऱ्हा बघितल्यावर वरती उल्लेख केलेले डॉ. बाबासाहेब आंबेडकरांचे शब्द आठवतात. शिलवान आणि प्रामाणिक नसलेले बुद्धिमान लोक शिक्षणाचा कसा दुधारी दुरूपयोग करून घात करतात ते लक्षात येते. कायदे मंडळ, कार्यकारी मंडळ, न्याय मंडळ आणि मीडीया (प्रसारमाध्यमे) हे लोकशाहीचे हे चार स्तंभ. या चार खांबावर भारतीय लोकशाही उभी आहे. परंतू भारत स्वातंत्र्य होऊन सुमारे पंचाहत्तर वर्षे होऊन गेली. या पंचाहत्तर वर्षात लोकशाहीच्या या चारी स्तंभांना भ्रष्टाचाराच्या वाळवीने हळूहळू पोखरले आहे. आजची भारतीय लोकशाही हा पोकळ डोलारा आहे. एक सरपंच पदावरचा माणूस त्याची संपत्ती एकदोन करोड आहे. नगरसेवक, आमदार, खासदार यांची संपत्ती काही करोडच्या घरात आहे. निवडणूकीतील प्रतिज्ञापत्र पहा! असा पैसा सरळ मार्गाने मिळतो का? कायदे मंडळ, कार्यकारी मंडळ हे या लोकप्रतिनिधींमधूनच बनते. मग हे दोन्ही खांब भ्रटाचाराच्या वाळवीने किती पोखरले आहेत त्याची कल्पना करा.

तिसरा खांब म्हणजे न्याय मंडळ यामध्ये न्यायाधीशांवर लोकांचा विश्वास आहे. परंतू त्यांच्यावर कसा दबाव टाकला जातो ते आपण रमेश भाटकर यांच्या उदाहरणात बघितलेच आहे. परंतु न्यायाधीश समोर दिलेल्या साक्षी आणि पुराव्यांवर आधारीत न्याय देतात. हे पूरावे सादर करणारे पोलीस आणि प्रशासकीय अधिकारी पुरावे लपविणे, रिपोर्ट बदलणे, साक्षीदारांवर दबाव आणणे यासारखे अनेक प्रकार करतच असतात. आता सर्वात जास्त भरवसा हा मीडियावर होता. परंतू प्रसारमाध्यमेही राजकिय पक्षाच्या मालकीची आहेत. पूर्वीच्या काळी आचार्य अत्रे, निळकंठ खाडीलकर, बाळासाहेब ठाकरे यांच्यासारखे निर्भिड स्वतंत्र बाण्याचे पत्रकार होते. तेव्हा लोकशाहीतील सर्वात महत्त्वाचा हा खांबा लोकशाहीचा प्रमुख आधारस्तंभ होता. परंतू आता पेड पत्रकार आले आणि प्रसारमाध्यमांची विश्वासार्हता ढासळली. राजकिय पक्ष स्वमालकीच्या मीडियावरून आपल्याला अनुकूल अशी बातमी पेरू लागले. परवा हतबल झालेली अभिनेत्री प्राजक्ता माळी हिची पत्रकार परिषद बघितली. एखाद्याला कारण नसताना बदनाम करण्याचा अधिकार प्रसार माध्यमांना कोणी दिला?

अशा प्रकारे प्रसारमाध्यमांना दिलेले अमर्याद अधिकार लोकशाहीच्या मुळावर येणारे आहेत. गेली दोन वर्षे महाराष्ट्रातील सत्तानाट्य आणि त्यातून निर्माण झालेले अनेक पेच. अनेक न्यायालयीन खटले या सर्वाचा सारासार विचार केला तर देश प्रगतीच्या पथावर उभा आहे की भ्रष्टाचाराच्या वाळवीने पोखरलेल्या लोकशाहीच्या खांबांना सावरत उभा आहे याची कल्पना येते. भारताला स्वातंत्र्य देताना ब्रिटीश पंतप्रधान विंस्टन चर्चिल म्हणाले होते. ''जर भारताला स्वातंत्र्य मिळाले तर सत्ता बदमाश, फुकट चालवणाऱ्यांच्या हातात जाईल; सर्व भारतीय नेते कमी क्षमतेचे आणि भुसभुशीत पुरूष असतील. त्यांना गोड जीभ आणि मुर्ख हृदय असतील. सत्तेसाठी ते आपापसात भांडतील आणि भारत राजकिय भांडणात हरवून जाईल. असा दिवस येईल जेव्हा भारतात हवा आणि पाण्यावरही कर लावतील.'' २६ जानेवारीला प्रजासत्ताकदिवस साजरा करत असताना विंस्टन चर्चिल यांचे हे उद्‌गार हृदयाला छेदून आरपार जातात. आपल्या भारत देशाच्या लोकशाहीचा डोलारा खोटा आहे. स्वातंत्र्यानंतर गेल्या सत्तर वर्षात भ्रटाचाराच्या वाळवीने देशाला इतके पोखरले आहे की आपल्या देशाच्या सार्वभौमत्वाला क्षयरोग झाला आहे. हा क्षयरोग भारतीय अर्थव्यवस्थेमध्ये इतका पसरला आहे की, आता हा कोणत्याही औषधाने बरा होणार नाही. औषध घेऊन आजारी लोकशाही फक्त जीवंत आहे इतकेच. ●●

कृषीवल हे पत्र नागेश पब्लिशर्स प्रा. लि.साठी मुद्रक, प्रकाशक **सौ. सुप्रिया पाटील** यांनी नागेश पब्लिशर्स, वेश्वी, अलिबाग, जि. रायगड ४०२ २०९ येथे छापून येथेच प्रसिद्ध केले. आर. एन. आय. रजि. क्र. ४९९६३/७७ | MH-MR-RGD-RNP/16/2022-23 (31-12-2025)
दूरध्वनी : ०२१४१-२२२२९०/२२२७६१, **संपादकीय विभाग**-email : krushivalnews@gmail.com / **जाहिरात विभाग**- email : raigadkrushival@gmail.com मुंबई कार्यालय : ए-५ आयआेनिक १८, ऑर्थर बंदर रोड, कुलाबा, मुंबई ४०० ००५. दूरध्वनी : ०२२-२२८८४५३८.
■ **संस्थापक-संपादक : स्व. प्रभाकर पाटील** ■ **व्यवस्थापकीय संचालक : मीरा घाडीगावकर** ■ **कार्यकारी संपादक : माधवी माणिक सावंत*** ■ **सल्लागार संपादक : प्रसाद वासुदेव केरकर**
(* या पत्रातील मजकुराच्या निवडीसाठी पीआरबी कायद्यानुसार संपादकीय जबाबदारी यांची आहे.)